कविकुलगुरु-कालिदास-संस्कृत-विश्वविद्यालयः, रामटेकम्

राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषद् (नॅक), बेंगलुरु द्वारा
B++ श्रेणी प्राप्त

वार्षिक अहवाल २०१६-२०१७

नॅक समितीने विश्वविद्यालयाला दिलेल्या भेटीची क्षणचित्रे

नॅक समितीचे अध्यक्ष मा. प्रो. हरेकृष्ण शतपथी, मा. पूर्व कुलगुरू, राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ, तिरुपती यांचे स्वागत करताना मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य

मा. प्रो. रामचंद्र भट, मा. कुलगुरू स्वामी विवेकानंद योग अनुसंधान संस्था, बेंगलुरू यांचे स्वागत करताना कुलसचिव मा. डॉ. अरविंद जोशी

नॅक समितीचे अध्यक्ष मा. प्रो. हरेकृष्ण शतपथी, मा. पूर्व कुलगुरू, राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ, तिरुपती यांच्याशी चर्चा करताना नॅक समन्वयक मा. डॉ. मधुसूदन पेन्ना

नॅक समिती समोर विश्वविद्यालयाचे सादरीकरण करताना मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य

क्रायटेरिया १ करिक्युलर आस्पेक्टस्चे सादरीकरण करताना मा. डॉ. ललिता चंद्रात्रे

आय. क्यू. ए. सी. चे सादरीकरण करताना मा. डॉ. कविता होले

क्रायटेरिया २ टिचींग लर्निंग ॲन्ड इव्हॅल्युएशन चे सादरीकरण करताना मा. प्रा. अनघा आंबेकर

आचार्य पदवी कक्षाच्या भेटी प्रसंगी चर्चा करताना नॅक समिती

His Excellency Hon'ble Shri C. Vidyasagar Rao

Governor of Maharashtra
and
Chancellor of Universities in Maharashtra

पुरोवाक्

आकूतिः सत्या मनसो मे अस्तु। (ऋग्वेद १०.१२८.०४)

सत्र 2016-17 चा वार्षिक अहवाल सादर करताना मला आनंद होत आहे. शैक्षणिक, प्रशासकीय आणि अन्य विस्तार विभागांतील सत्र वर्षात केलेल्या कामगिरीचा अहवाल म्हणजे एकप्रकारे विद्यापीठाच्या सर्वंकष कामगिरीचे सिंहावलोकन असते. या अहवाल वर्षात विद्यापीठात अनेक सकारात्मक आणि विकासात्मक बदल तर झालेच परंतु आनंददायी व अभिमानास्पद अशा उपलब्धी देखील विद्यापीठाला प्राप्त झाल्या आहेत त्याची नोंद घेणे महत्त्वाचे वाटते.

- राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रत्यायन परिषद्, बेंगलुरु (नॅक) द्वारे विश्वविद्यालयाला बी + + श्रेणी प्राप्त झाली. विश्वविद्यालयाचे प्रथमच नॅकद्वारे मूल्यांकन झाले असून यामध्ये विश्वविद्यालयाच्या सर्व प्राध्यापक, अधिकारी, शिक्षकेतर सहकारी तसेच शुभचिंतक यांचा मोलाचा वाटा आहे, हे नमूद करणे हे माझे कर्तव्यच आहे. या मूल्यांकनाचे वैशिष्टय म्हणजे पहिल्या टप्प्यात बी + + ही श्रेणी गाठणाऱ्या महाराष्ट्रातील मोजक्या विद्यापीठांमध्ये संस्कृत विश्वविद्यालयाचा समावेश झाला आहे.
- महाराष्ट्र शासनाकडून विश्वविद्यालयाला नागपूरजवळ वारंगा येथे 50 एकर जागा मिळाली. तसेच रामटेक परिसरात पूर्वनियोजित चार इमारतींचे बांधकाम गतिमानतेने सुरू झाले.
- भारतातील संस्कृतप्रेमींना आणि अभ्यासकांना एकत्रित आणण्याचा यशस्वी प्रयत्न द्विदिवसीय भारतवर्षीय संस्कृत संमेलनाद्वारे करण्यात आला. संस्कृतप्रेमींचे संमेलन प्रथमच आयोजित करण्याचा मान विश्वविद्यालयाला मिळाला. यासाठी राष्ट्रीय संस्कृत संस्थान, नवी दिल्लीचे आर्थिक साहाय्य लाभले.
- एकदिवसीय राष्ट्रीय परिषद् तसेच प्रत्येकी एकवीस दिवसांचे संस्कृत रचना आणि मुद्रितशोधन व संस्कृत हस्तलिखितशास्त्र आणि उत्कीर्णलेखशास्त्रांवरचे प्रशिक्षण वर्ग हे वैशिष्टयपूर्ण कार्यक्रमही विद्यापीठाने आयोजित केले.
- मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. या राजभाषेचा गौरव विश्वविद्यालयस्तरावर व्हावा यासाठी स्थानिक रामटेकवासी प्रशासन, शाळा-महाविद्यालयांच्या सहकार्याने व उत्स्फूर्त सहभागाने विश्वविद्यालयाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने 10 विविध कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केले.
- विश्वविद्यालयाच्या प्रकाशन विभागाद्वारे वर्षभरात एकूण 10 पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. पुस्तके संशोधनदृष्टया महत्त्वाची असून संस्कृतचा आधुनिक संदर्भ स्पष्ट करणारीही आहेत.
- विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय संस्कृत संस्थानद्वारा आयोजित राज्य तसेच राष्ट्रीय स्पर्धांमध्ये तसेच तिरुपती प्रातिभ समारोहामध्ये पारितोषिके प्राप्त केली, हे विशेष कौतुकाचे आहे.
- सप्तम दीक्षान्त समारोहाचे आयोजन आणि त्याला लाभलेली भारत सरकारचे मा. मानव संसाधन विकास मंत्री श्री. प्रकाश जावडेकर यांची उपस्थिती यामुळे हा समारोह संस्मरणीय ठरला.
- विश्वविद्यालयाच्या कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांना परदेशात केलेल्या संस्कृतसेवेचा गौरव म्हणून अखिल भारतीय संस्कृत साहित्य संमेलन, नवी दिल्ली तर्फे दिल्ली येथे आयोजित विशेष समारोहात संस्कृतश्री सन्मान प्राप्त झाला.

अशाप्रकारे विविध शैक्षणिक उपक्रम, उपलब्धी, गतिमान प्रशासकीय निर्णय, विकासात्मक धोरण आणि सर्वांचे सहकार्य या आधारावरच संस्कृत विद्यापीठ आपले कार्य निष्ठेने करीत आहे. म्हणूनच विद्यापीठाने हाती घेतलेले नवनवीन संकल्प पूर्णत्वास जाऊन विश्वविद्यालयाचे यश चिरायु होवो या हार्दिक शुभेच्छा प्रकट करते. धन्यवाद!

डॉ. उमा वैद्य

मा. कुलगुरू

हार्दिक अभिनंदन!

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या
सन्माननीय कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांना
अखिल भारतीय संस्कृत साहित्य संमेलन, नवी दिल्ली द्वारा
भारत सरकारचे मानव संसाधन विकास राज्यमंत्री श्री. महेंद्रनाथ पांडेय
यांच्या शुभहस्ते ''संस्कृतश्री'' सन्मान देऊन गौरविण्यात आले.
डॉ. वैद्य यांनी जपान, अमेरिका, इटली, ऑस्ट्रेलिया, मॉरिशस इत्यादी
विविध देशांमध्ये केलेल्या संस्कृत कार्याची समुचित दखल
या पुरस्काराने घेण्यात आली आहे.

विश्वविद्यालयातर्फे मा. डॉ. उमा वैद्य यांचे हार्दिक अभिनंदन !

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषद् (नॅक), बेंगलुरु द्वारा

B + + श्रेणी प्राप्त

वार्षिक अहवाल

2016 –17

Kavikulaguru Kalidas Sanskrit University

Ramtek Office : Administrative Building, Mauda Rd., Ramtek 441 106 Dist. - Nagpur (M.S.)
Nagpur Office : N.I.T. Sankul, 5th & 6th Floor, Near Morbhavan, Sitabuldi, Nagpur-440012 (M.S.)
Ramtek : (O) Ph.No.: (07114) 256476 Fax : (07114) 255549
Nagpur : (O) Ph.No.: (0712) 2560992 Fax : (0712) 2560992
Website : www.kksanskrituni.digitaluniversity.ac
Email : kksuregistrar1997@gmail.com

कविकुलगुरु–कालिदास–संस्कृत–विश्वविद्यालयः, रामटेकम्

वार्षिक अहवाल

ANNUAL REPORT

(2016-2017)

Committee

Dr. Kavita Holey	-	Chairperson
Dr. Shivram Bhat	-	Member
Dr. Parag Joshi	-	Member
Dr. Renuka Bokare	-	Member
Prof. Anagha Ambekar	-	Secretary

Published by
Dr. Aravind Joshi
Registrar
Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Coverpage - Paper 300 gsm.

Paper - Maplitho 80 gsm. / Art Paper 130 gsm.

Size - A4

Printed at :
Sainath Stationers
Vayusena Nagar, Nagpur - 440007

Kavikulaguru Kalidas Sanskrit University
Ramtek Office : Administrative Building, Majda Rd., Ramtek 441 106 Dist. - Nagpur (M.S.)
Nagpur Office : N.I.T. Sankul, 5th & 6th Floor, Near Morbhavan, Sitabuldi, Nagpur-440012 (M.S.)
Ramtek : (O) Ph.No.: (07114) 256476 Fax : (07114) 255549
Nagpur : (O) Ph.No.: (0712) 2560992 Fax : (0712) 2560992
Website : www.kksanskrituni.digitaluniversity.ac
Email : kksuregistrar1997@gmail.com

अनुक्रमणिका

	पृष्ठ क्रमांक	
	मराठी	इंग्रजी
• मा. कुलगुरूंचे मनोगत		
• संस्कृतविषयी...	5	
• विश्वविद्यालयाविषयी.....	6	6
• व्यवस्थापन परिषद सदस्य	8	8
• विद्वत्परिषद सदस्य	9	9
• विद्यापीठ नियोजन विकास मंडळ सदस्य	10	10
• परिक्षा मंडळ सदस्य	11	11
• विश्वविद्यालयातील विविध कक्ष/समिती	12	
प्रकरण पहिले – विभागनिहाय अहवाल		
वेद तथा व्याकरण विभाग	13	97
संस्कृत भाषा तथा साहित्य विभाग	19	103
भारतीय दर्शन विभाग	27	112
वेदांग ज्योतिष विभाग	31	115
शिक्षणशास्त्र विभाग	35	118
क.का.सं.वि. चे अध्यापक महाविद्यालय	36	119
प्रकरण दुसरे – विस्तार सेवा अहवाल		
राष्ट्रीय सेवा योजना	39	123
हस्तलिखित केंद्र	41	125
छात्र कल्याण	42	126
क्रीडा विभाग	43	127
इंटरनल क्वालिटी ॲश्युरन्स सेल (आयक्यूएसी कक्ष)	43	128
करिअर व कौन्सिलिंग कक्ष	44	129
मराठी भाषा गौरव दिन	45	

प्रकरण तिसरे – प्रशासकीय अहवाल

आस्थापना विभाग	55	131
विद्या विभाग	62	133
विद्यापीठ नियोजन विकास मंडळ	68	138
वित्त विभाग	69	139
अभियांत्रिकी विभाग	70	140
परीक्षा विभाग	75	144
ग्रंथालय व प्रकाशन विभाग	79	146
• **विश्वविद्यालयातील विशेष उपक्रम आणि उपलब्धी**	91	157
• **राष्ट्रीय मूल्यांकन व प्रत्यायन परिषद्, बेंगलुरु (नॅक) ने विश्वविद्यालयाला दिलेल्या भेटीचा अहवाल**	94	159

संस्कृतविषयी.....

संस्कृत ही भारताच्या अनमोल ठेवा असणाऱ्या प्राचीन ज्ञानभांडाराच्या ज्ञानप्राप्तीची एकमेव व म्हणूनच अतिशय महत्त्वपूर्ण भाषा आहे. संस्कृत म्हणजे ज्ञानवारसा संक्रमित, संरक्षित व संवर्धित करणारी भाषा! . प्राचीन काळीही नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला अशी नावाजलेली विद्यापीठे भारतात होती. या विद्यापीठांद्वारेच पाणिनी, पतंजली, कौटिल्य यांच्यासारखे स्वतःच्या बुद्धिमत्तेच्या, ग्रंथकर्तृत्वाच्या जोरावर चिरायु कीर्ती मिळवणारे विद्वान निर्माण झाले. हा अभिमानास्पद व तेजोमय ज्ञानवारसा जतन व वृद्धिंगत करण्यासाठी संस्कृत भाषेचे अध्ययन करणे अनिवार्य आहे. म्हणूनच संपूर्ण भारतात संस्कृतचा प्रचार, प्रसार व्हावा याकरिता एकूण 15 संस्कृत विश्वविद्यालये कार्यरत आहेत.

भारतातील संस्कृत विश्वविद्यालये

- संपूर्णानंद संस्कृत विश्वविद्यालय, वाराणसी (उत्तरप्रदेश)
- श्री जगन्नाथ संस्कृत विश्वविद्यालय, पुरी (ओरिसा)
- राष्ट्रीय संस्कृत विश्वविद्यालय, तिरुपती (आंध्र प्रदेश)
- **कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक(महाराष्ट्र)**
- श्री शंकराचार्य संस्कृत विश्वविद्यालय, कालडी(केरळ)
- लालबहादूर शास्त्री संस्कृत विश्वविद्यालय, नवी दिल्ली
- कामेश्वर संस्कृत विश्वविद्यालय, दरभंगा(बिहार)
- राष्ट्रिय संस्कृत संस्थान, नवी दिल्ली
- जगद्गुरू रामानंद आचार्य संस्कृत विश्वविद्यालय, जयपूर (राजस्थान)
- सोमनाथ संस्कृत विश्वविद्यालय, गुजरात
- महर्षी पाणिनी संस्कृत विश्वविद्यालय, उज्जैन(मध्यप्रदेश)
- उत्तराखंड संस्कृत विश्वविद्यालय, हरिद्वार(उत्तराखंड)
- कर्नाटक संस्कृत विद्यापीठ, बंगलोर (कर्नाटक)
- कुमार भास्कर वर्मा संस्कृत व प्राचीन शिक्षा विद्यापीठ, नालबारी (आसाम)
- वेंकटश्वर वैदिक विद्यापीठ, तिरुपती (आंध्रप्रदेश)

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांनी महाराष्ट्रात संस्कृत विद्यापीठ स्थापन करण्याचे स्वप्न पाहिले. त्यांच्या सततच्या आग्रहाने व प्रेरणेने महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय श्री. सुधाकरराव नाईक यांनी ज्ञानयोगी स्वर्गीय डॉ. श्रीकांत जिचकार यांची एक सदस्यीय समिती गठित करून संस्कृत विश्वविद्यालयाचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न केले. डॉ. जिचकार यांनी भारतातील सर्व विश्वविद्यालयांचे अध्ययन करून शासनाला एक विस्तृत अहवाल सादर केला.

सदर अहवालाच्या अनुषंगाने व इतर शिक्षणशास्त्रतज्ज्ञांच्या अभ्यासाधारे महाराष्ट्र शासनाने दि. 18 सप्टेंबर 1997 रोजी नागपूर जिल्हयातील रामटेक येथे महाकवी कालिदासाच्या चिरस्मरणार्थ कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाची स्थापना केली. महाकवी कालिदासाच्या अभिधानाने स्थापन झालेले हे महाराष्ट्रातील एकमेव संस्कृत विश्वविद्यालय असून या विश्वविद्यालयाला संपूर्ण भारतात व भारताबाहेर शैक्षणिक संस्थांना संलग्निकरण देण्याचा अधिकार आहे.

The former Prime Minister of India, Hon'ble Shri P.V. Narasimha Rao is a great scholor of Sanskrit, always insisted that Maharashtra has a great tradition of Sanskrit learning hence it should have an independent University. With his encouragement late Chief Minister of Maharashtra Hon'ble Shri Sudhakarraoji Naik took up the issue and appointed Dr. Shrikant Jichkar as one man committee to give a study report for establishing the Sanskrit University in Maharashtra. Dr. Jichkar prepared the study report and non-Formal University Act for the establishment of Sanskrit University in Maharashtra.

The Government of Maharashtra took up the issue and appointed a committee comprising of Sanskrit scholors and other educationists. On the basis of the report of the committee the State Government established the Sanskrit University at Ramtek and named it as Kavikulaguru Kalidas Sanskrit University. The University was established on 18th September 1997. The place Ramtek, which is a township in Nagpur district, was selected because it is connected to the name of great poet of the world Kavikulaguru Kalidas. This is the only Sanskrit University in Maharashtra. This university has right to give affiliation to other Educational Institutes within India & ouside the India.

संकाय

Sankayas (Faculties)

वेदविद्या

Faculty of Vedavidya

संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा

Faculty of Sanskrit & other languages

भारतीय दर्शन, तत्त्वज्ञान तथा संस्कृती

Faculty of Indian Religion, Philosophy & Culture

प्राचीन भारतीय विज्ञान तथा मानव्यशास्त्रे

Faculty of Ancient Indian Science & Humanities

शिक्षणशास्त्र तथा संकीर्ण विद्याशाखा

Faculty of Education & Miscellaneous Faculties

शैक्षणिक विभाग

Teaching Departments

वेद तथा व्याकरण	Dept. of Veda & Vyakarana
संस्कृत भाषा तथा साहित्य	Dept. of Sanskrit Language & Literature
दर्शनशास्त्र	Dept. of Darshanshastra
वेदांग ज्योतिष	Dept. of Vedanga Jyotisha
ललितकला	Dept. of Fine Arts
मानव्यशास्त्रे	Dept. of Humanities
शिक्षणशास्त्र	Dept. of Education
ग्रंथालय वार्ताशास्त्र	Dept. of Library & Information Science
संकीर्ण विद्या	Dept. of Miscellaneous Subjects

List of Management Council

Sr. No.	Name	Position
1	**Dr. Uma Vaidya,** Hon'ble Vice-chancellor, KKSU, Ramtek	Chairperson
2	**Dr, Madhusudan Penna,** Dean, Indian Religion, Philosophy & Culture	Member
3	**Dr. Kamal Singh,** Ex Vice-chancellor, Sant Gadgebaba Amravati University, Amravati	Member
	Dr. Ashish Deshmukh Member, Maharashtra Legislative Council	Member
4	**Shri. Niranjan Davkhare,** Member, Maharashtra Legislative Assembly	Member
5	**Shri Sitaram Kunte,** Principal Secretary, Department of Higher & Technical Education, Mumbai,	Member
6	**Dr. Anajali Rahatgaokar,** Joint Director, Higher Education, Nagpur	Member
7	**Dr. Kavita Holey,** Associate Professor, KKSU, Nagpur	Member
9	**Dr. Nanda Puri,** Dean, KKSU, Nagpur	Member
10	**Dr. Dilip Dabir,** 29, Devarshi, Gajanandham, Sahakar Nagar, Nagpur	Member
11	**Dr. Indumati Bharambe,** Professor & Head, KKSU, Nagpur	Member
12	**Dr. C.G.Vijaykumar,** Director, Board of University Planning & Development, KKSU, Ramtek	Member
13	**Dr. Ramchandra Joshi,** Finance Officer (Off.), KKSU, Ramtek	Permanent Invitee
14	**Dr. Umesh Shivhare,** Controller of Examination, KKSU, Ramtek	Permanent Invitee
15	**Dr. Aravind Joshi,** Registrar, KKSU, Ramtek	Secretary

List of Academic Council

SN.	Name	Position		SN.	Name	Position
1	**Dr. Uma Vaidya,** Hon'ble Vice-Chancellor, KKSU, Ramtek	Chair person		10	**Dr. Lalita Chandratre**, Dean, faculty of Education and Miscellaneous, KKSU, Nagpur	Member
2	**Dr. Devendra Chaugule,** 202, Krushana Plaza, In front of R.C.F. colony, Vaishvi Nivas, Alibag, Dist Raigarh – 402 209	Member		11	**Dr. Dilip Dabir,** Vaidadarbhiya Harikirtan Sanstheche Kirtan Mahavidyalaya, Rajat Mahostsav, Dharmpeth Mulanchi Shala, Dharmpetha, Nagpur	Member
3	**Dr. Anjali Rahatgaonkar,** Joint Director, (Higher Education), Nagpur	Member		12	**Dr. Bhau Dandale,** 64, Sambhaji Nagar, Near Trimurti Nagar, Ring Road, Nagpur (Mob. 9423072562)	Member
4	**Dr. Kusum Patoria,** Azad Chowk, Sadar, Nagpur – 440001	Member		13	**Dr. Dipak Kapade,** Librarian (Acting), Kavikulguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
5	**Dr. Leena Rastogi,** 86 Madhav Nagar, Nagpur -10	Member		14	**Shri. Satish Naidu,** C/o – Dr. Mukund Shastri, Plot No. 115, Bajiprabhu Nagar, Nagpur.	Member
6	**Dr. C.G.Vijaykumar,** Dean, Faculty of Vedvidya, KKSU, Nagpur	Member		15	**Dr. B. R. Sharma,** G.S.College of Yoga and Cultural Synthesis, Kaivalyadham B. R. Sharma, G.S.College of Yoga and Cultural Synthesis, Kaivalyadham yoga institute, Swami Kuwalayanand marg] Lonavala, Distt. Pune	Member
7	**Dr. Nanda J. Puri,** Dean, faculty of Sanskrit and other Languages KKSU, Nagpur	Member		16	**Dr. Indumati Bharmbe,** Co-ordinator, Internal Quality Assurance Cell, KKSU, Nagpur	Member
8	**Dr. Madhusudan Penna,** Dean, faculty of Indian Religion, Philosophy and culture, KKSU, Nagpur	Member		17	**Dr. Kavita Holey,** Director, Vistar Seva Mandal, KKSU, Ramtek	Member
9	**Dr. Krishnakumar Pandey,** Dean, faculty of Ancient Indian Science and Humanities, KKSU, Nagpur	Member		18	**Dr. Aravind Joshi,** Registrar, KKSU, Ramtek	Secretary

Board of Planning and Development (BPD)

Dr. Uma Vaidya, Hon'ble Vice-Chancellor, (Chairperson)
Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Sr. No.	Name	Position
1.	**Dr. Nanda Puri,** Associate Professor & Dean Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
2.	**Dr. Madhusudan Penna,** Associate Professor & Dean Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
3.	**Dr. Kalapani Agasti,** Assistant Professor Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
4.	**Prof. Anagha Ambekar,** Assistant Professor Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
5.	**Dr. Balchandra Khandekar,** 152, Metta Laghu Vetan colony, Kamptee road, Nagpur	Member
6.	**Dr. Sharada Gadge,** HoD Sanskrit Dept., LAD college Shankar nagar, Nagpur.	Member
7.	**Dr. Dnyaneshwar Kulkarni,** 215, Siddhi Vinayak, North Bazar road, Gokulpeth Nagpur.	Member
8.	**Dr. Vibha Kshirsagar,** Plot no. 12, Ganesh colony, Rana pratap nagar, Shriram Urban Bank, ring road, Nagpur.	Member
9.	**Dr.Vijaykumar C.G.** Director (I/c), Board of planning and Development Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Secretary

Board of Examination

Sr. No	Name	Position
01	**Dr. Uma Vaidya,** Hon'ble Vice-Chancellor Kavikulaguru Kaldas sanskrit University Ramtek	Chairperson
02	**Hon'ble Joint Director** (Higher Education) Nagpur Division, Nagpur	Member
03	**Dr. Nanda Puri** Dean, Faculty of Sanskrit & other languages Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
04	**Dr. Madhusudan Penna** Dean, Faculty of Indian Religion, Philosophy & culture Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
05	**Dr. C.G. Vijaykumar** Dean, Faculty of Vedavidya Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
06	**Dr. Krishna Kumar Pandeya** Dean, Faculty of Ancient Indian Science and Humanities Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
07	**Dr. Lalita Chandratre** Dean, Faculty of Education and Sankirna Vidya shakha Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
08	**Dr. Prasad Gokhale** Assistant Professor Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member
09	**Dr. Umesh Shivhare** Controller of Examination Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek	Member, Secretary

विश्वविद्यालयातील
विविध कक्ष/समिती

अ.क्र.	समिती/कक्ष	अध्यक्ष/विभागप्रमुख/समन्वयक
1.	व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन कक्ष	प्रा. डॉ. इंदुमती भारंबे
2.	अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्ष	प्रा. डॉ. इंदुमती भारंबे
3.	सेवायोजना व मार्गदर्शन कक्ष	प्रा. डॉ. इंदुमती भारंबे
4.	रॅगिंग प्रतिबंधक कक्ष	डॉ. नंदा पुरी
5.	लैंगिक छळ प्रतिबंधक कक्ष	डॉ. नंदा पुरी
6.	छात्रप्रवेश समिती	डॉ. नंदा पुरी
7.	विस्तार सेवा मंडळ	डॉ. कविता होले
8.	महिला कक्ष	डॉ. कीर्ती सदार
9.	पूर्व छात्र संघटन	डॉ. कलापिनी अगस्ती
10.	विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष (ऑनलाईन)	डॉ. कलापिनी अगस्ती
11.	राष्ट्रीय सेवा योजना कक्ष	डॉ. हरेकृष्ण अगस्ती
12.	हस्तलिखित स्रोत केन्द्र	डॉ. प्रसाद गोखले
13.	शारीरिक शिक्षण विभाग	डॉ. हृषिकेश दलाई
14.	छात्र कल्याण कक्ष	डॉ. राजश्री मेश्राम
15.	महिला तक्रार निवारण समिती	प्रा. अनघा आंबेकर
16.	आचार्य पदवी कक्ष	डॉ. दीपक मेश्राम
17.	शिष्यवृत्ती सेवा कक्ष	सौ. माधुरी चेवले

विभागनिहाय अहवाल

वेद तथा व्याकरण विभाग

1) संस्कृत संभाषण वर्ग :–

मा. कुलगुरूंच्या प्रेरणेने व मा. अधिष्ठाता, वेदविद्या संकाय यांच्या मार्गदर्शनाखाली क.का.संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेदविद्या संकायाच्या वेद तथा व्याकरण विभागातर्फे सर्वांसाठी दिनांक 18.07.2016 ते दिनांक 27.07.2016 या कालावधीत दहा दिवसांचे निःशुल्क संस्कृत संभाषण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या संस्कृत संभाषण वर्गाचे उद्घाटन **मा. श्री. शिरीष भेडसगावकर**– मुख्यातिथी, नागपूर यांच्या हस्ते झाले. संभाषण वर्गाचे प्रास्ताविक **डॉ. हरेकृष्ण अगस्ती** यांनी सांगितले. दीपप्रज्वलनाने उद्घाटन कार्यक्रमाची सुरुवात झाली. विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सरस्वती वन्दन केले. त्यानंतर पुष्पगुच्छ,शाल व कालिदासाचे स्मृतिचिन्ह देवून मुख्यातिथी श्री. शिरीष भेडसगावकर यांचे स्वागत व सत्कार करण्यात आले. या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विश्वविद्यालयाच्या वेदविद्या संकायाचे अधिष्ठाता व बी.पी.डी.चे प्रभारी संचालक **डॉ. सी. जी.विजयकुमार** यांनी भूषविले.

या दहा दिवसांच्या संस्कृत संभाषणाचे उद्देश व महत्त्व वेद तथा व्याकरण विभागाचे ज्येष्ठ सहायक प्राध्यापक डॉ. हरेकृष्ण अगस्ती यांनी प्रास्ताविकद्वारा सांगितले. वेद तथा व्याकरण विभागाचे सहायक प्राध्यापक व संभाषण वर्गाचे सहसमन्वयक डॉ. जयवन्त चौधरी यांनी धन्यवाद दिले. उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन संभाषण वर्गाचे समन्वयक डॉ. शिवराम भट्ट यांनी केले. अशाप्रकारे उद्घाटन सोहळा सुरळीतपणे पार पडला.

या दहा दिवसांच्या संस्कृत संभाषण वर्गामध्ये संस्कृत वाङ्मयात विद्यार्थ्यांचा चञ्चुप्रवेश व संस्कृत संभाषण कौशल्य संपादन या प्रधान उद्देशाने विभागातर्फे जिज्ञासू विद्यार्थ्यांसाठी निःशुल्क संस्कृत संभाषण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. हा वर्ग दररोज सकाळी 12.00 ते 02.00 या कालावधीत घेण्यात आला. या वर्गामध्ये संस्कृत संभाषणासोबत इतर विषयांचे जसे संस्कृत गीत पाठन,कथा कथन, संस्कृत क्रीडा, भगवद्गीता पठन, सुभाषित पठन,वर्णोच्चारण शिक्षण, संस्कृत वाङ्मयातील विविध विषयांबद्दल तज्ज्ञ व्यक्तींद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

या दहा दिवसांच्या संस्कृत संभाषण वर्गामध्ये श्री. रूपेश रुद्रकार व श्रीवरदा माळगे यांनी विद्यार्थ्यांना संस्कृत संभाषण शिकविले. या वर्गामध्ये खालील मान्यवरांकडून मार्गदर्शन व शिक्षण देण्यात आले.

अ.क्र.	व्याख्यातृ नाम	विषयः	दिनाङ्कः
01	प्रा. पराग जोशी	साहित्यस्य परिचयः	22.07.2016
02	डॉ. कलापिनी अगस्ती	दर्शनशास्त्राचा परिचय	23.07.2016
03	डॉ. जयवन्त चौधरी	कथाकथनम्	24.07.2016
04	डॉ. हरेकृष्ण अगस्ती	व्याकरणशास्त्रस्य परिचयः	25.07.2016
05	डॉ. शिवराम भट्ट	वर्णोच्चारणशिक्षणम्	26.07.2016

दिनांक 27.07.2016 रोजी संभाषण वर्गाचा समारोप कार्यक्रम होता. या समारोप कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान वेदविद्या संकायाचे अधिष्ठाता व बी.पी.डी. प्रभारी संचालक **डॉ. सी.जी. विजयकुमार** यांनी भूषविले. मुख्यातिथी म्हणून संस्कृत भारती नागपुरचे प्रान्तीय अध्यक्ष व भा.ज.पा. नागपुरचे पूर्व अध्यक्ष **मा.श्री. रमेश मन्त्री** महोदय उपस्थित होते. भारतीय संस्कृती व कर्तव्य समजण्याकरिता संस्कृत अध्ययन करणे अनिवार्य आहे असे त्यांनी भाषण करताना सर्वांना उद्‌बोधित केले. वर्गाचे इतिवृत्त व संचालन समन्वयक **डॉ. शिवराम भट्ट** यांनी केले. दीपप्रज्वलनाने समारोप कार्यक्रमाची सुरुवात झाली. वर्गाच्या विद्यार्थ्यांनी सरस्वती वन्दन केले. पुष्पगुच्छ, शाल व स्मृतिचिन्ह देवून मा. मुख्यातिथींचे स्वागत डॉ. विजयकुमार यांनी केले व अध्यक्षांचे स्वागत वेद तथा व्याकरण विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. जयवन्त चौधरी यांनी केले. दोन विद्यार्थ्यांनी स्व–अनुभव सांगितले. संभाषण वर्गाच्या विद्यार्थ्यांनी समूह संस्कृतगीत व लघुनाटिका प्रस्तुत केली. मान्यवरांच्या हस्ते संभाषण शिकवलेल्या प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी वर्गाचे सहसमन्वयक डॉ. जयवन्त चौधरी यांनी धन्यवाद दिले. या वर्गात एकूण 89 सहभागी उपस्थित होते. सर्व प्रशिक्षण वर्गामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या प्रमाणे दहा दिवसांचा संस्कृत संभाषण वर्ग यशस्वीपणे पार पडला.

2) विशिष्ट व्याख्यान कार्यक्रम :–

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेदविद्या संकायांतर्गत वेद तथा व्याकरण विभागातर्फे सर्व विद्यार्थ्यांसाठी दिनांक 08.09.2016 रोजी सकाळी 11.45 वा पदव्युत्तर वेद तथा व्याकरण विभागात व्याकरण विषयावर **विशिष्ट व्याख्यान** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या विशिष्ट व्याख्यान कार्यक्रमासाठी **मुख्य वक्ता** म्हणून तेनाली परीक्षेत उत्तीर्ण झालेले " **व्याकरण रत्न"** उपाधी प्राप्त केलेले उत्तर भारतातील ही उपाधी प्राप्त करणारे एकमेव व्यक्तिमत्व **डॉ. पङ्कजकुमार व्यास** उपस्थित होते. वेदविद्या संकायाचे अधिष्ठाता, वेद तथा व्याकरण विभागचे विभाग प्रमुख, व बी.पी.डी.चे प्रभारी संचालक **डॉ. विजयकुमार सी.जी.** यांनी अध्यक्षस्थान भूषविले. डॉ. विजयकुमार सी.जी. यांनी शाल, स्मृतिचिह्न, पुष्पगुच्छ देऊन मुख्य वक्त्यांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. व्याकरणाच्या विधिनिमन्त्रणा.. इत्यादी सूत्रावर मुख्य वक्त्यांनी आपले व्याख्यान प्रस्तुत केले व विद्यार्थ्यांना शास्त्रार्थ प्रतिपादन शिकविले. विविध विभागांचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन **डॉ. शिवराम भट्ट** यांनी व धन्यवाद समर्पण **डॉ. जयवन्त चौधरी** यांनी केले. अशाप्रकारे हा विशिष्ट व्याख्यान कार्यक्रम पार पडला.

3) ग्रन्थप्रदर्शिनी :–

दिनांक 19.10.2016 रोजी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेद तथा व्याकरण विभागाद्वारे ग्रंथालय विभागाच्या मदतीने ग्रंथप्रदर्शनी आयोजित करण्यात आली होती. वेद व व्याकरणासंबधी सर्व ग्रंथ प्रदर्शनीमध्ये ठेवण्यात आले होते. या ग्रन्थप्रदर्शनीचे उद्‌घाटन क.का. संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेदविद्या संकायाचे अधिष्ठाता व वेद तथा व्याकरण विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सी.जी.विजयकुमार यांच्या हस्ते झाले. सर्व संकायांचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राध्यापक व वेद तथा व्याकरण विभागाचे सर्व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. एम.ए. संस्कृत वेद व व्याकरण शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी याचा पूर्णपणे लाभ घेतला.

एम.ए. संस्कृत वेद तथा व्याकरण विषयाच्या प्रथम वर्षाच्या एक एक विद्यार्थ्याचा गट तयार करून त्यांना प्रदर्शनीमध्ये ठेवण्यात आलेल्या पुस्तकांच्या आधारे अ.क्र., पुस्तकाचे नाव, व्याख्याता, संपादक,टीका,प्रकाशक,विषयसूची, मूल्य अशा प्रकारचे एक प्रारूप तयार करण्यासाठी सूचना देण्यात आली होती. तसेच एम.ए. संस्कृत वेद तथा व्याकरण विषयाच्या द्वितीय वर्षाच्या एक एक विद्यार्थ्यांचा गट तयार केला होता. त्यांना प्रदर्शनीमध्ये ठेवलेल्या पुस्तकांच्या आधारे एका ग्रन्थाची किती टीका व टीकाकार आहेत, याबद्दल माहिती भरुन ठेवण्यासाठी सूचना दिली होती. सूचनेप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांनी हे काम सुचारुपणे केले. अशाप्रकारे ही ग्रन्थप्रदर्शिनी पार पडली.

4) 21 दिवसीय उद्बोधन वर्ग :–

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेद तथा व्याकरण विभागाद्वारे राष्ट्रीय संस्कृत संस्थान, नवी दिल्ली यांच्या अनुदानाने **Sanskrit composing and proof reading** या विषयावर 21 दिवसांच्या उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

संस्कृत भाषेत लेखन करताना आवश्यक तत्त्वांची माहिती असल्याशिवाय लेखन कार्यात अडथळा निर्माण होतो, त्याचप्रमाणे लिखित तत्त्वांची तपासणी करण्यासाठी विशिष्ट पद्धतीचा अवलंब केल्यास साहित्यनिर्मिती सोपी होते. विद्यार्थ्यांना हा विषय अवगत व्हावा तसेच त्यांच्यामध्ये साहित्यनिर्मितीची गोडी निर्माण व्हावी या हेतूने राष्ट्रीय संस्कृत संस्थान, नवी दिल्ली यांच्या अनुदानाने सदर उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

दि. 02 मार्च 2017 ते 22 मार्च 2017 पर्यन्त हा उद्बोधन वर्गाचे **विद्यापीठ शैक्षणिक परिसर, एन.आय.टी. संकुल, खोली क्र. 501** मध्ये दर रोज **दु. 3:00 ते 4:00** पर्यन्त आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयोगी असलेल्या या उद्बोधन वर्गात एकूण 20 विद्यार्थी सहभागी होते.

सदर उद्बोधन वर्गासाठी राष्ट्रीय संस्कृत संस्थान, नवी दिल्ली यांनी रु.31,200/– चे आर्थिक अनुदान दिले होते.

या उद्बोधन वर्गाचा उद्घाटन कार्यक्रम दि. 02.03.2017 रोजी आयोजित करण्यात आला होता. उद्घाटन कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून नागपूरातील हितवाद या प्रसिद्ध इंग्रजी वृत्तपत्राचे उप मुख्यसंपादक **श्री राजेन्द्र दिवे** उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून वेदविद्या संकायाचे अधिष्ठाता, वेद तथा व्याकरण विभागाचे विभाग प्रमुख व बी.पी.डीचे प्रभारी संचालक **डॉ. सी.जी. विजयकुमार** उपस्थित होते. उद्बोधन वर्गाचे प्रास्ताविक करण्यसाठी वेद तथा व्याकरण विभागाचे ज्येष्ठ प्राध्यापक **डॉ. हरेकृष्ण अगस्ती** उपस्थित होते . व्यासपीठावर बसलेल्या मान्यवरांनी दीपप्रज्वलन करून 21 दिवसीय उद्बोधन वर्गाचे उद्घाटन केले. वेद तथा व्याकरण विभागाच्या विद्यार्थ्यांनी सरस्वती वन्दन केले. उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन वेद तथा व्याकरण विभागाचे प्राध्यापक **डॉ. शिवराम भट्ट** यांनी केले. उद्घाटन कार्यक्रमाचे धन्यवाद समर्पण वेद तथा व्याकरण विभागाचे प्राध्यापक **डॉ. जयवंत चौधरी** यांनी केले.

या उद्बोधन वर्गाच्या उद्घाटन कार्यक्रमात विविध संकायांचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमानंतर प्रति दिवसाच्या वर्गाची सुरुवात झाली. या उद्बोधन वर्गात अनेक वक्त्यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. त्याचे विवरण खालील प्रमाणे आहे.

List of Lectures

S.No.	Name of the Resource Person	Topic	Date
Inaugural Function			02.03.2017
01	Shri Rajendra Dive	Language Composing & Proof Reading	02.03.2017
02	Dr.Madhusudan Penna	Importance of Language in Sanskrit Writing	03.03.2017
03	Dr. C.G.Vijayakumar	Introduction of Sanskrit Language	04.03.2017
04	Dr. Shivaram Bhat	Introduction of Sanskrit Grammar	05.03.2017
05	Dr.Jaywant Chaudhari	Varnavichaarah	06.03.2017
06	Dr. Shivaram Bhat	Svarasandhih	07.03.2017
07	Dr. Harekrushna Agasti	Vyanjanasandhih	08.03.2017
08	Shri.Sambhaji Patil	Visargasandhih	09.03.2017
09	Dr. C.G.Vijayakumar	Introduction of Vibhaktih	10.03.2017
10	Dr. C.G.Vijayakumar	Introduction of Karakam	11.03.2017
11	Dr. Shivaram Bhat	Namapadaani and Kriyaapadaani	12.03.2017
12	Dr.Jaywant Chaudhari	Samaasaparichayah	13.03.2017
13	Dr. Harekrushna Agasti	Avyayeebhaava & Tatpurushasamaasah	14.03.2017
14	Dr. Madhusudan Penna	Bahuvreehi & Dvandvasamaasah	15.03.2017
15	Dr. Shivaram Bhat	Taddhita & krudanta parichayah	16.03.2017
16	Dr.Leena Rastogi	Shuddhasanskritalekhanam	17.03.2017
17	Dr.Leena Rastogi	Sanskrit Composing	18.032017
18	Dr. Harekrushna Agasti	Teqniques of Proof Reading	19.032017
19	Dr.Kalapini Agasti	Practical Class (Sentence Making)	20.032017
20	Dr.Jaywant Chaudhari	Practical Class (Paragraph Writing)	21.032017
21	Dr. Vibha Kshirasagar	Composing of Emotional Sentences	22.032017
Valedictory Function			22.03.2017

अशा प्रकारे अनेक वक्त्यांनी उपर्युक्त विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

या 21 दिवसीय उद्‌बोधन वर्गाचा समापन कार्यक्रम दि. 22.03.2017 रोजी आयोजित करण्यात आला होता. समापन कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून सी.पी. ॲण्ड बेररच्या संस्कृत विभाग प्रमुख **डॉ. विभा क्षीरसागर महोदया** उपस्थित होत्या. समापन कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून वेदविद्या संकायाचे अधिष्ठाता, वेद तथा व्याकरण विभागाचे विभाग प्रमुख व बी.पी. डीचे प्रभारी संचालक **डॉ. सी.जी. विजयकुमार** उपस्थित होते. वेद तथा व्याकरण विभागाच्या विद्यार्थ्यांनी सरस्वती वन्दन केले. या 21 दिवसीय उद्‌बोधन वर्गाचे इतिवृत्त वेद तथा व्याकरण विभागाचे प्राध्यापक **डॉ. शिवराम भट्ट** यांनी सांगितले. प्रतिनिधी म्हणून दोन विद्यार्थ्यांनी स्व अनुभव कथन केले. समापन कार्यक्रमाचे संचालन डॉ. जयवंत चौधरी यांनी केले. समापन कार्यक्रमाचे धन्यवाद समर्पण वेद तथा व्याकरण विभागाचे ज्योष्ठ प्राध्यापक **डॉ. हरेकृष्ण अगस्ती** यांनी केले. या वर्गासाठी आर्थिक मदत केलेल्या राष्ट्रीय संस्कृत संस्थान, नवी दिल्ली यांचा विशेष धन्यवाद व्यक्त करण्यात आला. या 21 दिवसीय उद्‌बोधन वर्गातील उपस्थित 20 विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

या उद्‌बोधन वर्गाच्या समापन कार्यक्रमात विविध संकायांचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. समापन कार्यक्रमानंतर सर्वांना चहा व नाश्ता देण्यात आला.

अशा प्रकारे **Sanskrit composing and proof reading** या विषयावरील 21 दिवसीय उद्‌बोधन वर्ग सुचारु रूपाने संपन्न झाला.

5. विद्यार्थी सहभाग :

वेद तथा व्याकरण विभागातील एम.ए. विद्यार्थ्यांनी इन्द्रधनुष्य, आविष्कार, तिरुपति छात्र प्रातिभ समारोह, नाटकस्पर्धा, संक्रमणोत्सव, संस्कृत सप्ताह इ. शैक्षणिक व सांस्कृतिक स्पर्धामध्ये सहभाग घेतला व पुरस्कार आणले. ते खालील प्रमाणे आहे.

'गोवा–महाराष्ट्र प्रान्तीय राज्यस्तरीय शास्त्रीय स्पर्धा' राष्ट्रीय संस्कृत संस्थानाच्या क.जे. सोमय्या संस्कृत विद्यापीठ, मुम्बईतील दिनांक 11.11.2016 रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यात विभागाच्या खालील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.

अ.क्र.	विद्यार्थ्यांचे नाव	स्पर्धा	क्रमांक	विभाग	वर्ग
01	**श्रुतिका क्षीरसागर**	व्याकरण शलाका	**प्रथम**	व्याकरण	एम्.ए.संस्कृत प्र. वर्ष
02	**सत्यजित खताळ**	धर्मशास्त्र भाषण	**प्रथम**	व्याकरण	एम्.ए.संस्कृत द्वि. वर्ष
03	**श्रीवरदा माळगे**	धातुरूपकण्ठपाठ	**द्वितीय**	व्याकरण	एम्.ए.संस्कृत प्र. वर्ष

उत्तराखण्ड संस्कृत अकादमी, हरिद्वार येथे दिनाङ्क रोजी अखिलभारतीया व्याकरण शलाका परीक्षा आयोजित करण्यात आल्या होती. त्यात विभागाच्या खालील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.

अ.क्र.	**नाम**	**विभाग**	**स्पर्धा**	**पुरस्कार**	**वर्ग**
01	श्रीवरदा माळगे	व्याकरण	अखिलभारतीया शलाका परीक्षा	द्वितीय	एम्.ए.संस्कृत प्र. वर्ष

संस्कृत भाषा तथा साहित्य विभाग

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातील पदव्युत्तर संस्कृत भाषा तथा साहित्य विभागाद्वारे घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांचा तसेच विभागाद्वारे राबविलेल्या उपक्रमांचा संक्षिप्त अहवाल ———

1) कालिदास दिवस समारोह –

दि. 5 जुलै 2016 रोजी कालिदास दिवसाचे आयोजन रामटेक येथील मुख्यालयात करण्यात आले. या प्रसंगी श्री.स्वानंद पुंड यांनी विशेष व्याख्याता म्हणून उपस्थित राहून उपस्थितांना कालिदास ग्रंथांबद्दल प्रेरक भाषण दिले. या प्रसंगी विश्वविद्यालयाचे मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांनी अध्यक्षस्थान तसेच मा. संकाय प्रमुख डॉ. नंदा पुरी यांनी समन्वयक पद भूषविले होते. विश्वविद्यालयाचे सर्व सन्माननीय अधिष्ठाते, विभाग प्रमुख, प्राध्यापकगण तसेच शिक्षकेतर सर्व कर्मचारी कार्यक्रमात उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. पराग जोशी यांनी केले.

2) संस्कृतसप्ताह व संस्कृतदिन उत्सव –

संस्कृत वाङ्मयाच्या प्रचार व प्रसाराकरिता विश्वविद्यालयात संस्कृत सप्ताह उत्सव दरवर्षी साजरा केला जातो. या वर्षी संस्कृत भाषा तथा साहित्य विभागाने संस्कृत सप्ताह उत्सवात संस्कृतसंहितालेखन कार्यशाळेचे आयोजन केले होते. संस्कृत दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात संस्कृतभारतीचे राष्ट्रीय प्रचार प्रमुख व भारत सरकारचे भाषा सल्लागार मा. श्री. चमूकृष्णशास्त्री उपस्थित होते. या प्रसंगी त्यांचे विशेष उद्बोधन सर्वांना प्राप्त झाले. अध्यक्षस्थानी विश्वविद्यालयाच्या मा. कुलगुरू डॉ.उमा वैद्य उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन डॉ. पराग जोशी यांनी केले.

3) संस्कृतसंहितालेखन कार्यशाळा :

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय संस्कृतच्या अध्ययन–अध्यापन, संशोधन तसेच अक्षुण्ण प्रचार–प्रसारासाठी स्थानिक, राज्य व राष्ट्रियस्तरावर वारंवार निरनिराळया कार्यक्रमांचे आयोजन करीत असते. या परंपरेचे अनुसरण करत विश्वविद्यालयाच्या पदव्युत्तर संस्कृत भाषा तथा साहित्य विभागाच्या वतीने संस्कृतदिन तसेच त्या अनुषंगाने साजरा केल्या जाणा–या संस्कृतसप्ताहमहोत्सवाच्या निमित्ताने "संस्कृतसंहितालेखन कार्यशाळा" आयोजित करण्यात आली. कार्यशाळेचे समन्वयन डॉ. कविता होले यांनी मा. अधिष्ठाता, डॉ. नंदा पुरी यांच्या मार्गदर्शनात केले. कार्यशाळेचे उद्घाटन दि. 23.08.2016 रोजी मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांच्या अध्यक्षतेत झाले. कार्यक्रमासाठी प्रमुखातिथी म्हणून श्री. प्रभाकर भातखण्डे, (माजी अध्यक्ष, महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड, मुंबई) हे उपस्थित होते. कार्यशाळा उद्घाटनसमारोह प्रसंगी मा. कुलगुरू यांनी संस्कृतसंहितालेखन सारख्या विषयांवरील या कार्यशाळेची मुक्तकंठाने प्रशंसा केली व कार्यशाळेची आजच्या साहित्यिक युगात प्रासंगिकता विशद केली. उपस्थित प्रमुखातिथींनी कार्यशाळेच्या विषयानुरूप उपस्थितांना प्रेरक असे भाषण दिले. आभारप्रदर्शन व एकात्मता मन्त्राने उद्घाटन कार्यक्रम सम्पन्न झाला.

सदर कार्यशाळेत संस्कृतसंहितेविषयक सात विषयांवर तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. उद्घाटनाच्या दिवशी दुपारच्या सत्रात **श्री. प्रभाकर भातखंडे** यांनी "संस्कृतनाट्यसंहितालेखन" या विषयावर सरळ व सोप्या भाषेत

व्याख्यान दिले. **श्री. प्रभाकर भातखंडे** यांच्या अनुभवप्रचुर भाषणाने उपस्थितांमध्ये कार्यक्रम तथा प्रमुखातिथिविषयक अभूतपूर्व कार्तज्ञ पाहण्यास मिळाले. दि. 24.8.2016 रोजी कार्यशाळेच्या द्वितीय सत्रात संकाय व विभागप्रमुख **डॉ. नंदा पुरी** यांनी "कथासंहितालेखन" या विषयावर सांगोपांग व्याख्यान दिले. मा. पुरी यांनी कथेचे स्वरूप, वैशिष्टये व कथा लिहित असताना घ्यावयाच्या दक्षतांबाबत सखोल मार्गदर्शन केले. व्याख्यानाच्या शेवटी दिलेल्या मुद्यांवरुन विद्यार्थ्यांकडून कथालेखनाचा अभ्यास करवून घेतला. कार्यशाळेच्या तिसऱ्या दिवशी दि. 25.08.2016 रोजी **डॉ. प्रभा देऊसकर** यांनी "दिग्दर्शनदृष्टीने नाट्यसंहितालेखन" या विषयावर मार्गदर्शन केले. दि. 26.08.2016 रोजी चवथ्यासत्रात **प्रा. डॉ. विभा क्षीरसागर** (संस्कृत विभागप्रमुख, सी.पी. एण्ड बेरार कॉलेज, नागपूर) यांनी "संस्कृत नाट्यसंहिता लेखन" या विषयावर विशेषत्वाने प्रकाश टाकला. त्यांच्या नाट्यलेखन अनुभवाने व्याख्यान विद्यार्थ्यांकरिता प्रेरणादायी ठरले. दि. 27.08.2016 रोजी **प्रा. डॉ. शिवराम भट्ट** यांनी "संस्कृतनिबंधसंहितालेखन" या विषयावर प्रेरक उद्बोधन दिले. त्यांनी व्याख्यानाच्या शेवटी निरनिराळया विषयांवर विद्यार्थ्यांकडून संस्कृतात निबंध लिहून घेतले. व उत्कृष्ट निबंधांना प्रथम– द्वितीय पुरस्कार प्रदान केले. दि. 29.08.2016,सोमवार रोजी मा. निवृत्त प्राध्यापिका व संस्कृतज्ज्ञ **डॉ. लीना रस्तोगी** यांनी "संस्कृत–कविता संहिता लेखन" या विषयावर व्याख्यान दिले. कविता, पद्य इ. लिहित असतांना आवश्यक लक्ष्यवेधी घटकांचे सखोल व अनुभवगम्य निरूपण डॉ. रस्तोगी यांनी केले. कार्यशाळेच्या सातव्या दिवशी **डॉ. पराग जोशी** यांनी "एकपात्राभिनय व अनुवादसंहितेची तर संहितालेखनापासून असलेली निराळी वैशिष्टये व समग्र स्वरूप'' यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडले.

कार्यशाळेचा समापनसमारोह मा. कुलगुरूंच्या अध्यक्षीय उपस्थितीत पार पडला. समापनसमारोहात प्रमुखातिथी मा. डॉ. लीना रस्तोगी उपस्थित होत्या. सहभागी विद्यार्थ्यांनी स्व–अनुभवांचे कथन केले. निबंध लेखनात यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रे देण्यात आली. सहभागींना सहभाग प्रमाणपत्रे देण्यात आली. मा. कुलगुरू यांनी अध्यक्षीय भाषणाने कार्यशाळेचे औचित्य साधत असे कार्यक्रम वारंवार आयोजित करण्याचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालक डॉ. पराग जोशी व आभारप्रदर्शन डॉ. राजेन्द्र जैन यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची समाप्ती झाली.

4) भारतवर्षीय संस्कृत संमेलन–

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारा जानेवारी 21–22, 2017 रोजी द्विदिवसीय भारतवर्षीय संस्कृत संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.सदर कार्यक्रम आमदार निवास सिव्हिल लाईन नागपूर येथे पाच सत्रांमध्ये सम्पन्न झाला. दि. 21 जानेवारी 2017 रोजी स. 9.30 वाजता मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांच्या अध्यक्षतेत संमेलनाचे उद्घाटन वसंतराव देशपांडे सभागृहात झाले. उद्घाटन समारंभात **उद्घाटक म्हणून व्ही एन्. आय टी. नागपूरचे अध्यक्ष मा. श्रीमान विश्रामजी जामदार** तसेच **विशेष अतिथी म्हणून विभागीय आयुक्त मा. श्री. अनुपकुमार** उपस्थित होते. या प्रसंगी कार्यक्रम समन्वयक डॉ. नन्दा पुरी, सहसमन्वयक डॉ. कविता होले, विश्वविद्यालयाचे बी.पीडी. संचालक डॉ. विजयकुमार उपस्थित होते. संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी विश्वविद्यालयाद्वारे प्रकाशित होणा–या पुस्तकांची ग्रंथदिंडी काढण्यात आली व सदर पुस्तकांचे विमोचन करण्यात आले. सदर उद्घाटन सत्राचे संचालन डॉ. पराग जोशी व डॉ. रेणुका बोकारे यांनी केले. या भारतवर्षीय संस्कृतसंमेलनात उद्घाटनप्रसंगी विश्वविद्यालयाची एकूण 06 पुस्तके प्रकाशित झाली.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुस्तकांचे प्रकाशन झाले.. यात मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांचे 'संमहिंस्रग्धरा' पुस्तक प्रकाशित झाले. विभागाच्या मा. विभाग प्रमुख डॉ. नंदा पुरी यांचेही ''शोधमुक्तावली'' हे पुस्तक प्रकाशित झाले. तसेच विभागाच्या सहयोगी प्राध्यापिका डॉ. कविता होले यांचे ''गुलाबराव महाराजांचे भारतीय दर्शन'' व सहा. प्राध्यापक डॉ. राजेन्द्र जैन यांचे 'भासोऽहास' हे पुस्तक प्रकाशित झाले.

संमेलनाच्या शोधनिबंध वाचन प्रथम सत्रात वैदिक साहित्यातील संशोधन व व्याकरणविषयक संशोधनाच्या अपेक्षा या दोन विभागांमध्ये शोधपत्रांचे वाचन विद्यार्थ्यांनी केले. निबंध सत्राचे अध्यक्षपद डॉ. शारदा गाडगे तसेच सत्रसंचालन डॉ. राजेन्द्र जैन यांनी केले. द्वितीयनिबंधवाचनसत्रात वेदांग ज्योतिषातील संस्कृत संशोधन तसेच प्राचीन विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील संशोधने या विषयांवर अनुक्रमे 5 व 8 संशोधकांनी शोधपत्र वाचन केले. तृतीयसत्र संकीर्ण विषयाधारित होते व सत्राचे अध्यक्षपद डॉ. नंदा पुरी तसेच सत्रसंचालन प्रा. हर्षा पाटील यांनी केले होते. सदर सत्र विशेषरूपाने युजीसी नेट परीक्षेत असणाऱ्या विद्यार्थ्याकरिता आयोजित केले होते. विद्यार्थ्यांनी यात शोधपत्र वाचन केले. याप्रकारे एकूण तीन शोधपत्रवाचनसत्रांनी तसेच संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे दि. 21 जानेवारी 2017 रोजीचे कार्यक्रम सम्पन्न झाले. दि. 22 जानेवारी 2017 रोजी स.7.30 वा.सम्मेलनात सहभागींकरिता रामटेक दर्शनाचे आयोजन केले व दु. 1.30 ते 5.00 या कालावधीत चवथ्या व पाचव्या शोधनिबंध वाचन सत्राचे वाचन केले. सदर वाचन सत्रांमध्ये साहित्यातील संशोधनाच्या मर्यादा व अपेक्षा संस्कृतातील शिक्षणविचार या विषयावर तसेच, भारतीय तत्त्वज्ञानातील संशोधन व संस्कृतचे योगदान या विषयांवर शोधार्थींनी शोधपत्र वाचन केले.

संमेलनाचा समापन समारंभ वसंतराव देशपांडे सभागृहात मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेत तसेच समन्वयक, सहसमन्वयक, यांच्या उपस्थितीत सम्पन्न झाला. समापनानंतर सायंकाळी विभिन्न सांस्कृतिक (संस्कृतनाटक–1. धन्योगृहस्थाश्रमः,2. ॐमंगलम्, संस्कृतगीतरामायण) कार्यक्रमांचे आयोजन केले होते. याप्रकारे द्विदिवसीय भारतवर्षीय संस्कृत संमेलनाचे आयोजन समन्वयक डॉ. नन्दा पुरी व सहसमन्वयक डॉ. कविता होले यांच्या समन्वयाने यशस्वीपणे पार पडले.

5) एक दिवसीय राष्ट्रीय संस्कृत परिषद –

राष्ट्रीय संस्कृत संस्थान नवी दिल्ली या संस्थेच्या वतीने आर्थिक अनुदान प्राप्त असलेल्या एक दिवसीय राष्ट्रीय संस्कृत परिषदेचे आयोजन दि. 23 जानेवारी 2017 रोजी विश्वविद्यालयाच्या वतीने देशपांडे सभागृह नागपूर येथे करण्यात आले. सदर परिषदेचा उद्घाटन समारोह मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांच्या अध्यक्षतेत तसेच राष्ट्रीय संस्कृत संस्थान चे प्रा. डॉ. रमाकांत पांडेय यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या दरम्यान परिषदेच्या समन्वयिका डॉ. नंदा पुरी व सहसमन्वयिका डॉ. कविता होले उपस्थित होत्या. डॉ. नंदा पुरी यांनी परिषदेचे प्रास्ताविक तसेच स्वरूप स्पष्ट केले. प्रमुख अतिथींनी परिषदेच्या '' कालिदास साहित्य का परवर्ती साहित्य पर प्रभाव'' या निर्धारित विषयाचे मुक्तकंठाने स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पराग जोशी यांनी केले.डॉ. कविता होले यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

सदर राष्ट्रीय संस्कृत परिषदेत शोधनिबंध सादरीकरण सत्रांचे आयोजन आमदार निवास नागपुर येथे करण्यात आले. उद्घाटन समारोहानंतर दु. 12.00 ते 4.30 या कालावधीत आमदार निवासातील विभिन्न दोन ठिकाणी प्रस्तुत विषयावर

शोधार्थींनी शोधपत्र वाचन केले.महर्षी पाणिनी सभागृहातील सत्राचे अध्यक्षपद डॉ. मृदुला नासेरी यांनी तर सत्र संचालन प्रा. हर्षा पाटील यांनी केले.सदर सत्रात 15 शोधार्थ्यांनी शोधपत्र वाचन केले.भवभूती सभागृहातील सत्रांचे अध्यक्षपद डॉ. स्मिता होटे यांनी तर, सत्र संचालन डॉ. आशा नासरे यांनी केले.परिषदेच्या प्रस्तुत विषयावर 56 शिक्षक व शोधार्थ्यांनी शोधपत्र वाचन केले. एकूण 96 विद्यार्थी व प्राध्यापकांनी या परिषदेत सहभाग घेतला.

6) 21 दिवसीय उत्कीर्णलेखशास्त्र उद्‌बोधन वर्ग

राष्ट्रिय संस्कृत संस्थान, नवी दिल्ली यांच्या आर्थिक अनुदानाने विश्वविद्यालयाच्या संस्कृत भाषा तथा साहित्य पदव्युत्तर विभागाद्वारे दिनांक 25.02.2017 ते 17.03.2017 या कालावधीत 'उत्कीर्णलेखशास्त्र' या विषयावर 21 दिवसांचा उद्‌बोधन वर्ग चालविण्यात आला. या वर्गात विविध विषयांवर 21 व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते.

या उद्‌बोधन वर्गात 20 प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. त्यांच्यासाठी हा वर्ग अतिशय उपयुक्त ठरला. दिनांक 17.03. 2017 रोजी या वर्गाचा समापन समारंभ पार पडला. या समापन कार्यक्रमासाठी एल्.ए.डी. महाविद्यालय, नागपुर येथील संस्कृत विभागप्रमुख डॉ. स्मिता होटे या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. तर अध्यक्षस्थान कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांनी भूषविले. संस्कृत साहित्याच्या विभागप्रमुख डॉ. नन्दा पुरी याही मंचावर उपस्थित होत्या. समन्वयक म्हणून डॉ. कविता होले यांनी कार्य पार पाडले.

"अशाप्रकारच्या उद्‌बोधन वर्गामुळे विद्यार्थी प्रगल्भ होत जातो व त्यांना नवीन विषयात अवगाहन करणे सोपे जाते" असे विचार डॉ. स्मिता होटे यांनी व्यक्त केले.

डॉ. उमा वैद्य या अध्यक्षीय भाषणात म्हणाल्या की, "विश्वविद्यालय नेहमीच विविध प्रकारच्या कार्यशाळा, सम्मेलन, चर्चासत्र यांचे आयोजन करीत असते. यावेळी राष्ट्रीय संस्कृत संस्थान, नवी दिल्ली यांच्या आर्थिक पाठबळामुळे विश्वविद्यालयाद्वारा या उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करता आले. यामुळे विद्यार्थ्यांना नवीन दिशा मिळून त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा नक्कीच रूंदावल्या असतील."

याप्रसंगी संस्कृत विभागप्रमुख व संकाय प्रमुख डॉ. नन्दा पुरी यांनीही आपले विचार व्यक्त केले. त्या म्हणाल्या, "Inscription" हा विषय एम्.ए. संस्कृतच्या अभ्यासक्रमात आहे. या उद्‌बोधन वर्गामुळे अभ्यासक्रमाचा काही भाग विस्तृत स्वरूपात विद्यार्थ्यांना सांगता येऊ शकला व त्याचा विद्यार्थ्यांनी भरपूर लाभ घेतला.

याप्रसंगी प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना अशाप्रकारचे वर्ग विश्वविद्यालयाने वारंवार आयोजित करावे असे सांगितले.

त्यानंतर प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम पार पडला व समन्वयक डॉ. कविता होले यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. प्रसाद गोखले यांनी केले.

7) गीता प्रवेशिका प्रमाणपत्र अभ्यासक्रम –

संस्कृत भाषा तथा साहित्य विभागाद्वारे या वर्षी विस्तार सेवा मंडळाच्या मदतीने एक नवीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु केला. विद्यार्थ्यांची व समाजाची गीताविषयक आवड लक्षात घेऊन मा. संकाय प्रमुख डॉ. नंदा पुरी यांनी या वर्षी हा अभ्यासक्रम राबविण्याचे ठरविले व पहिल्याच वर्षी यात 15 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन अभ्यासक्रम यशस्वी केला. डॉ. पराग जोशी यांनी या अभ्यासक्रमाचा समन्वयक व अध्यापक म्हणून भूमिका पार पाडली.

8) प्राकृत आगम पदविका अभ्यासक्रम उद्घाटन –

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,(रामटेक) हे संस्कृत सोबतच जुन्या भारतीय भाषा व त्यांच्या साहित्याच्या अध्ययन, अध्यापन व संशोधनात सातत्याने मोलाची भूमिका पार पाडत आहे. यानुषंगाने विश्वविद्यालयाच्या संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकायांतर्गत 'संस्कृतभाषा तथा साहित्यविभागाने प्राकृतभाषा व साहित्याच्या अध्ययन–अध्यापन व संशोधनाच्या दृष्टीने 'प्राकृत आगम पदविका' (Agam Diploma in Prakrit) हा नवीन अभ्यासक्रम सुरू केला. त्याचा उद्घाटन समारंभ दि. 24.09.2016 रोजी पार पडला या निमित्ताने प्राकृतचे आन्तरराष्ट्रीय ख्यातीचे व राष्ट्रपतिपुरस्काराने सम्मानित विद्वान् मा.डॉ. भागचंद्रजी जैन यांचे 'प्राकृतभाषा–साहित्य व आजच्या युगातील त्याचे औचित्य' याविषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले. समारोहाच्या अध्यक्षस्थानी संकाय व विभागाच्या प्रमुख मा.डॉ. नंदा पुरी उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वालन व सरस्वती वंदनेने झाली. डॉ.भागचंद्रजी जैन यांनी संस्कृतविद्यार्थ्यांकरिता प्राकृतचे सामीप्य समजावून देत दोन भाषांमधील असलेला अतूट संबंध व स्वरूप समजावून सांगितले तसेच प्राकृत भाषेतील भावी शोधकार्याबद्दल मार्गदर्शन केले. मा. अध्यक्षा डॉ. नंदा पुरी यांनी अध्यक्षीयभाषणात व्याख्याते डॉ. जैन यांच्या भाषणाचा आढावा घेत संस्कृतभाषा व साहित्यासोबत प्राकृतभाषा व साहित्याध्ययनाची तसेच संशोधनाची नितांत आवश्यकता दर्शविली.

समारोहात विश्वविद्यालयातील संकायप्रमुख, विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग तसेच विद्यार्थीवर्ग बहुसंख्येने उपस्थित होता. विभागातील सहयोगी प्राध्यापिका डॉ. कविता होले यांनी मान्यवरांचे तसेच उपस्थितांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन व समन्वयन डॉ. राजेन्द्र जैन यांनी केले.

9) ग्रंथालय भेट –

नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता ग्रंथालय व ग्रंथालयातील पुस्तकांविषयक अपेक्षित माहिती मिळण्याकरिता ग्रंथालय भेटीचे आयोजन करण्यात आले. ग्रंथालय भेटीने विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथालयातील पुस्तकांविषयक माहिती व जागृती निदर्शनास आली. पुस्तकांचे आदान – प्रदान करण्याबाबत ज्ञान मिळाले.

10) अभिनव गुप्त व संस्कृतसाहित्य योगदानविषयक विशेषव्याख्यान–

विश्वविद्यालयाच्या संस्कृत भाषा तथा साहित्यविभागाच्या वतीने साहित्यविद्येच्या अनवरत प्रचार व प्रसाराकरिता दि. 17. 08.2016 रोजी विशेष व्याख्यानाचे आयोजन केले. विशेष व्याख्यानाकरिता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संस्कृत व प्राकृत भाषा विभागातील प्रा.डॉ.दिनेश रसाळ यांना निमन्त्रित करण्यात आले होते. विशेषव्याख्यान कार्यक्रमाचा आरंभ

दीपप्रज्वालन व सरस्वती वंदनेने झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी मा. संकायप्रमुख व विभागप्रमुख डॉ. नन्दा पुरी होत्या. प्रा. डॉ. दिनेश रसाळ यांनी सहस्राब्दिनिमित्ताने "संस्कृतसाहित्यात अभिनवगुप्ताचार्यांचे योगदान" या विषयावर व्याख्यान दिले. यांनी अभिनवगुप्तांचे संस्कृतसाहित्यातील तसेच दर्शनशास्त्रातील मोलाचे योगदान विशद केले. मा.अध्यक्षांनी व्याख्यात्यांच्या भाषणाचा आढावा घेत साहित्यातील अभिनवगुप्ताची मौलिक कामगिरी विशद केली. कार्यक्रमात विश्वविद्यालयाचे संकायप्रमुख, विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. उपस्थितांचे आभार डॉ. कविता होले यांनी मानले तसेच संचालन डॉ. पराग जोशी यांनी केले.

11) प्राकृतभाषा व साहित्यविषयक विशेष व्याख्यान–

कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या संस्कृतभाषा तथा साहित्यविभागाने नव्याने प्रारंभ केलेल्या आगम पदविका –प्राकृत या अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने विभागाद्वारे दि. 27.03.2017 रोजी विशेषव्याख्यानाचे आयोजन केले होते. विशेषव्याख्यान कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कृत तथा संस्कृतेतरभाषासंकायाचे मा. अधिष्ठाता डॉ. नंदा पुरी होत्या. विशेषातिथी म्हणून भारतीय तत्त्वज्ञान धर्म व संस्कृती संकायाचे मा. अधिष्ठाता डॉ. मधुसूदन पेन्ना होते. विशेषव्याख्याता म्हणून प्राकृतविद्यावाचस्पती डॉ. कुसुम पटोरिया (निवृत्तप्राध्यापिका, नागपुर विद्यापीठ) या होत्या. त्यांनी ''प्राकृतभाषा तथा साहित्याचे प्राचीन भारतीयवाङ्मयाला योगदान या विषयावर व्याख्यान दिले. डॉ.पटोरिया यांनी प्राचीन वाङ्मयात प्रवेश करून संस्कृत व प्राकृत या दोन्ही भाषांचे अवश्यंभावी साहचर्य विशद केले. विशेषातिथी डॉ. पेन्ना यांनी प्राचीनवाङ्मयाच्या समग्र अध्येत्यांसाठी प्राकृतभाषा व साहित्यच्या अध्ययनाची नितांत आवश्यकता व्यक्त केली. प्राकृतभाषेला सोडून भारतीयसंस्कृती व समाजव्यवस्थेचे ज्ञान होणे अशक्य आहे असे त्यांनी मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. नन्दा पुरी यांनी संस्कृतसाहित्याच्या अध्ययनाकरिता प्राकृतभाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले. संस्कृत नाटकांमध्ये, काव्यशास्त्रीय वाङ्मयात तसेच कथादी काव्यग्रंथात ठिकठिकाणी प्राकृतभाषांमधील उदाहरणे व उद्धरणे असतात. त्यांचा त्याच भाषेत अभिनय करणे किंवा भाव समजणे अपेक्षित असते. निष्कर्षतः वाङ्मयाच्या परिपूर्ण रसास्वादनाकरिता प्राकृतभाषा अध्ययनाची नितांत आवश्यकता असल्याचे डॉ. नन्दा पुरी यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचा आरंभ प्राकृतभाषेतील सरस्वतीवंदनेने झाला. डॉ. राजेन्द्र जैन यांनी आगम पदविका प्राकृत' या अभ्यासक्रमाचे प्रास्ताविक व इतिवृत्त कथन केले. अभ्यासक्रमाच्या सफलतेकरिता अतिरिक्त वेळ काढून अध्यापन केलेल्या डॉ. शिवराम भट, डॉ. जयवंत वौधरी तसेच डॉ. राजेन्द्र जैन यांचा सत्कार व सम्मान कार्यक्रमाच्या अध्यक्षांनी केला. विभागाच्या सहयोगी प्राध्यापिका डॉ. कविता होले यांनी विशेषव्याख्यात्यांचा सविस्तर परिचय विशद केला. तसेच, डॉ. पराग जोशी यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन व संयोजन डॉ. राजेन्द्र जैन यांनी केले.

12) मराठी भाषा दिवस विशेष व्याख्यान –

विश्वविद्यालयात मराठी भाषादिनाचे आयोजन कविकुसुमाग्रजांच्या जन्मदिनी करण्यात आले. समारंभाचे अध्यक्षपद मा. विभागप्रमुख डॉ. नंदा पुरी यांनी भूषविले. विशेष व्याख्याते म्हणून विख्यातसाहित्यविद डॉ. अशोक अकलूजकर यांना आमन्त्रित करण्यात आले होते. सहयोगी प्राध्यापिका डॉ. कविता होले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वरूप कथन केले. विशेषव्याख्यात्यांनी संस्कृत व मराठीभाषेच्या साहित्यातील अन्तःसामीप्य सांगत मराठी साहित्याध्ययनाबाबत उपस्थितांना प्रेरित केले. मा. डॉ. नंदा पुरी यांनी मराठी दिनाचे औचित्य साधून संस्कृतप्रेमींकरिता मराठीसाहित्याच्या उपयोगितेबाबत मत व्यक्त केले. प्रा. पराग जोशी यांनी सूत्रसंचालन व आभार व्यक्त केले.

13) विद्यार्थ्यांचे यश, पुरस्कार व बक्षीसे– खालीलप्रमाणे विद्यार्थ्यांनी पुरस्कार व बक्षीसे प्राप्त करून यश संपादित केले .

1. तिरुपती छात्र प्रातिभ समारोह –

तिरुपती येथील राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठात प्रतिवर्षीप्रमाणे गेल्या वर्षी दि. 30.01.2017 ते 02.02.2017 पर्यंत आयोजित झालेल्या 11व्या अखिल भारतीय संस्कृत छात्रप्रातिभ समारोहात कु. गौरी सोनटक्के (एम्.ए.प्रथम वर्ष) हिने एकपात्राभिनय स्पर्धेत भाग घेऊन तृतीयक्रमांक व प्रमाणपत्र पुरस्कार प्राप्त केला. याच स्पर्धामधील संस्कृत गीतगान स्पर्धेमध्ये प्राची भट हिला सांत्वना पुरस्कार व प्रमाणपत्र देण्यात आले. या अखिलभारतवर्षीय स्पर्धामध्ये विभागाच्या कु. माधुरी वैद्य, कु. वृषाली दाणी,कु. दिव्यानी अनमोलवार व कु. वैष्णवी दाभेकर या विद्यार्थिनींनी नृत्यस्पर्धेत पारितोषिक प्राप्त केले. कु. वेदश्री आर्वीकर हिने साहित्यशास्त्र भाषण स्पर्धेत सहभाग घेतला.

2. राष्ट्रीय संस्कृत संस्थान – शास्त्रीय स्पर्धा मुंबई –

राष्ट्रीय संस्कृत संस्थान, मुंबई परिसराद्वारे राज्यस्तरीय शास्त्रीय स्पर्धेचे आयोजन डिसेंबर –2016 मध्ये करण्यात आले होते. या राज्यस्तरीय शास्त्रस्पर्धेत विभागाच्या कु. वेदश्री आर्वीकर (एम. ए. प्रथमवर्ष), भूषण मुळे (विशारद – तृतीय वर्ष), यांनी सहभाग घेऊन प्रथम क्रमांक व सुवर्ण पदक प्राप्त केले. कु. वेदश्री आर्वीकर हिने 'ध्वन्यालोक' ग्रंथाच्या शास्त्रशलाका स्पर्धेत भाग घेऊन राज्य स्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केला व भूषण मुळे याने रामायण (सुन्दरकाण्ड) च्या कण्ठस्थीकरण स्पर्धेत सहभाग घेऊन प्रथम क्रमांक प्राप्त केला.

3. राष्ट्रीय संस्कृत संस्थान – शास्त्रीय स्पर्धा, अगरतला–

राज्यस्तरीय शास्त्र स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या विभागाच्या कु. वेदश्री आर्वीकर व भूषण मुळे यांची निवड राष्ट्रीय स्तरावर होणा–या शास्त्रस्पर्धाकरिता झाली होती. अगरतला येथील राष्ट्रीय संस्कृत संस्थानच्या परिसरात पार पडलेल्या अखिल भारतीय शास्त्रस्पर्धामध्ये विभागाच्या कु. वेदश्री व चि. भूषण यांनी सहभाग घेतला.

4. आन्तरमहाविद्यालयीन स्पर्धा हिस्लॉप कॉलेज, नागपुर –

नागपुर येथील हिस्लॉप महाविद्यालयाद्वारे आयोजित अन्तर्महाविद्यालयीन स्पर्धामध्ये विभागाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन यश प्राप्त केले. संस्कृत एकपात्राभिनय स्पर्धेमध्ये विभागाच्या कु. नौशीन पठान (एम.ए. प्रथम वर्ष) यांनी यशस्वी

सहभाग घेतला. या स्पर्धेत कु. गौरी सोनटक्के (एम.ए. प्रथम वर्ष) यांनी यशस्वी सहभाग घेतला. या स्पर्धेत कु. गौरी सोनटक्के हिला सांत्वना पुरस्कार प्राप्त झाला.

5. **मराठी भाषा गौरव दिन, रामटेक–**

मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय व विद्यासागर महाविद्यालय रामटेकद्वारे आयोजित वादविवादस्पर्धेमध्ये विभागाच्या कु. वेदश्री आर्वीकर हिने सहभाग घेऊन प्रथम पुरस्कार प्राप्त केला. तसेच याच निमित्ताने आयोजित निबंध स्पर्धेमध्ये सौ. सरिता गिल्लुरकर (एम.ए. द्वितीय वर्ष) हिने सहभाग घेऊन पहिले पारितोषिक प्राप्त केले.

6. **राष्ट्रीय संस्कृत परिषद् – (कालिदास परिषद्)–**

क.का.सं.वि. विश्वविद्यालयाद्वारे आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय कालिदास साहित्य परिषदेत विभागाच्या कु. मधुरा कायंदे, रोहिणी देशमुख सौ. अंजली जोशी, कस्तुरी उबगडे इ. विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन पत्रप्रस्तुती केली. यात कु. मधुरा कायंदे व रोहिणी देशमुख ह्यांना उत्तमशोधपत्राचे पारितोषिक प्राप्त झाले.

7. **कार्यशाळा**– गत शैक्षणिक वर्षात विश्वविद्यालयात आयोजित संस्कृत संहितालेखन कार्यशाळा, उत्कीर्णलेख कार्यशाळा व मुद्रितशोधन कार्यशाळेत विभागाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन कार्यशाळेचा लाभ घेतला.

भारतीय दर्शन विभाग

विभागाद्वारे घेण्यात आलेले कार्यक्रम.

1. **आंतरराष्ट्रीय योग दिन**
2. **योग प्रात्यक्षिक वर्ग**
3. **विद्यार्थ्यांचा विविध उपक्रमात सहभाग**

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाचा शैक्षणिक सत्र 2016–17 चा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

01. आंतरराष्ट्रीय योग दिवस – दिनांक 21 जून 2016

केंन्द्र शासन, राज्य शासन आणि आयुष मंत्रालय यांनी निर्गमित केलेल्या निर्देशानुसार कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागातर्फे द्वितीय आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे आयोजन दिनांक 21 जून 2016 रोजी करण्यात आले. हा आंतरराष्ट्रीय योग दिवस रामटेक आणि नागपूर दोन ठिकाणी आयोजित करण्यात आला.

नागपूर येथे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भारतीय दर्शन विभागातर्फे मे आणि जून या महिन्यांमध्ये समाजातील सर्वसामान्यांना योगप्रशिक्षण द्यावे आणि योगाचा प्रचार व प्रसार व्हावा यास्तव एकूण 13 विविध ठिकाणी योगशिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांमध्ये सुमारे 500 शिबिरार्थींना प्रशिक्षण देण्यात आले. या शिबिरांमध्ये योग विभागातील विद्यार्थ्यांनी योगप्रशिक्षक म्हणून कार्य पाहिले.

तसेच द्वितीय आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भारतीय दर्शन विभागाद्वारे योगविषयक निबंध स्पर्धेचे आयोजन सर्वांसाठी करण्यात आले. यात " व्यक्तिमत्त्व विकास आणि योग", "योगशिक्षणाची आवश्यकता" आणि "योग आणि सामाजिक स्वास्थ्य" या विषयांवर निबंध मागविण्यात आले. ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आणि निःशुल्क होती. या स्पर्धेला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक रोख रु. एकहजार आणि प्रमाणपत्र , द्वितीय पारितोषिक रोख रु. सातशे आणि प्रमाणपत्र, तृतीय पारितोषिक रोख रु. पाचशे प्रमाणपत्रांसह देण्यात आले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक सौ. सरिता गिल्लूरकर, द्वितीय क्रमांक सौ. अश्विनी कुलकर्णी, तृतीय क्रमांक श्री. अमीत पाटील यांना प्राप्त केला त्यांना योगदिनाच्या विशेष कार्यक्रमात पारितोषिक आणि प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

प्रत्यक्ष आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या दिवशी नागपूर येथे आयोजित खालील कार्यक्रमांचा अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

अ) **पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,** सकाळी 7.30 ते 08.30 – योग प्रात्यक्षिक वर्ग

ब) **हिंदी मोरभवन** सकाळी 10.00 ते 12.00 – विशेष व्याख्यान व पारितोषिक वितरण

अ) योग प्रात्यक्षिक वर्ग

शासनाने आणि आयुष मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार सकाळी 7.30 ते 08.30 या वेळेत विश्वविद्यालयातील शिक्षकवर्ग, अधिकारीवर्ग, कर्मचारीवर्ग , रा.से.यो. समन्वयक व विद्यार्थी या सर्वांसाठी योगप्रात्यक्षिक वर्गाचे आयोजन करण्यात आले. योगप्रात्यक्षिक आयुष मंत्रालयाने दिलेल्या कॉमन प्रोटोकॉल प्रमाणे घेण्यात आले. विश्वविद्यालयाच्या योग विभागातील प्राध्यापिका कु. सुजाता ना.द्रव्यकार यांनी उपस्थितांचे प्रात्यक्षिक घेतले.

ब) विशेष व्याख्यान व पारितोषिक वितरण

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाद्वारे आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन दिनांक 21 जुन 2016 रोजी सकाळी 10.00 ते 12.00 या कालावधीत मधुरम् सभागृह, हिंदी मोरभवन सीताबर्डी, नागपूर येथे करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुखातिथी म्हणुन योगतज्ज्ञ डॉ. विठ्ठलराव जिभकाटे तसेच विशेषातिथी म्हणून आयडीबीआय बँकेचे डेप्युटी जनरल मॅनेजर श्री. संतोष पोतदार उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विश्वविद्यालयाच्या मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य उपस्थित होत्या. तसेच व्यासपीठावर विश्वविद्यालयाचे मा.कुलसचिव डॉ. अरविंद जोशी आणि कार्यक्रम संयोजक व भारतीय धर्म,तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकायाचे अधिष्ठाता डॉ. मधुसूदन पेन्ना उपस्थित होते.

या कार्यक्रमाला बँक ऑफ इंडिया, शीतलवाडी, रामटेक बँकेने सहप्रायोजकत्व रूपाने रु. 5000/– चे आर्थिक साहाय्य केले.

2. योग प्रात्यक्षिक वर्ग

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या योग विभागातील विद्यार्थ्यांद्वारे या शैक्षणिक सत्रात विविध ठिकाणी योग प्रात्यक्षिक शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

1. **विदर्भ को.ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन हॉल** – दि. 18.11.2016 ते 21.11.2016 या कालावधीत भारतीय दर्शन विभागाच्या सौ. शुभांगी नायब ,श्री. राजेंद्र चौधरी, या विद्यार्थ्यांनी विदर्भ को–ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन हॉल येथे योगप्रशिक्षणाचे आयोजन केले. या प्रशिक्षण वर्गात एकूण 60 प्रशिक्षणार्थींना हे प्रयिाक्षण देण्यात आले.
2. **ओम शनि शिवशक्ती स्वरालय गरुकुल आश्रम रामनगर जि. वर्धा** – दि. 18.11.2016 ते 21.11.2016 या कालावधीत भारतीय दर्शन विभागाच्या श्री. प्रदीप गुप्ता,कु. गुंजन दांडेकर,सौ. संगीता आगरकर इ. प्रशिक्षकांनी एकूण उपस्थित 40 सहभागींकडून योग प्रात्यक्षिक करून घेतले.
3. **अभ्यंकर नगर, नागपूर** – दि. 18.11.2016 ते 21.11.2016 या कालावधीत भारतीय दर्शन विभागाच्या श्रीमती. रुपा व्यास, सौ. निशिगंधा खंडाळकर, या प्रशिक्षकांनी एकूण 45 सहभागींना योग प्रात्यक्षिकाचे प्रशिक्षण दिले.

4. **गांधीसागर गार्डन, महाल नागपूर** – दि. 18.11.2016 ते 21.11.2016 या कालावधीत भारतीय दर्शन विभागाच्या सौ. शुभांगी नायब ,श्री. राजेंद्र चौधरी, श्री. चंद्रकांत देशमुख, कु. सुनिता वधावन, सौ. वर्षा मासुरकर या प्रशिक्षकांनी प्रशिक्षणार्थींनी एकूण उपस्थित 35 सहभागींकडून योग प्रात्यक्षिक करून घेतले.
5. **गोदरेज आनंदम सिटी, नागपूर** – दिनांक 24.05.2017 ते 30.05.2017 या कालावधीत भारतीय दर्शन विभागातील एम.ए. योगशास्त्र अभ्यासक्रमाचे विद्यार्थी श्री. राजेंद्र चौधरी यांनी 34 प्रशिक्षणांर्थींना आसन आणि प्राणायाम यावर प्रशिक्षण दिले.
6. **अंबानगर, सिद्धेश्वर नगर जवळ खरबी, दिघोरी रिंग रोड, नागपूर** – दिनांक 05.05.2017 ते 15.05.2017 या कालावधीत भारतीय दर्शन विभागातील एम.ए. योगशास्त्र अभ्यासक्रमाचे विद्यार्थी सौ. वर्षा जांबुवंत मासुरकर यांनी 10 प्रशिक्षणार्थींना योग प्रात्यक्षिक शिकविले.
7. **हनुमान मंदीर, मार्ग क्र.12, के.डी.के. रोड नंदनवन, नागपूर** – दिनांक 20.05.2017 ते 25.05.2017 या कालावधीत भारतीय दर्शन विभागातील एम.ए. योगशास्त्र अभ्यासक्रमाचे विद्यार्थी सौ. वर्षा जांबुवंत मासुरकर यांनी एकूण उपस्थित 10 सहभागींकडून योग प्रात्यक्षिक करून घेतले.
8. **पुंडलिक महाराज आश्रम नंदनवन व आयुर्वेद ले आउट मिरची बाजार सक्करदरा नागपूर** – दिनांक 16. 06.2017 ते 20.06.2017 या कालावधीत भारतीय दर्शन विभागातील पी.जी.डिप्लोमा इन योगिक सायन्स अभ्यासक्रमाचे विद्यार्थी श्री. चंद्रकांत देशमुख व एम.एम. योगशास्त्र अभ्यासक्रमाचे विद्यार्थी श्री. प्रमोद मालवे यांनी एकूण उपस्थित 12 सहभागींकडून योग प्रात्यक्षिक करून घेतले.
9. **बॅ. शेषराव वानखडे विद्यानिकेतन, म.न.पा. नागपूर** – दिनांक 01.05.2017 ते 15.05.2017 या कालावधीत पी. जी डिप्लोमा इन योगिक सायन्स अभ्यासक्रमाच्या विद्यार्थीनी सौ. वैशाली चिडे यांनी एकूण उपस्थित 12 सहभागींकडून योग प्रात्यक्षिक करून घेतले.
10. **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज क्रिडा प्रशिक्षण स्थळ, संत्रा मार्केट नागपूर** – दिनांक 06.05.2017 ते 10.05. 2017 या कालावधीत भारतीय दर्शन विभागातील पी.जी.डिप्लोमा इन योगिक सायन्स अभ्यासक्रमाचे विद्यार्थीनी श्री. प्रदीप गुप्ता, सौ. सरोज गुप्ता व एम.एम. योगशास्त्र अभ्यासक्रमाचे विद्यार्थी श्री. भरत गुप्ता यांनी एकूण उपस्थित 20 सहभागींकडून योग प्रात्यक्षिक करून घेतले.
11. भारतीय दर्शन विभागातील एम.ए.योगशास्त्र अभ्यासक्रमाच्या कु. माधुरी वानकर यांनी

    अ) आदीलोक महीला बी.एड. महाविद्यालय, गोरेगाव , गोंदिया

    ब) जिल्हा योग असोसिएशन गोंदिया

    क) नगर परिषद गोंदिया

    ड) स्फुर्ती बहुद्देशीय संस्था वरोरा,

    इ) विवेकमंदिर ज्यु. कॉलेज आणि हायस्कुल गोंदिया

    ई) विवेकमंदिर सी.बी.एस.ई. शाळा, गोंदिया,

    फ) मंगलम मुकबधिर शाळा गोंदिया

या एकूण 07 विविध ठिकाणी दिनांक 01.04.2017 ते 17.06.2017 या कालावधीत एकूण उपस्थित 116 सहभागींना योग प्रात्यक्षिक शिकविले.

12. **पद्माताई बर्धन हॉल प्रकाशनगर, खापरखेडा** – भारतीय दर्शन विभागातील एम.ए.योगशास्त्र अभ्यासक्रमाच्या सौ. ज्योती रंगारी यांनी दि. 01.06.2017 ते10.06.2017 या कालावधीत येथे एकूण उपस्थित 15 सहभागींकडून योग प्रात्यक्षिक करून घेतले.
13. **गृहिणी समाज, रामदासपेठ, नागपूर** – भारतीय दर्शन विभागातील एम.ए.योगशास्त्र अभ्यासक्रमाच्या डॉ. निशिगंधा खंडाळकर व पी.जी.डिप्लोमा इन योगिक सायन्स या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी कु.वंदिता मेलग यांनी संयुक्तपणे दिनांक 18.04.2017 ते 24.04.2017 या कालावधीत येथे एकूण उपस्थित 10 सहभागींकडून योग प्रात्यक्षिक करून घेतले.

समाजात योगाचा प्रसार व प्रचार व्हावा यासाठी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या भारतीय दर्शन विभागाद्वारे एकूण 21 ठिकाणी योगशिबिरांचे आयोजन करण्यात आले होते व या शिबिराचा एकूण 496 सहभागींना लाभ झाला.

3. विद्यार्थ्यांचा सहभाग

भारतीय दर्शन विभागातील श्री. राजेंद्र चौधरी, शुभांगी नायब, सुनिता वधावन, माधुरी वानकर या विद्यार्थ्यांनी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे दिनांक 21,22 जाने 2017 रोजी आयोजित भारतवर्षीय संस्कृत सम्मेलनात शोध निबंधाचे वाचन केले व त्यात शुभांगी नायब यांना उत्कृष्ट शोध निबंधाचे पारितोषिक प्राप्त झाले. तसेच विश्वेश्वरय्या राष्ट्रीय प्रौद्योगिक संस्थान, नागपूर, आयुर्वेद व्यासपीठ नागपूर यांच्या द्वारे आयोजित कार्यशाळांमध्ये /परिषदांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला तसेच योग फेडरेशन द्वारे आयोजित योगासन स्पर्धेतही सहभाग नोंदविला.

वेदांग ज्योतिष विभाग

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या प्राचीन भारतीय विज्ञान व मानव्यशास्त्र संकायातील वेदांग ज्योतिष विभागाचा शैक्षणिक सत्र 2016–17 चा वार्षिक अहवाल पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

सप्तदिवसात्मक समाजाभिमुख ज्योतिष – प्रशिक्षण वर्ग

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेदांग –ज्योतिष विभागातर्फे दि. 08.07.2016 ते 14.07.2016 या कालावधीत वेदांग–ज्योतिष व वास्तुविषयक प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. समाजात ज्योतिष व वास्तुविषयासंबंधी असलेले गैरसमज दूर करणे, विभागातील अभ्यासक्रमांची माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचविणे व शास्त्राचा प्रचार व प्रसार करणे हे प्रशिक्षणाचे उद्देश होते. विवरण पुढीलप्रमाणे आहे. **डॉ. कृष्णकुमार पाण्डेय** यांनी "ज्योतिषशास्त्र व वास्तु परिचय, खगोल विज्ञान वास्तु शास्त्र –उत्पत्ती व विकास" या विषयावर व्याख्यान दिले. **डॉ. दिनकर मराठे** यांनी "पंचांग परिचय, भारतातील वेगवेगळया पंचांगांची महिती" या विषयावर व्याख्यान दिले. **डॉ. प्रसाद गोखले** यांनी "मुहूर्त परिचय व कालमान विचार" या विषयावर व्याख्यान दिले. **श्री. राजन केळकर**, नागपूर यांनी "नक्षत्र–राशी–व्यक्ति सम्बन्ध व भाव विचार" या विषयावर व्याख्यान दिले. **डॉ. विनीता फाटक** यांनी "कृष्णमूर्ति पध्दती परिचय, जन्मकुंडली विवेचन" या विषयावर व्याख्यान दिले. **श्री. मुकुंद मोहोलकर**, नागपूर यांनी "संहिता ज्योतिषांतर्गत वृष्टिविचार" या विषयावर व्याख्यान दिले. **श्री. जयवंत फोंडू**, गोवा यांनी "वास्तु विषयक संवाद व विश्वकर्म प्रकाश ग्रंथ परिचय" या विषयावर व्याख्यान दिले. **सौ. बरखा माथुर**, पत्रकार, Times of India , नागपूर यांनी विद्यार्थी व प्राध्यापकांशी संवाद साधला. वरील व्याख्याने दि. 08.07.2016 ते 14.07.2016 दरम्यान झाले. सर्व व्याख्यानांच्या नंतर प्रश्नोत्तर सत्र पण घेण्यात आले. या अभ्यासवर्गात अभियंता, समुपदेशक, शिक्षक, ज्योतिषी व छात्र इत्यादींचा समावेश होता.

समापन कार्यक्रम दि. 14.07.2016

दिनांक 14.07.2016 रोजी विश्वविद्यालयाच्या नागपूर परिसरात प्रशिक्षणाचा समापन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात अध्यक्ष व प्रमुख अतिथी म्हणून विश्वविद्यालयाच्या मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य उपस्थित होत्या व कार्यक्रमाचे समन्वयक व प्राचीन भारतीय विज्ञान व मानव्यशास्त्र संकायाचे अधिष्ठाता डॉ. कृष्णकुमार पाण्डेय उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये सर्व अधिष्ठाता, सर्व विभागांचे विभागप्रमुख, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विभागाचे व प्रशिक्षणासाठी आलेले विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती स्तवनाने झाली. सर्व अतिथींचे स्वागत करण्यात आले. सप्तदिवसीय कार्यक्रमात भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी दोन विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. कृष्णकुमार पाण्डेय यांनी सप्त दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे इतिवृत्त सादर केले. इतिवृत्तानंतर कार्यक्रमाच्या अध्यक्ष व प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या मा. कुलगुरू यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या भाषणात त्यांनी सर्वप्रथम वेदांग ज्योतिष विभागाचे अभिनंदन केले. समाजोपयोगी अशा प्रकारचे कार्यक्रम वारंवार करण्याची सूचना दिली. समाजामध्ये ज्योतिषाविषयी असलेले गैरसमज दूर करण्यासाठी असे उपक्रम अत्यन्त उपयोगी ठरतात असे ही त्यांनी सांगितले. त्यांनतर डॉ.प्रसाद गोखले यांनी धन्यवाद समर्पण केले. सप्तदिवसीय कार्यक्रमात व्याख्यान दिलेल्या सर्वांना धन्यवाद दिले. अशा प्रकारे समापन कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमानंतर सर्वांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. या प्रशिक्षणात एकूण 30 विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

21 दिवसीय उत्कीर्णलेखशास्त्र उद्‌बोधन वर्ग

राष्ट्रीय संस्कृत संस्थान, नवी दिल्ली यांच्या आर्थिक अनुदानाने विश्वविद्यालयाच्या वेदाङ्ग ज्योतिष पदव्युत्तर विभागाद्वारे दिनांक 25.02.2017 ते 17.03.2017 या कालावधीत 'हस्तलिखितशास्त्र' या विषयावर 21 दिवसांचा उद्‌बोधन वर्ग चालविण्यात आला. या वर्गात विविध विषयांवर 21 व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानांच्या नावाची सूची व त्यांनी दिलेल्या व्याख्यानाचा विषय यांची सूची सोबत जोडली आहे.

या उद्‌बोधन वर्गात 20 प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. त्यांच्यासाठी हा वर्ग अतिशय उपयुक्त ठरला. दिनांक 17.03. 2017 रोजी या वर्गाचा समापन समारंभ पार पडला. या समापन कार्यक्रमासाठी एल्.ए.डी. महाविद्यालय, नागपूर येथील संस्कृत विभागप्रमुख डॉ. स्मिता होटे या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. तर अध्यक्षस्थान कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांनी भूषविले. वेदाङ्ग ज्योतिष विभागाचे विभागप्रमुख डॉ. कृष्णकुमार पाण्डेय हेही मंचावर उपस्थित होत्या. समन्वयक म्हणून डॉ. प्रसाद गोखले यांनी कार्य पार पाडले.

"अशाप्रकारच्या उद्‌बोधन वर्गामुळे विद्यार्थी प्रगल्भ होत जातो व त्यांना नवीन विषयात अवगाहन करणे सोपे जाते" असे विचार डॉ. स्मिता होटे यांनी व्यक्त केले.

डॉ. उमा वैद्य या अध्यक्षीय भाषणात म्हणाल्या की, "विश्वविद्यालय नेहमीच विविध प्रकारच्या कार्यशाळा, सम्मेलन, चर्चासत्र यांचे आयोजन करीत असते. यावेळी राष्ट्रीय संस्कृत संस्थान, नवी दिल्ली यांच्या आर्थिक पाठबळामुळे विश्वविद्यालयाद्वारा या उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करता आले. यामुळे विद्यार्थ्यांना नवीन दिशा मिळून त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा नक्कीच रूंदावल्या असतील."

याप्रसंगी वेदाङ्ग ज्योतिष विभागाचे विभागप्रमुख डॉ. कृष्णकुमार पाण्डेय यांनीही आपले विचार व्यक्त केले.

याप्रसंगी प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना अशाप्रकारचे वर्ग विश्वविद्यालयाने वारंवार आयोजित करावे असे सांगितले.

त्यानंतर प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम पार पडला व समन्वयक डॉ. प्रसाद गोखले यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. दिनकर मराठे यांनी केले.

भास्कराचार्य व्याख्यानमाला

क. का. संस्कृत विश्वविद्यालयातील, प्राचीन भारतीय विज्ञान व मानव्यशास्त्र संकायान्तर्गत वेदांग ज्योतिष विभागाद्वारे भास्कराचार्य यांच्या 900 व्या जन्मशताब्दी वर्षाच्या अनुषंगाने वर्ष 2014–15 पासून भास्कराचार्य व्याख्यानमाला प्रारंभ करण्यात आली होती. या कार्यक्रमाकरीता प्रेरणा मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांचेकडून प्राप्त झाली. ज्योतिष विभागातर्फे भास्कराचार्य व्याख्यानमालेअंतर्गत **"ज्योतिष व वास्तुशास्त्र की प्रासंगिकता"** या विषयावर **दि. 17.03.017 रोजी** विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. उद्‌घाटन व्याख्यान डॉ. कृष्णकुमार पाण्डेय, अधिष्ठाता तथा विभाग प्रमुख, यांनी केले. विशेष व्याख्यान डॉ. विनोदकुमार शर्मा, विभागप्रमुख, जगद्‌गुरू रामानंदाचार्य संस्कृत विश्वविद्यालय, जयपुर, राजस्थान यांनी दिले. धन्यवाद ज्ञापन डॉ. प्रसाद गोखले यांनी केले. विशेषतः प्रश्नोत्तर सत्राचे आयोजन डॉ. दिनकर मराठे, सहायक प्राध्यापक यांनी केले. या व्याख्यानान्तर्गत 50 प्रतिनिधींनी भाग घेतला. या कार्यक्रमाचे संचालन डॉ. दिनकर मराठे आणि प्राध्यापक डॉ. प्रसाद गोखले यांनी या कार्यक्रमाची पूर्ण व्यवस्था केली. उपरोक्त व्याख्यानाचा

जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. ही व्याख्यानमाला प्रख्यात आचार्य भास्कराचार्य यांना शब्दसुमनांजली म्हणून अर्पित केला गेला. या व्याख्यानमालेमध्ये सर्व संकाय, शैक्षणिक विभाग आणि प्रशासकिय विभाग, व इतर विभागांचे सहकार्य प्राप्त झाले.

व्याख्यान माले अन्तर्गत व्याख्यान सूची –

1) डॉ. विनोदकुमार शर्मा – ज्योतिष व वास्तुशास्त्र की प्रासंगिकता
2) डॉ. कृष्ण कुमार पाण्डेय – आचार्य भास्कर का ज्योतिष में योगदान
3) डॉ. दिनकर मराठे – दकार्गल – जलसमस्या का समाधान
4) डॉ. प्रसाद गोखले – ज्योतिषीय कालगणना का महत्त्व
5) डॉ. दीपक देशपांडे – दैनिक जीवन में ज्योतिष
6) डॉ. कृष्ण कुमार पाण्डेय – वर्तमान में ज्योतिष के प्रति सामाजिक दृष्टिकोण
7) वरिष्ठ छात्रोंद्वारा त्रिस्कन्ध ज्योतिष पर स्वगत प्रदर्शन

सप्तदिवसीय लघुपराशरी कार्यशाळा

(21.03.2017 ते 27.03.2017)

क.का. संस्कृत विश्वविद्यालयातील, प्राचीन भारतीय विज्ञान व मानव्यशास्त्र संकायान्तर्गत वेदांग ज्योतिष विभागाद्वारे **दि. 21.03.2017 ते दि. 27.03.2017** या कालावधीत विश्वविद्यालय परिसरात दुपारी 01.00 ते 03.00 या वेळेत सप्तदिवसीय **लघुपराशरी** ग्रन्थावर (पङित अध्ययन) कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

'कलौ पाराशरी स्मृता' या वाक्यानुसार प. लघुपराशरी ग्रन्थांचे महत्त्व व प्रासंङिगकता लक्षात घेता या कार्यशाळेचे आयोजन करण्याचा मुख्य उद्देश्य होता. कार्यशाळा आयोजनाची प्रेरणा मा. कुलगुरू, डॉ. उमा वैद्य द्वारे प्राप्त झाली. या कार्यशाळेमध्ये सम्पूर्ण व्याख्यान व विश्लेषणात्मक कार्य डॉ. कृष्णकुमार पाण्डेय, यांनी केले. विभागीय सर्व प्राध्यापक डॉ. दिनकर मराठे, डॉ. प्रसाद गोखले व डॉ. दीपक देशपांडे सहभागी होते. कार्यशाळा समापन कार्यक्रमामध्ये डॉ. ज्ञानेश्वर कुळकर्णी यांनी उद्‌बोधन केले. सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान केले गेले.व्याख्यानान्तर्गत 28 प्रतिभागींनी भाग घेतला. विभागातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी कार्यशाळेचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. कृष्णकुमार पाण्डेय, अधिष्ठाता, होते. या व्याख्यानमालेमध्ये सर्व संकाय, शैक्षणिक विभाग आणि प्रशासकीय विभाग, व इतर विभागांचे सहकार्य प्राप्त झाले. कार्यशाळेमध्ये पुढील बाबीनुसार कार्यक्रम पूर्ण केले गेले. 1) सम्पूर्ण मूल ग्रंथ (श्लोक) पठण प्रतिदिन 2) सम्पूर्ण श्लोकाचे व्याख्यान व मतमतान्तर 3) फलित सूत्रांचे सिद्धान्त व गणितीय विश्लेषण 4) सूत्रांचे जातक चक्रावर प्रयोग 5) प्रश्नोत्तर 6) सर्व प्रतिभागींचे संवादात्मक (चर्चाद्वारे) समावेश 7) चर्चाद्वारे प्राप्त निश्चित निष्कर्षाचे शास्त्रीय पक्ष

शैक्षणिक सहल

कमला नगर, अमरावती रोड, नागपूर येथील

निर्माणाधीन प्रकल्पाचे (Flat Scheme) वास्तुशास्त्रदृष्टया परिशीलन

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या वेदांग ज्योतिष विभागाद्वारे दि. 25.02.2017 रोजी कमला नगर, अमरावती रोड, नागपूर येथे निर्माणाधीन प्रकल्पाचे (Flat Scheme) वास्तुशास्त्रीय दृष्टिकोणातून परिशीलन करण्यासाठी भेट देण्यात आली. यामध्ये वास्तु डिप्लोमा अभ्यासक्रमांतर्गत 37 विद्यार्थी व वेदांग ज्योतिष विभागाचे सर्व प्राध्यापक यांचा समावेश होता. डॉ. कृष्णकुमार पाण्डेय यांच्या मार्गदर्शनात भूमिपरीक्षण, दिक्निर्णय मातीचे परीक्षण, भूगर्भजलज्ञान परीक्षणाचे प्रात्यक्षिक करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी संपूर्ण प्रकल्पाचे वास्तुशास्त्रीय दृष्टिकोणातून परिशीलन केले व सर्व विद्यार्थ्यांनी भेटीचा अहवाल सादर केला. प्रात्यक्षिक व प्रायोगिक पध्दतीने सर्व आवश्यक विषयांचे प्रस्तुतीकरण झाल्यामुळे हा उपक्रम सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी उपयोगी सिध्द झाला.

विद्यापीठीय अन्य कार्याची जवाबदारी –

डॉ. कृष्णकुमार पाण्डेय – 1. समन्वयक पी.एच.डी कोर्सवर्क **2.** समन्वयक –PET Committee

3. अध्यक्ष – वेदांग ज्योतिष अभ्यास व वास्तु मंडळ व संकाय मंडळ

डॉ. दिनकर मराठे – समन्वयक – M.Phil., NSS कार्यक्रम अधिकारी

डॉ. प्रसाद गोखले – समन्वयक – हस्तलिखित स्रोत केंद्र रामटेक.(MRC)

कार्यभार – 2016–17 या शैक्षणिक सत्रात वेदांग ज्योतिष विभागात एकूण 114 तासांचा कार्यभार होता. व प्रत्यक्ष प्राध्यापकांची संख्या 4 होती.

विद्यार्थी संख्या – या शैक्षणिक वर्षात वेदांग ज्योतिष विभागातील एकूण विद्यार्थी संख्या 96 होती.

अभ्यासक्रम – या शैक्षणिक वर्षात एम. फिल. वेदांग ज्योतिष ,बी.ए. वेदांग ज्योतिष, एम. ए. वेदांग ज्योतिष, पी.जी. डिप्लोमा इन वेदांग ज्योतिष, व वास्तुशास्त्र पदविका हे अभ्यासक्रम चालविण्यात आले होते.

विद्यार्थ्याची उपलब्धी – बी.ए. तृतीय वर्षाचा विद्यार्थी अनुप शर्मा हयाने तिरुपतीतील संस्कृत छात्रप्रतिभ समारोहात ज्योतिष भाषण व एकांकिकेमध्ये भाग घेतला

शिक्षणशास्त्र विभाग

शिक्षणशास्त्र विभागात शैक्षणिक सत्र 2016–17 मध्ये खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

1) एम्.एड् आंतरवासिता उद्बोधन : जुलै 07, 2016

आंतरवासिता कार्यक्रमात एम.एड च्या विद्यार्थी शिक्षकांना कराव्या लागणा–या कृतीतीविषयी त्यांना आकलन व्हावे या उद्देशाने एम.एड आंतरवासिता कार्यक्रम उद्बोधन वर्गाचे जुलै 07, 2017 रोजी आयोजन करण्यात आले होते. या उद्बोधन वर्गात पुढील घटकांवर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले.

1. पाठ नियोजन – डॉ कीर्ती सदार
2. व्यष्टी अभ्यास – प्रा. इंदुमती भारंबे
3. पाठ निरीक्षण – प्रा. इंदुमती भारंबे
4. वर्ग कसोटीचे नियोजन व प्रशासन – डॉ. हृषिकेश दलाई
5) प्रार्थना, परिपाठ व उपस्थिती – डॉ. अमोल मांडेकर
6) सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन – डॉ. राजश्री मेश्राम
7) सर्वसामान्य ओळख व नोंदी – प्रा. अनघा आंबेकर

2) शैक्षणिक संशोधन पध्दती कार्यशाळाः जानेवारी 07, 2017

एम.एड व एम.फिल च्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय शैक्षणिक संशोधन पध्दती कार्यशाळा जानेवारी 07, 2017 रोजी आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुत कार्यशाळेत संशोधन उपागम, संशोधन पध्दती व संकलित माहितीचे विश्लेषण या घटकांवर चर्चा करण्यात आली. डॉ. इंदुमती भारंबे व डॉ. कीर्ती सदार यांनी या कार्यशाळेत तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले.

3) संशोधन अहवाल लेखन कार्यशाळाः फेब्रुवारी 11, 2017

एम.एड आणि एम.फिलच्या विद्यार्थ्यांसाठी फेब्रुवारी 11, 2017 रोजी संशोधन अहवाल लेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते सदर कार्यशाळेत संशोधन अहवाल लेखनाची गरज, अहवालाचे सर्वसामान्य प्रारूप, अहवालातील प्रारंभिक विभाग, प्रमुख विभाग आणि संदर्भ विभाग याविषयी विभागातील सर्व प्राध्यापकांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

कविकुलगुरू कालिदास अध्यापक महाविद्यालय, नागपूर

कविकुलगुरू कालिदास अध्यापक महाविद्यालय, नागपूर. यांचे द्वारे शैक्षणिक सत्र 2016–17 खालीलप्रमाणे कार्यक्रम राबविण्यात आले.

1) **दहा दिवसीय शैक्षणिक शिबिरः–** अध्यापक महाविद्यालयाद्वारे दि. 24.09.2016 ते दि. 03.10.2016 या कालावधीत दहा दिवसीय शैक्षणिक शिबिराचे आयोजन महात्मा ज्योतिबा फूले माध्यमिक शाळा सुराबर्डी, नागपूर येथे आयोजित करण्यात आले होते. याअंतर्गत अनेक शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आले. यात विद्यार्थ्यांची चार गटात विभागणी करण्यात आली त्यात गट क्र 1 च्या समन्वयक प्रा. हर्षा पाटील होत्या, गट क्र 2 च्या समन्वयक प्रा. आशा नासरे होत्या, गट क्र 3 च्या समन्वयक डॉ. जयश्री भगत, गट क्र 4 च्या समन्वयक प्रा. वैशाली सांबरे हया होत्या. गट क्र 03 अंतर्गत डॉ. ललिता चंद्रात्रे अधिष्ठाता शिक्षणशास्त्र विभाग यांचे 'स्त्री भ्रूणहत्या' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. तसेच डॉ. इंदुमती भारंबे विभाग प्रमुख शिक्षणशास्त्र विभाग यांचे स्पर्धात्मक परीक्षा आणि मार्गदर्शन व समुपदेशन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्‌घाटन प्रसंगी श्री विजय पिसे मुख्याध्यापक, महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक शाळा सुराबर्डी, नागपूर तसेच डॉ.हृषिकेश दलाई प्राचार्य, कालिदास अध्यापक महाविद्यालय, नागपूर. व शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन कु. कीर्ती गुलालकर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री भरत आगे या विद्यार्थ्यांनी केले.

दि.25.09.2016 रोजी या शिबिराअंतर्गत गट क्र 04 च्या विद्यार्थ्यांनी श्रमसिद्धी अंतर्गत महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक शाळेचे पटांगण स्वच्छ केले. दि. 26.09.2016 रोजी पर्यावरण जागृती अंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम साजरा करण्यात आला तसेच दि.27.09.2017 रोजी स्वच्छता अभियान रॅली काढण्यात आली. गट क्र 03 च्या विद्यार्थ्यांनी दि. 28.09.2016 रोजी कुटुंब नियोजन या विषयावर सर्वेक्षण केले. दि. 29.09.2016 रोजी पाणी वाचवा या विषयावर जनजागृती करण्यात आली. तसेच दि. 30.09.2016 रोजी विद्यार्थ्यांनी पथनाट्य आयोजित केले व दि. 02.10.2016 रोजी एनएसएस च्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथे रॅली काढण्यात आली. दि. 03.10.2016 रोजी या शिबिराचे समापन करण्यात आले. या शिबिरात शिक्षक व विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्वक सहभाग घेतला.

2) हस्तकला कार्यशाळा :– अध्यापक महाविद्यालयाद्वारे हस्तकला कार्यशाळेचे दि.14.10.2016 रोजी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाकरिता व्याख्याता म्हणून सुरभी कला प्रशिक्षण संस्थेचे श्री संदीप देशमुख व श्रीमती ममता देशमुख यांना आमंत्रित करण्यात आले होते. यांनी विद्यार्थ्यांना कँडल तयार करणे, पोस्टर तयार करणे, ग्रीटींग कार्ड बनविणे, मातीपासून विविध कलात्मक वस्तू बनविणे इ. अनेक विषयांवर प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संचालन श्री. सखाराम पितळे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीमती संपदा पाळधीकर या विद्यार्थ्यांनी केले.

3) **सावित्रीबाई फुले जयंतीः–** अध्यापक महाविद्यालयाद्वारे दि.03.01.2017 रोजी सावित्रीबाई फुले जयंती डॉ. ललिता चंद्रात्रे अधिष्ठाता शिक्षणशास्त्र विभाग यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन करून साजरी करण्यात आली.या कार्यक्रमांतर्गत वादविवाद सपर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन श्री.वितराग वासवाडे यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. वैदेही कुळकर्णी या विद्यार्थ्यांनी केले.

4) **ईपीसी कार्यशाळाः**— अध्यापक महाविद्यालयाद्वारे दि.27.02.2017 ते दि. 01.03.2017 या कालावधीत चतुर्थ सत्र विद्यार्थ्यांची तीन दिवसीय ईपीसी कार्यशाळेचे आयोजित करण्यात आली डॉ. उशोशी गुहा यांचे जीवनकौशल्य या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. डॉ. अर्चना अलोणी यांचे व्यक्तिमत्व विकास या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. तसेच प्रा.सुजाता द्रव्यकार यांनी योग आणि आसन व श्री.राजीवरंजन मिश्रा यांन संगणक कार्यक्रम या विषयावर व्याख्यान दिले. प्राध्यापिका वैशाली सांबरे यांनी विविध व्याख्यानांचे आयोजन केले तर प्रा. हर्षा पाटील यांनी इंग्लिश भाषा विकास कार्यक्रमांतर्गत व्याख्यानाचे आयोजन केले. डॉ. जयश्री भगत यांनी संगणक विषयांवर तर प्रा. आशा नासरे यांनी बोधपट चित्रपटांचा आढावा या विषयांवर मार्गदर्शन केले.

5) **शैक्षणिक सहलः**— अध्यापक महाविद्यालयाद्वारे दि.03.03.2017 रोजी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. ही सहल बाबा आमटे द्वारा स्थापित आनंदवन आश्रम, वरोरा, येथे नेण्यात आली होती. मुलांनी पदमश्री डॉ. बाबा आमटे व सौ. साधनाताई आमटे यांच्या समाधीचे दर्शन घेऊन संपूर्ण परिसराला भेट दिली. दररोज तीन हजार व्यक्तींच्या भोजनाची व्यवस्था व आधुनिक साधने यांची पाहणी केल्यावर तेथील हातमाग कला, पुस्तक बांधणी, संगीत कक्ष, हस्तकला विभाग, बांधकाम विभाग इ. अनेक विभागांना भेट दिली. तेथील सर्व निराधार व अपंग लोकांना सशक्त लोकांप्रमाणे काम करताना पाहुन विद्यार्थ्यांना त्यांच्यापासून प्रेरणा मिळाली.

विस्तार सेवा अहवाल

राष्ट्रीय सेवा योजना

स्वातंत्र्य पंधरवडा

शैक्षणिक सत्र 2016–17 मध्ये केंद्र शासनातर्फे भारताच्या स्वातंत्र्याला 70 वर्ष पूर्ण झाले असून दिनांक 09 ते 23.08. 2016 या कालावधीत स्वातंत्र्य पंधरवडयाचे आयोजन करण्याबाबत कळविले होते. आजादी 70, याद करो कुर्बानी या आशयाला अनुसरून विविध उपक्रम आयोजित करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. यानुषंगाने क.का. संस्कृत विद्यापीठाच्या शैक्षणिक परिसरातील रा.से.यो. पथकातर्फे एका निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. 'स्वतंत्र भारताच्या विकासात युवकांचे योगदान' या विषयावर निबंध मागविण्यात आले होते. क. का. संस्कृत विश्वविद्यालयाशी संलग्नित विविध महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी सदर स्पर्धेत सहभागी झाले होते.

राज्यस्तरीय विद्यार्थी परिषदेत सहभाग

शैक्षणिक सत्र 2016–17 मध्ये राज्य शासनातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती निमित्य दिनांक 21.08.2016 रोजी एका राज्यस्तरीय विद्यार्थी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. विदर्भातील सर्व विद्यापीठांच्या सहयोगाने नागपूर विद्यापीठाद्वारे या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात क.का. संस्कृत विश्वविद्यालयाच्या रा.से.यो. पथकांतील 50 विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यापीठाचा प्रतिनिधी म्हणून श्री. भूषण टाके यांनी या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचार या विषयाला अनुसरून आपले विचार मांडले. रा.से.यो. स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी , रा.से.यो. समन्वयक व विद्यापीठाचे इतर शिक्षक व अधिकारी या आयोजनात सहभागी झाले होते.

रा.से.यो. स्थापना दिवस दि. 24.09.2016

दिनांक 24.09.2016 रोजी रा.से.यो. स्थापना दिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन विश्वविद्यालयाच्या शैक्षणिक परिसर,एन.आय.टी. संकुल पाचवा माळा,सीताबर्डी नागपूर येथे करण्यात आले होते. विशेष व्याख्यानासाठी VNIT, नागपूर येथील प्राध्यापक विभाग प्रमुख मटेरियल इंजिनियर डॉ. दिलीप पेशवे यांना मुख्य वक्ता म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे बी.पी.डी. संचालक तसेच वेदविद्या संकायाचे अधिष्ठाता डॉ. विजयकमुमार सी.जी. उपस्थित होते. तसेच रा.से.यो. समन्वयक डॉ. हरेकृष्ण अगस्ती उपस्थित होते.

कार्यप्रसिद्धि सप्ताहांतर्गत

1. वैद्यकीय मार्गदर्शन – दिनांक 29.10.2016

रा.से.यो. कार्यप्रसिद्धी सप्तहांतर्गत दिनांक 29.10.2016 रोजी एका वैद्याकीय मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मुख्य वक्ता म्हणून मा. जयश्री धोटे, मलेरिया– फायलेरिया ऑफिसर स्वास्थ्य विभाग, महानगर पालिका, नागपूर उपस्थित होते. कीटकजन्य रोगाचे कारण, समस्या आणि उपाययोजना या विषयावर मा.धोटे यांनी

व्याख्यान प्रस्तुत केले. अध्यक्षस्थानी डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी प्राचीन भारतीय जीवन पद्धतीतील काही महत्वपूर्ण बाबींचा तसेव आध्यात्मिकतेकडे वाटचाल करून उत्तम स्वास्थ्य मिळविण्यास मदत होते असे प्रतिपादन केले. रा.से.यो. समन्वयक डॉ. अगस्ती यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे संचालन रा.से.यो. स्वयंसेविका सरिता गिल्लूरकर हीने केले.

2. वस्त्रदान उत्सव (Joy of Giving)– दि. 24.09.2016 ते 02.10.2016

रा.से.यो. कार्यप्रसिद्धी सप्ताहांतर्गत क.का.संस्कृत विश्वविद्यालयाच्या रा.से.यो. पथक आणि गुंज समाजसेवी संस्था , नागपूर यांच्या संयुक्तविद्यमाने वस्त्रदान उत्सवाचे (Joy of Giving) चे आयोजन करण्यात आले होते. समाजातील ज्या घटकांना लज्जा निवारणासाठीही कपडे भेटत नाही त्यांच्यासाठी विद्यापीठातील सर्व प्राध्यापक, अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांना आवाहन करण्यात आले होते. घरात असलेले जुने किंवा नवीन कपडे तसेच दैनंदिन वापराचे वस्तू दान देण्यासाठी या मोहिम अंतर्गत विनंती करण्यात आली होती. या विनंतीचे गाम्भीर्य लक्षात घेऊन समाजातील दुर्बल घटकांना सुस्थापित करण्यासाठी आपली जबाबदारी सगळयांनी ओळखून कपडे तसे इतर व्यवहार्य वस्तू दान देऊन या मोहिमेस उत्तम प्रतिसाद दिला.

आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन व गांधी जयंती – दि. 02.10.2016

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकातर्फे आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन व महात्मा गांधी जयंतीचे निमित्त साधून दि. 02.10.2016 रोजी नागपूरात एका शोभायात्राचे आयोजन करण्यात आले होते. नागपुरात असलेल्या चार रा.से.यो पथकातील सर्व स्वयंसेवक तसेच विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्ग असे मिळून जवळपास 200 लोकांनी यात सहभाग घेतला.क.का.संस्कृत विश्वविद्यालयाच्या शैक्षणिक परिसरापासून ही शोभायात्र सुरू होऊन व्हेरायटी चौक, पंचशील चौक, लोकमत चौक नागपूर विद्यापीठाच्या ग्रंथालय चौक, झाशीराणी चौक आणि नंतर शैक्षणिक परिसरात पोहचली. शोभायात्रेत विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य, स्वच्छता,पर्यावरण इ. विविध विषयांवर समाजाला संदेश देणारे फलक हाती घेऊन आणि घोषवाक्यांचे उद्‌गार आणि पोस्टरांचे प्रदर्शन करुन या शोभायात्रेकडे सर्वांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांची जय उद्‌घोषाद्वारे संपूर्ण वातावरण दुमदुमून गेला होता. शोभायात्रेच्या शेवटच्या टप्प्यात राष्ट्रगीत आणि अहिंसा व स्वच्छतावर आधारित असलेली शपथ उपस्थितांनी घेतली.

संविधान दिन – दि. 26.11.2016

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या शैक्षणिक परिसरातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे दिनांक 26.11.2016 रोजी संविधान दिनाचे औचित्य साधून कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात रा.से.यो. स्वयंसेवक, इतर विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

हस्तलिखित स्रोत केंद्र, रामटेक

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक येथे राष्ट्रीय पाण्डुलिपी मिशन नवी दिल्ली, यांचे मान्यताप्राप्त हस्तलिखित स्रोत केंद्र, वर्ष 2004 पासून कार्यरत आहे. विदर्भ व मराठवाडा या भागातील हस्तलिखितांच्या माहिती संग्रहणाचे काम व हस्तलिखितांची उपलब्धता व त्यांच्या बद्दलची समाजात जागृती निर्माण करण्याचे काम हस्तलिखित स्रोत केंद्र, रामटेक द्वारा करण्यात येत आहे.

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय रामटेंक व राष्ट्रीय पांडुलिपी मिशन, नवी दिल्ली यांच्या नावे दि. 28.09. 2015 रोजी कराराचे नवीनीकरण करण्यात आले तसेच रु. 4.5 लाख निधी सद्य केन्द्राला प्राप्त झाला आहे.

हस्तलिखितांची माहिती संग्रहण व संग्रहित माहिती राष्ट्रीय पांडुलिपी मिशन नवी दिल्ली यांना पाठवावयाची जबाबदारी हस्तलिखित स्रोत केंद्र, रामटेक ची आहे. तसेच हस्तलिखितांची सूची तयार करणे, माहिती संग्रहित करणे, हस्तलिखितांबद्दलची समाजात जागृती निर्माण करणे इ. सद्यःस्थितीत हस्तलिखित स्रोत केंद्र, रामटेक येथे डॉ. प्रसाद गोखले, सहायक प्राध्यापक, समन्वयक म्हणून सद्यः कार्यरत आहेत.

कार्यशाळा –

हस्तलिखित स्रोत केंद्र, रामटेक व्दारा वर्ष 2016–17 साली लिपी कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत ग्रन्थ, आणि मोडी लिपींचा समावेश होता. या कार्यशाळेत प्रशिक्षक म्हणून डॉ. गोपीकृष्णन रघू कोलकात्ता, डॉ. प्रसाद गोखले, प्रा. मृदुला काळे, प्रा. पल्लवी कावळे होते.

मॅन्युस्क्रिप्ट दिवस –

समाजात हस्तलिखितांबद्दची जागृती निर्माण व्हावी या दृष्टिकोणातूनच हस्तलिखितांची जोपासना करणे ही काळाची गरज या उद्देशाने हा दिवस महत्त्वाचा ठरला.

प्रदर्शिनी – दि. 22.11.2016 रोजी रामटेक येथे हस्तलिखितांची प्रदर्शिनी आयोजित करण्यात आली होती. तसेच विश्वविद्यालयाची विद्यार्थिनी कु. अंबालिका सेठिया यांनी बनविलेली लिपी प्रशिक्षण सामुग्री सुध्दा या प्रदर्शिनीत ठेवण्यात आले होते.

हस्तलिखित पाठयक्रम –

हस्तलिखितांबद्दलचे ज्ञान व संशोधन व्हावे या दृष्टिकोणातून हस्तलिखितशास्त्रात पदविका अभ्यासक्रम पण वर्ष 2016–17 साली चालविण्यात आला होता.

छात्र कल्याण विभाग

1. इंद्रधनुष्य – 2016

इंद्रधनुष्य–2016, 14वा राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सव–2016 हा कार्यक्रम **दि. 05 ते 09 नोव्हेंबर, 2016** या कालावधीत '**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद'** येथे संपन्न झाला, या कार्यक्रमामध्ये कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेकच्या चमूने विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेतला होता. सदर महोत्सवात विविध कला प्रकारामध्ये सहभाग घेण्याकरिता विश्वविद्यालयाच्या एकूण 30 विद्यार्थी आणि प्राध्यापकांचा समावेश होता.

या महोत्सवाचे उद्घाटन समारंभामध्ये प्रमुख पाहुणे मा. रजा मुराद, प्रसिध्द अभिनेता, डॉ. सिध्दार्थ विनायक काणे, कुलगुरू, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर, डॉ. संजय देशमुख, कुलगुरू मुंबई विद्यापीठ, मुंबई, डॉ.बी.ए चोपडे, कुलगुरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, तसेच सदर कार्यक्रमात मा. कुलपती महाराष्ट्र राज्य ह्यांनी मनोनीत केलेले वित्तीय व्यवस्थापन समितीचे समन्वयक, कुलसचिव व इतर अधिकारी मा. डॉ. प्रमोद पाब्रेकर, समन्वयक, निरीक्षक राज्यपाल समितीचे मान्ववर सांस्कृतिक समन्वयक उपस्थित होते .

उपरोक्त युवा महोत्सवात विविध कला व सांस्कृतिक प्रकार मध्ये खालील प्रमाणे विद्यार्थ्याचा समावेश होता.

1) **संगीत विभाग** – पाश्चिमात्त्य गायन

2) **ललितकला विभाग** – अ) ऑन दि स्पॉट पेटिंग ब) कोलाज क) पोस्टर मेकिंग ड) क्ले मॉडेलिंग इ) कारटुनिंग फ) स्पॉट फोटोग्राफी ज) रांगोळी

3) **साहित्य विभाग** – अ) वक्तृत्व स्पर्धा (Elocution) ब) वादविवाद (Debate) क) प्रश्नमंजुषा (Quiz)

4) **रंगमंच कला प्रकार (Theater)** – एकांकिका (One act play) ब) प्रहसन (Skit) क) मूकनाट्य (Mime)

सदर युवा महोत्सवात विविध कला व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले, दि. 09.11.2016 रोजी युवा महोत्सवाचा समारोप पारितोषिक वितरण कार्यक्रम मा . अमृता खानविलकर, सिनेनायिका, डॉ. प्रदीप जबदे, कुलसचिव, प्रा. गजानन सानप, बी.सी.यु.डी. स्वागताध्यक्ष मा. डॉ. प्रमोद पाब्रेकर समन्वयक, निरीक्षक, राज्यपाल समितीचे मान्यवर सांस्कृतिक व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

इंद्रधनुष्य संघव्यवस्थापक डॉ. जयवंत चौधरी हयांचे सहकार्य लाभले या संपूर्ण कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य, मा. कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, तसेच वित्त व लेखा अधिकारी डॉ. रामचंद्र जोशी यांच्या सहकार्यमुळे युवा महोत्सवात यशस्वीरित्या सहभागी होता आले.

2. संक्रमणोत्सव 2017

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक द्वारा दि. 16.01.2017, 17.01.2017 तसेच दि.23.01.2017 या कालावधीत संक्रमणोत्सवाचे आयोजन करण्यात आले. समापन कार्यक्रम नवीन आमदार निवास, सिव्हिल लाईन, नागपूर येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन विश्वविद्यालयाच्या साहित्य विभागाच्या अधिष्ठाता डॉ. नंदा पुरी, डॉ. कविता होले सहयोगी प्राध्यापक साहित्य विभाग व संचालक छात्र कल्याण डॉ. राजश्री मेश्राम यांचे हस्ते करण्यात आले. समापन

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. नंदा पुरी यांच्या प्रस्ताविकाने झाली व विद्यार्थी प्रतिनिधीने मनोगत प्रस्तुत केले. या कार्यक्रमात पदव्युत्तर संस्कृत विभाग, पदव्युत्तर शिक्षणशास्त्र विभाग तसेच कालिदास विश्वविद्यालयाचे अध्यापक महाविद्यालय यांच्या हस्तलिखितांचे अनुक्रमे 'धिषणा, गुलमोहर, तेजस्विनावधितमस्तु' चे प्रकाशन मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या तीन दिवसीय कार्यक्रमात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. **1) वक्तृत्व स्पर्धा 2) स्वरचित कविता वाचन स्पर्धा 3) सलाद डेकोरेशन 4) मेहंदी स्पर्धा 5) पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन स्पर्धा 6) थाली सजावट 7) अंताक्षरी स्पर्धा 8) रांगोळी स्पर्धा** ई.चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विश्वविद्यालयातील विविध अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सदर कार्यक्रमात मा. कुलगुरू, मा. कुलसचिव, मा. परीक्षा नियंत्रक, मा. वित्त व लेखा अधिकारी, मा. संचालक बी.पी.डी तसेच विविध विभागांचे विभाग प्रमुख, अधिष्ठाता, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

क्रीडा विभाग

क्रीडा महोत्सव 2016

20 वा महाराष्ट्र आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव 2016 वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी येथे दि. 27 11.2016 ते 01 12.2016 या कालावधीत संपन्न झाला यात कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या क्रीडा चमूने सहभाग घेतला याचमू मध्ये 12 पुरूष व 05 महिला असे एकूण 17 विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला होता. विद्यार्थी विविध क्रीडा प्रकारामध्ये सहभाग घेतला होता.या चमूमध्ये डॉ. हृषिकेश दलाई संचालक, शारिरीक शिक्षण व श्री प्रवीण कळंबे, सुरक्षा अधिकारी पुरूष संघ व्यवस्थापक तसेच प्रा. हर्षा पाटील महिला संघ व्यवस्थापक म्हणून चमू सोबत उपस्थित होत्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्टपणे क्रीडा महोत्सवात भाग घेतला. तसेच या क्रीडा महोत्सवात समाविष्ट चमूने उत्सफूर्तपणे कामगिरी बजावली.

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

विश्वविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षांतर्गत शैक्षणिक वर्ष 2016–17 मध्ये पुढील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

1) सीबीसीएस पॅटर्न : ऑगस्ट 08, 2016

डॉ. उमेश शिवहरे, परीक्षा नियंत्रक यांचे सीबीसीएस पॅटर्न या विषयावर ऑगस्ट 08, 2017 रोजी व्याख्यान आयोजित केले होते. डॉ. उमेश शिवहरे यांनी सीबीसीएस पॅटर्न राबविण्याची आवश्यकता स्पष्ट केली. त्यांनी सीबीएसएस– संकल्पना, प्रोग्राम, कोर्स, प्रमुख विषय, कोअर सब्जेक्ट, वैकल्पिक विषय, श्रेयांक बिंदू, एसजीपीए आणि सीजीपीए या संकल्पना उदाहरणांसह स्पष्ट केल्या. शेवटी त्यांनी एटीकेटीचे नियम, इन्सेन्टीव्ह मार्कस् व ग्रेस मार्कस् याबद्दल चर्चा केली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. कृष्णकुमार पांडेय (अधिष्ठाता, प्राचीन भारतीय विज्ञान व मानव्यशास्त्र संकाय) हे होते. विश्वविद्यालयातील सर्व शिक्षण व विद्यार्थी प्रस्तुत व्याख्यानास उपस्थित होते.

2) संस्कृत संबंधी स्पर्धा : ऑगस्ट 09, 2016

डॉ. पराग जोशी, सहायक प्राध्यापक यांचे ऑगस्ट 09, 2016 रोजी संस्कृतसंबंधी स्पर्धा या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. सुरुवातीला त्यांनी स्पर्धा परीक्षांचे प्रकार जसे शैक्षणिक स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा व संशोधन स्पर्धा याविषयी स्पष्टीकरण केले. नंतर त्यांनी प्रत्येक प्रकारच्या स्पर्धांची यादी सादर केली आणि स्पर्धेचे स्वरूप व नियमावली सविस्तर स्पष्ट केली. या विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. प्रस्तुत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. नंदा पुरी, अधिष्ठाता, (संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकाय) होत्या.

3) आविष्कार स्पर्धा उद्‌बोधन कार्यक्रम : सप्टेंबर, 2016

राज्यस्तरीय आंतर विद्यापीठ संशोधन परिषद् ' आविष्कार ' या स्पर्धेचे दरवर्षी आयोजन करण्यात येते विद्यार्थी व शिक्षक यांच्यात जाणीव जागरुकता निर्माण व्हावी आणि सहभागी होण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून आविष्कार स्पर्धा उद्‌बोधन कार्यक्रमाचे सप्टेंबर 07, 2017 रोजी आयोजन करण्यात आले होते. डॉ. इंदुमती भारंबे व डॉ. शिवराम भट यांनी अविष्कार संकल्पना , ध्येये व उद्दिष्टे, पात्रता नियम, स्पर्धेसाठी विषय–निवड ई. घटकांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन कक्ष

विश्वविद्यालयाच्या व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन कक्षांतर्गत दि. 13.08.2016 रोजी डॉ. लता लांजेवार, नागपूर यांचे 'स्पर्धा परीक्षा आणि नोकरीच्या संधी' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्या म्हणाल्या ''स्पर्धा परीक्षांसाठी पुस्तकी ज्ञान उपयोगाचे नाही. व्यवसायासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात केली पाहिजे''. स्पर्धा परीक्षा तयारी करण्याचे महत्वाचे तीन टप्पे त्यांनी स्पष्ट केले. माहिती मिळविणे, योग्य मार्गदर्शन मिळविणे आणि अविरत प्रयत्न करणे हे तीन टप्पे यशासाठी अत्यंत आवश्यक असतात. तसेच त्यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी करताना सुदृढ आरोग्य असणे आवश्यक आहे असे सांगितले. त्यासाठी प्राणायाम करावे असे स्पष्ट केले. डॉ. लांजेवार यांनी मुलाखतीला कसे सामोरे जावे या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी SWOT Analysis विषयी सुध्दा मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. इंदुमती भारंबे ह्या होत्या.

मराठी भाषा गौरव दिन अहवाल

महाराष्ट्रातील एकमेव भाषा विद्यापीठ असणा–या कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे रामटेक येथील किंमतकर सभागृहामध्येसोमवार, दि. 27 फेब्रुवारी 2017 रोजी ''मराठी भाषा गौरव दिन'' मोठया उत्साहाने संपन्न झाला. या विशेष कार्यक्रमाला सन्माननीय अतिथी या नात्याने खासदार श्री. कृपाल तुमाने, आमदार श्री. मल्लिकार्जुन रेड्डी, नगराध्यक्ष श्री. दिलीप देशमुख उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रख्यात साहित्यिक आणि सी. पी. अँड बेरार महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. वि. स. जोग आणि विशेष अतिथी या नात्याने नागपुरातील हितवाद या प्रख्यात इंग्रजी दैनिकाचे संपादक श्री. विजय फणशीकर उपस्थित होते. कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांनी समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविले. डॉ. गिरीश सपाटे, डॉ. राजेश शिंगरू, श्री. ऋषिकेश किंमतकर, डॉ. नंदा पुरी, डॉ. रामचंद्र जोशी, डॉ. रेणुका बोकारे या आयोजन समितीच्या सदस्यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

कार्यक्रमाचा प्रारंभ श्री. श्रीपाद अभ्यंकर यांनी अत्यंत भावपूर्णरित्यागायिलेल्या जय जय महाराष्ट्र माझा या गीताने झाला.प्रास्ताविक वित्त व लेखा अधिकारी डॉ. रामचंद्र जोशी यांनी केले.

कुलसचिव डॉ. अरविंद जोशी यांनी खासदार श्री. कृपाल तुमाने, आमदार श्री. मल्लिकार्जुन रेड्डी तसेच नगराध्यक्ष श्री. दिलीप देशमुख यांचा तर कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांनी श्री. विजय फणशीकर आणि डॉ. वि. स. जोग यांचा शाल, श्रीफळ, ग्रंथगुच्छ आणि स्मृतिचिह्न देऊन सत्कार केला.

शीतलवाडी परसोडा या नवनिर्वाचित ग्रामपंचायतीची पहिली सरपंच आणि पहिली महिला सरपंच असा दुहेरी सन्मान प्राप्त करणारी क.का.सं.विश्वविद्यालयाची विद्यार्थिनी कु. योगिता गायकवाड हिची दिल्ली येथील नीती आयोगाच्या बैठकीसाठी महाराष्ट्रातून निवड झाली. केवळ तीन सरपंचांची महाराष्ट्रातून निवड झाली त्यामध्ये रामटेकच्या योगिताचा समावेश आहे. अत्यंत तडफदार व्यक्तिमत्त्व असणा–या योगिताचा कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांच्या शुभहस्ते शाल, श्रीफळ, ग्रंथगुच्छ आणि स्मृतिचिह्न देऊन सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र शासनद्वारा मराठी भाषा गौरव दिनानिमित्त प्रसृत करण्यात आलेली चित्रफीत उपस्थितांना यावेळी दाखविण्यात आली.

खासदार श्री. कृपाल तुमाने यांनी ''मराठी भाषेचा वापर आपण मराठी लोकांनी जाणीवपूर्वक करण्याची गरज असून त्यामुळे मराठी भाषेचा गौरवच वृद्धिंगत होईल. 27 फेब्रुवारी संसदेमध्ये सर्व पक्षांचे मराठी खासदार आवर्जून मराठी भाषेतच बोलतात आणि कामकाजामध्ये मराठी भाषेचाच वापर करतात तसे निवेदनही ते लोकसभा अध्यक्षांना सादर करतात असे सांगितले. यावर सभागृहात उपस्थित मराठी प्रेमींनी टाळयांचा कडकडाट केला. संस्कृत विद्यापीठाने मराठी भाषा गौरव दिनाचा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल त्यांनी मा. कुलगुरूंचे अभिनंदन केले.''

विशेष अतिथी श्री. विजय फणशीकर यांनी आपल्या सहज सुंदर आणि सौम्य वाणीने कवी कुसुमाग्रजांची लहान असताना झालेली भेट सविस्तर उलगडून दाखविली. चार तास कुसुमाग्रजांच्या सहवासात घालविलेले क्षण आणि शब्द, कविता, काव्य हा विचार सविस्तर विशद केला. त्यांनी केलेले काव्यसंस्कार आजही स्मरणात आहेत आणि त्याचा माझ्या

वाङ्मयीन संस्कारांच्या जडण–घडणीत मोलाचा वाटा आहे, हे कृतज्ञतापूर्वक नमूद केले. मनात भावना उचंबळाव्या लागतात, जाळ निर्माण व्हावा लागतो त्याशिवाय कढ येत नाही आणि कढ आल्याशिवाय काव्य निर्माण होत नाही. काव्य हे फक्त कवितेतच नसते तर गद्यातही असते. परा, पश्यन्ती, मध्यमा, वैखरी या चार वाणीच्या प्रकारांचा उलगडा नंतर झाला पण कुसुमाग्रजांनी बालपणीच भाषा, विचार कसे स्फुरतात, आकार धारण कसे करतात, प्रस्फुटित कसे होतात आणि प्रत्यक्ष वाणीचा विषय कसे होतात हे स्पष्ट केले होते. आज आपण इंग्रजी बहुल मराठीत बोलतो; केवळ मराठीत बोलणे हे दुर्मिळ होत आहे. यातून मराठी संस्कार आणि संस्कृती हळूहळू लुप्त होत असल्याचे दिसून येते. मराठीला आपण केवळ भाषिक दर्ज्यापर्यंत सीमित केले आहे. तिची अस्मिता आपल्या मनातून हद्दपार होत आहे; ती टिकविणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. इंग्रजीचा वाढता प्रभाव रोखायचा असेल तर भाषिक अभिवृत्तीचा प्रयास आपल्याकडे अधिक जोरकसपणे व्हायला हवा यावर त्यांनी भर दिला. केवळ गौरवदिनानिमित्ताने तिला माय म्हणणे बरोबर नाही तर उत्स्फूर्तपणे आपल्या रक्तातून, श्वासातून तिच्याबद्दल आपल्याला प्रेम वाटायला पाहिजे; जोपर्यंत मातृभाषा आपल्याला उत्तमरीत्या अवगत होत नाही तोपर्यंत अन्य कोणतीही प्रादेशिक वा इंग्रजी भाषा आपण शिकू शकत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी भाषेचे हे महत्त्व जाणून राज्यव्यवहार कोशाची रचना करवून घेतली होती. त्यामुळे उर्दू, फारसी, अरबी शब्दांचे प्राबल्य कमी झाले. ही दूरदृष्टी असणारे शिवराय हे मराठी भाषेचे खरेखुरे सुपुत्र होते.

प्रमुख अतिथी डॉ. वि. स. जोग यांनी आपल्या भाषणाद्वारे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी केलेल्या भाषाशुद्धीविषयक प्रयत्नांची माहिती उपस्थितांना दिली. ज्ञानेश्वर–तुकाराम यांची मराठी भाषा कधीही मरणार नाही असे सांगून डॉ. जोग पुढे म्हणाले, मातृभाषेतून प्राथमिक शिक्षणाचा आग्रह धरणारे महात्मा ज्योतिबा फुले हे पहिले समाजसुधारक होते. स्वातंत्र्यवीर सावरकर, कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे आणि वि. स. खांडेकर हे कुसुमाग्रजांचे गुरू होते. या गुरूंच्या संस्कारांचा प्रत्यय त्यांच्या कवितांमधून येतो. या तिघांचेही वैचारिक ऋण घेऊन कुसुमाग्रजांची कविता फुलली, बहरली. सावरकरांनी मराठी भाषेला अनेक शब्द दिले – चित्रमंदिर, विद्यापीठ, विश्वविद्यालय, प्राचार्य, प्राध्यापक, आचार्य, ध्वनिमुद्रिका, संकलक, चित्रपटगृह इ. शिवाजी महाराज संस्कृत पंडित होते. मराठीतील अन्य भाषिक शब्दांचा प्रसार थांबविण्यासाठी त्यांनी मराठी शब्दकोशाची निर्मिती करवली. त्यामुळे 85 टक्के असणारे उर्दू, फारसी, अरबी शब्द 30–40 टक्क्यांपर्यंत आले. सावरकरांचा आचार्य शब्द अत्र्यांना इतका आवडला की तो त्यांनी आपल्या आडनावापूर्वी स्वीकारला आणि संपूर्ण महाराष्ट्रात ते आचार्य अत्रे म्हणून सुप्रसिद्ध झाले.''

आमदार श्री. मल्लिकार्जुन रेड्डी यांनी देखील ''मराठी भाषा गौरव दिनानिमित्त उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. तेलगूप्रमाणे मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी सर्वप्रथम ठराव विधानसभेत मांडण्यासाठी आपण पुढाकार घेतल्याचे त्यांनी विशेषत्वाने नमूद केले.''

मराठी भाषेचा प्रचार–प्रसार मोठया प्रमाणावर व्हावा आणि अधिकाधिक लोकांनी यामध्ये सहभागी व्हावे यासाठी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाद्वारा रामटेक आणि नागपूर येथे मराठी ग्रंथप्रदर्शन, मराठी भाषातज्ज्ञाचे व्याख्यान, मोडीलिपी प्रशिक्षण वर्ग, मराठी शुद्धलेखन कार्यशाळा, परिसंवाद, निबंध व वादविवाद स्पर्धा, ग्रंथदिंडी इ. विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या सर्व कार्यक्रमांना रामटेक, देवलापार, पारशिवनी तसेच आसपासच्या परिसरातील शाळा, महाविद्यालये, विद्यार्थी व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मराठी भाषा गौरव दिनाचे निमित्त साधून या सर्व कार्यक्रमांना

साहाय करणा–या आयोजन समिती सदस्य, विविध समित्यांचे पदाधिकारी, शाळा–महाविद्यालयांचे प्राचार्य व मुख्याध्यापक, गणमान्य नागरिक, पत्रकार या सर्वांचा ग्रंथगुच्छ व स्मृतिचिह्न देऊन कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, डॉ. विजयकुमार, संचालक, विद्यापीठ नियोजन विकास मंडळ व डॉ. उमेश शिवहरे, परीक्षा नियंत्रक यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

रामटेक आणि आसपासच्या परिसरातील शाळा–महाविद्यालयांमध्ये निबंध, वादविवाद इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमधील विजेत्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. शालेय गटात साक्षी दमाहे, विशाखा वटे, प्राची चौधरी तर महाविद्यालयीन गटात सरिता गिल्लूरकर, रोहित चरडे, प्रियंका शरणागत आणि खुल्या गटात कल्पेश अग्रवाल, प्रकाश उके, नरेंद्र रहाटे यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकांची पारितोषिके प्रदान करण्यात आली. वादविवाद स्पर्धेत कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेकच्या श्रीवरदा माळगे, वेदश्री आर्वीकर यांना प्रथम तर विद्यासागर महाविद्यालय, रामटेकच्या श्रुतिका बावनकर, अश्विनी गजभिये यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. उमा वैद्य म्हणाल्या, ''महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या या उत्साहपूर्ण पुढाकाराने राज्यात मराठी पर्वाला सुरुवात झाली आहे. मराठीचा उत्कर्ष साधणे म्हणजे मराठी भाषेतील पुस्तकांचे वाचन वा प्रकाशन एवढयापुरते मर्यादित ठेवून चालणार नाही तर विविध भाषांतील उत्तमोत्तम साहित्याचा मराठीत आणि मराठीतील उत्तमोत्तम साहित्याचा विविध भाषांमध्ये अनुवाद करणे होय. आज मराठी संस्कृत इंग्रजी या तीनही भाषांचे लोक या कार्यक्रमाच्या निमित्ताने व्यासपीठावर एकत्र आले आहेत ते या भाषांमधील परस्पर सहभाव आणि सौहार्द व्यक्त करण्यासाठीच! मराठी आणि संस्कृतचे नाते तर पणजी–पणतीचे आहे. संस्कृत–मराठी अभ्यासकांना एकमेकांच्या भाषेबद्दल अपार प्रेम आणि आदरभाव आहे आज त्याची जपणूक यानिमित्ताने होत आहे. आपल्या रक्तातून, वाणीतून व लेखणीद्वारे मराठीला तिचे पूर्ववैभव मिळवून देण्याचा संकल्प यानिमित्ताने आपण करू या असे आवाहनही डॉ. वैद्य यांनी केले. ''

कार्यक्रमाचे संचालन श्री. सुमीत कठाळे आणि डॉ. रेणुका बोकारे यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. अरविंद जोशी यांनी मानले. कार्यक्रमाची समाप्ती श्री. श्रीपाद अभ्यंकर यांनी गायिलेल्या पसायदानाने झाली. कार्यक्रमाला विश्वविद्यालयाचे सर्व प्रशासकीय अधिकारी, अधिष्ठाता, प्राध्यापक, शिक्षकेतर सहकारी, रामटेकमधील गणमान्य नागरिक, विविध महाविद्यालय आणि शाळांचे प्राचार्य व मुख्याध्यापक, पत्रकार, शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातर्फे
''मराठी भाषा गौरव दिना''निमित्त आयोजित कार्यक्रम

अ.क्र.	कार्यक्रमाचे नाव	समन्वयक	तारीख
1	मराठी ग्रंथप्रदर्शन	डॉ. दीपक कापडे	17.02.2017
2	मराठी निबंध स्पर्धा	डॉ. दीपक कापडे	20.02.2017
3	मराठी भाषा गौरव दिन व्याख्यान	डॉ. कविता होले	17.02.2017
4	वादविवाद स्पर्धा	प्रा. पराग जोशी	20.02.2017
5	मराठी शुद्धलेखन कार्यशाळा	डॉ. रेणुका बोकारे	22.02.2017
6	मराठी भाषा परिसंवाद	श्री. सुमीत कठाळे	22.02.2017
7	मराठी साहित्य मंडळाची स्थापना	डॉ. मधुसूदन पेन्ना	20.02.2017
8	मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग	डॉ. प्रसाद गोखले	25.02.2017
9	ग्रंथदिंडी रामटेक, देवलापार, पारशिवनी, कन्हान	डॉ. जयवंत चौधरी	27.02.2017
10	मुख्य कार्यक्रम	क. का.सं.वि. रामटेक	27.02.2017

उपरोक्त कार्यक्रमांचा अहवाल पुढीलप्रमाणे –

1. मराठी ग्रंथप्रदर्शन –कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या शैक्षणिक परिसर, नागपूर येथे दि. 17 व 18 फेब्रुवारी, 2017 रोजी **ग्रंथालय विभाग**तर्फे मराठी भाषा गौरव दिना निमित्त **द्विदिवसीय मराठी ग्रंथ प्रदर्शनी** चे आयोजन करण्यात आले आहे. या ग्रंथ प्रदर्शनीचे उद्घाटन दि. 17 फेब्रुवारी 2017 रोजी सकाळी 11:30 वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरचे पदव्युत्तर मराठी विभाग प्रमुख, डॉ. शैलेन्द्र लेंडे यांच्या हस्ते करण्यात आले. विश्वविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. दीपक कापडे यांनी उपस्थित मान्यवर व अतिथींचे स्वागत करून सदर प्रदर्शनी चा सर्वांनी अधिकाधिक लाभ घेण्याचे आवाहन केले. वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून या मराठी ग्रंथ प्रदर्शनीची सुरुवात करण्यत आली.

या प्रसंगी '**डॉ. शैलेन्द्र लेंडे**' यांनी आपले विचार व्यक्त करताना म्हणाले, ''संस्कृत भाषेतील ज्ञान भांडार हे पौर्वात्य विद्येला आकारास आणण्यास महत्त्वाचे ठरले आहे. या संस्कृत भाषेतील पौर्वात्य विद्येचा नव्याने अभ्यास करण्याची आज आवश्यकता आहे. संस्कृत भाषेच्या ज्ञानाने मराठी भाषेला समृध्द केलेले आहे. संस्कृत आणि मराठी यांच्यातील अनुबंध सद्यःस्थितीत समजून घेणे महत्वाचे ठरते.''

या कार्यक्रमाला विशेष निमंत्रित म्हणून विश्वविद्यालयाच्या विकास व नियोजन मंडळाचे संचालक डॉ. सी.जी. विजयकुमार तसेच संस्कृत साहित्य विभागाचे अधिष्ठाता डॉ. नंदा पुरी, व ज्योतिष विभागाचे अधिष्ठाता डॉ. कृष्णकुमार पाण्डेय, यांची विशेष उपस्थिती होती. सदर प्रदर्शनीमध्ये मराठी भाषेतील नामांकित लेखकांचे ग्रंथ, कथा कादंबरी, मराठी विश्वकोष, शब्दकोष, मराठी सुभाषिते, कालिदासावरील मराठी ग्रंथ, इत्यादी मराठी भाषेला समृध्द करणारी ग्रंथसंपदा ठेवण्यात आली आहे. या ग्रंथ प्रदर्शनीला सर्व प्राध्यापक वर्ग व तसेच विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित राहून चा लाभ घेतला. मराठी भाषेच्या संमृध्दी व विकासाकरिता अशा प्रकारची ग्रंथ प्रदर्शनी साहायकारी ठरत असून या प्रदर्शनीला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. ही मराठी ग्रंथ प्रदर्शनी यशस्वी करण्यास श्री. रितेश मेश्राम, कु.प्रगती ढेपे, व मुकेश सहारे यांनी विशेष प्रयत्न केले.

2. **मराठी निबंध स्पर्धा** –निबंध स्पर्धा शालेय, महाविद्यालयीन आणि खुल्या गटात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला रामटेक व आसपासच्या परिसरातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त व उत्साही प्रतिसाद दिला.

2. निबंधांचे विषय –

शालेय स्तर – (वर्ग 8 ते 10)आम्ही मराठी का शिकतो?

महाविद्यालयीन स्तर – उच्चशिक्षणात मराठी भाषेचे योगदान

खुला गट – 'मराठी असे आमुची मायबोली' **अथवा** 'मराठी साहित्यसंमेलनांचे सांस्कृतिक योगदान'

3. **मराठी भाषातज्ज्ञाचे व्याख्यान** –संपूर्ण महाराष्ट्रात दि. 27 फेब्रुवारी 2017 रोजी ''मराठी भाषा गौरव दिन'' मोठया प्रमाणावर साजरा केला जात आहे. कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्या पुढाकाराने रामटेक व नागपूर येथे अनेक शैक्षणिक व साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यानिमित्ताने विश्वविद्यालयाच्या द्वारेब्रिटीश कोलंबिया विद्यापीठातील प्राध्यापक **डॉ. अशोक अकलूजकर यांचे ''भाषाध्ययन आणि संशोधन'' या विषयावरील विशेष व्याख्यान**ाचे आयोजन आज शुक्रवार, दि. 17 फेब्रुवारी 2017 रोजी नागपूर येथील विश्वविद्यालयाच्या शैक्षणिक परिसरात करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकायाच्या अधिष्ठाता डॉ. नंदा पुरी आणि व्याख्यान कार्यक्रमाच्या समन्वयक व विस्तार सेवा संचालक डॉ. कविता होले होत्या.

प्रमुख व्याख्याते डॉ. अशोक अकलूजकर यांचे स्वागत डॉ. नंदा पुरी यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन केले.

आपल्या व्याख्यानात डॉ. अकलूजकर यांनी संशोधन आणि भाषाध्ययन यांचा सविस्तर आणि सोदाहरण आढावा घेतला. ते म्हणाले,''भारतीय विद्यार्थी प्रबंध विषय स्वतः निवडत नाही. तो त्यांनी स्वतः निवडावा तसेच त्यासाठी सुचणा–या नवनवीन कल्पनांचे टिपण तयार करीत राहावे. यातून नवनवीन तत्त्वे गवसतात आणि त्याचा प्रबंधलेखनाला उपयोग होतो . प्रबंध लिहिताना अनावश्यक माहिती वा मजकूर लिहू नये. जे आणि जेवढे आवश्यक त्याचे तारतम्य बाळगणे आवश्यक आहे. संशोधन विषय स्वतः निवडला असल्यास त्यात गोडी निर्माण होते आणि समरसतेतून अध्ययनाचा आनंदही घेता येतो. आचार्य पदवीसाठी केलेले संशोधन ही केवळ सुरुवात आहे; ते पुढे नेण्यासाठी आपल्याजवळ चिकाटी हवी. संशोधनविषयाशी नाते जुळणे हे महत्त्वाचे! भाषा हे प्रबंधलेखनाचे माध्यम आहे. विद्यार्थ्याला ज्या भाषेत आपले विचार सक्षम व समर्थपणे मांडता

येतील तीच त्याने प्रबंधाची भाषा म्हणून निवडावी. मातृभाषा समृद्ध करायची असेल तर त्या भाषेत लेखन झाले पाहिजे; नव्हे ती आपली जबाबदारीच आहे. स्वभाषेत वैचारिक वाङ्मय निर्मितीकरिता आपण स्वतःपासून सुरुवात करावी असे सांगून डॉ. अकलूजकरांनी संस्कृत आणि मराठी या भाषांमध्ये अनावश्यक दरी निर्माण झाली असून संस्कृतानुसारी लेखनपद्धती स्वीकारण्याचे आवाहन केले.''

अध्यक्षीय भाषणात **डॉ. नंदा पुरी** यांनी कवी कुसुमाग्रज यांच्या परंपरेतील साहित्यिकांची नाळ संस्कृतशी जुळलेली होती. त्यामुळे त्यांच्या विविध साहित्यनिर्मितीतून निर्माण झालेली मराठी भाषा ही सकस आणि समृद्ध आहे. ही मराठी नवीन पिढीला कळत नाही याचे कारण संस्कृताधारित मराठीचे आज सरलीकरण झाले आहे. भाषा ही संवादाने त्यातील साहित्य निर्मितीने प्रवाही राहते, टिकते. मातृभाषेत केलेल्या संशोधनाचा अभिमान बाळगावा आणि या मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने मातृभाषेविषयीचा स्वाभिमान प्रज्वलित ठेवावा असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. जयवंत चौधरी व आभार डॉ. कविता होले यांनी मानले. कार्यक्रमाला नागपुरातील गणमान्य नागरिक, विविध महाविद्यालयांचे विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर सहकारी, विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

4. वादविवाद स्पर्धा –

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक द्वारे पदवी आणि पदव्युत्तर स्तरावर दि. 20 फेब्रुवारी 2017 रोजी विद्यासागर महाविद्यालय, रामटेक येथे **वादविवाद स्पर्धे**चे आयोजन करण्यात आले. '**जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत राज्यभाषांचे स्थान महत्त्वाचे आहे/नाही**' हा वादविवाद स्पर्धेचा विषय होता.या स्पर्धेत एकूण सहा महाविद्यालयांच्या बारा विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. के. यू. पिल्लई यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्पर्धेचे समन्वयक प्रा. पराग जोशी यांनी केले. स्पर्धेचे परीक्षण कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या शिक्षणशास्त्र विभागातील सहायक प्राध्यापिका अनघा आंबेकर आणि विद्यासागर महाविद्यालयाचे प्रा. सावन धर्मापुरीवार यांनी केले. दि. 27 फेब्रुवारी 2017 रोजी होणा–या मुख्य कार्यक्रमात विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

या स्पर्धेला विद्यासागर महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. गिरीश सपाटे, डॉ. संगीता टक्कामोरे आणि अन्य प्राध्यापकांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त आणि उत्साही सहभागाने स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली.

5. मराठी शुद्धलेखन कार्यशाळा –

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या मुख्यालयात बुधवार, दि. 22 फेब्रुवारी 2017 रोजी **मराठी शुद्धलेखन कार्यशाळेचे आयोजन** करण्यात आले. ही कार्यशाळा मुख्यत्वे रामटेक आणि आसपासच्या गावातील मराठी शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थान वित्त व लेखा अधिकारी डॉ. रामचंद्र जोशी यांनी भूषविले. तर उद्घाटक या नात्याने विद्यापीठ नियोजन व विकास मंडळाचे संचालक डॉ. विजयकुमार उपस्थित होते. व्यासपीठावर कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, मार्गदर्शक प्रा. दीपक रंगारी आणि कार्यशाळेच्या समन्वयक डॉ. रेणुका बोकारे उपस्थित होत्या.

कार्यशाळेचे प्रास्ताविक तथा मार्गदर्शकांचा परिचय डॉ. रेणुका बोकारे यांनी करून दिला. आपल्या उद्घाटनपर भाषणात डॉ. विजयकुमार म्हणाले, ''व्याकरण हा भाषेचा पाया आहे. व्याकरण म्हणजे भाषेचे स्पष्टीकरण करणारे शास्त्र! पतंजलीने व्याकरणास शब्दानुशासन असे म्हटले आहे. आपण जे बोलतो किंवा लिहितो ते नीट व्यवस्थित, आकर्षक, शुद्ध ठेवण्याच्या दृष्टीने व्याकरणाध्ययन अत्यन्त अपेक्षित आहे. भाषाध्ययनासाठी श्रवण, भाषण, वाचन, लेखन अशा चार पाय–या आहेत. त्यामुळे शुद्ध लेखनाचे अध्यापन हा आजच्या या कार्यशाळेचा विषय आहे. आपली मातृभाषा शुद्ध स्वरूपात शिकण्याची आणि पुढील पिढीपर्यंत पोहचविण्याची जबाबदारी असलेल्या शिक्षकांसाठी आजच्या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. ही कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल समन्वयकांचे मी अभिनंदन करतो आणि सहभागी प्रतिनिधींना शुभेच्छा देतो.''

याप्रसंगी कुलसचिव डॉ. अरविंद जोशी आणि डॉ. रामचंद्र जोशी यांनीही कार्यशाळेला शुभेच्छा दिल्या.

प्रा. दीपक रंगारी यांनी अनेकानेक उदाहरणे देऊन विभक्ती प्रत्यय, शुद्ध व अशुद्ध शब्दांमधील भेद, अर्थभेद, व्याकरणाचे आणि शुद्धलेखनाचे नियम यांची सविस्तर व सोदाहरण चर्चा केली. दैनंदिन उपयोगात येणा–या शब्दांच्या शुद्धाशुद्धतेबाबत, शुद्धलेखनाच्या नियमाबाबत तसेच शब्दांमधील अर्थभेदाबद्दल सोदाहरण मार्गदर्शन केले. तसेच उपस्थित जिज्ञासूंच्या शंकांचे निरसन केले.

समारोप सत्राच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. उमा वैद्य होत्या. ग्रंथपाल डॉ. दीपक कापडे विशेषत्वाने उपस्थित होते . सन्माननीय कुलगुरू महोदयांच्या शुभहस्ते प्रा. दीपक रंगारी यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला .

याप्रसंगी श्री. सुनील कोल्हे, श्री. युवराज शंकरपुरे, श्री. मंगलप्रसाद घुगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या सर्वांनी अशा कार्यशाळा विश्वविद्यालयाने अधिकाधिक आयोजित कराव्या असे सांगितले तसेच या कार्यशाळेमुळे मराठी भाषेच्या शुद्ध लेखनाचे संस्कार होणे किती गरजेचे आहे याचे महत्त्वही समजल्याचे नमूद केले. ही कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल विश्वविद्यालयाचे अभिनंदन केले. ही कार्यशाळा अधिक कालावधीकरिता आणि सातत्याने आयोजित केली जावी अशी उपस्थित सर्वांनी एकमुखाने मागणी केली.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. उमा वैद्य म्हणाल्या, ''मराठी शुद्धलेखनाचे संस्कार हे बालपणापासून जाणीवपूर्वक स्वतःवर करून घ्यावे लागतात. पूर्वीचे शिक्षक भाषेच्या शुद्धीबाबत किती आग्रही आणि काटेकोर होते यासंदर्भात त्यांनी स्वतःचे अनुभव सांगितले. शिष्टसंमत भाषेला व्याकरणाचे नियम लागू आहेत. या नियमांमुळेच भाषेच्या वापरावर नियंत्रण राहते. म्हणूनच बोली आणि प्रमाण भाषेत भेद केला जातो. व्याकरणबद्ध लेखनच काळाच्या कसोटीवर टिकून राहते म्हणून अशा शुद्धलेखन कार्यशाळांचे महत्त्व वादातीत आहे. नियमबद्ध आणि शुद्ध लिहिण्या–बोलण्यासाठी अशा कार्यशाळा उपयुक्त ठरतात. शिक्षकांनी याविषयी जागरूक राहून हे नियम आत्मसात करावे आणि आपली भाषा शिष्टसंमत आणि प्रमाण असावी यासाठी प्रयत्नरत असावे असा सल्लाही दिला. विश्वविद्यालयाचे ग्रंथालय अध्ययन करणा–या सर्वांसाठी खुले असल्याचे स्पष्ट केले. ''

डॉ. रेणुका बोकारे यांनी आभार मानले. कार्यशाळेला रामटेक व आसपासच्या परिसरातील भाषा विषयाच्या शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

6. मराठी भाषाधारित परिसंवाद –

कविवर्य वि. वा. शिरवाडकर उपाख्य कुसुमाग्रज यांचा 27 फेब्रुवारी हा जन्मदिन ''मराठी भाषा गौरव दिन'' म्हणून सन 2013 पासून साजरा करण्यात येतो. या वर्षी सुद्धा कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक च्या वतीने 27 फेब्रुवारी 2017 रोजी ''मराठी भाषा गौरव दिन'' मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय आणि ताई गोळवलकर महाविद्यालय, रामटेक यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि. 22 फेब्रुवारी रोजी एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले .**''मराठी समोरील आव्हाने, उपाय आणि लोकसहभाग''या विषयावरील परिसंवादास श्री. राकेश मर्जिवे, श्री. त्रिलोक मेहर, प्रा. श्री. जगदीश गुजरकर आणि प्रा. डॉ. राजेन्द्र नाईकवाडे यांनी सखोल संशोधन आणि अनुभव यावर आधारित चिंतनशिल विवेचन करून मोलाचे योगदान केले.** परिसंवादाचे अध्यक्ष डॉ. रामचंद्र जोशी, वित्त व लेखाधिकारी, क.का.सं.वि. रामटेक यांनी अध्यक्षीय भाषणात विश्वविद्यालय संस्कृत सोबतच मराठी भाषेच्या विकासासाठी कटीबद्ध असल्याचे प्रतिपादन केले.

परिसंवादास मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांनी तसेच कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, प्राचार्य डॉ. राजेश सिंगरू, नगरसेवक श्री. विवेक तोतडे, सरपंच, कु. योगिता गायकवाड शुभेच्छा संदेश दिला. परिसंवादाचे संचालन समन्वयक श्री. सुमित कठाळे यांनी केले. प्रा. ईशा वडोदकर यांनी प्रास्ताविक केले तर श्री. संजय वाते यांनी आभारप्रदर्शन केले.

परिसंवादाच्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक श्री. सुमीत कठाळे यांच्या नेतृत्वाखाली प्रा. श्री. पांडे, श्री. उमेश पाटील, श्री. श्यामसुंदर डोबले, प्राध्यापक, कर्मवारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. परिसंवाद कार्यक्रमाला शिक्षक, अधिकारी आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

7. मराठी साहित्य मंडळाची स्थापना – क. का. संस्कृत विद्यापीठात मराठी साहित्य मंडळाची स्थापना करण्यात आली. मराठी विषयक अनेक साहित्यिक–सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्याची योजना या मंडळाद्वारे आहे. या मंडळाचे अध्यक्ष डॉ. मधुसूदन पेन्ना, अधिष्ठाता, भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकाय आहेत. अन्य सदस्यांमध्ये डॉ. कविता होले,संचालक, विस्तार सेवा, श्री. ईश्वर आष्टनकर, श्री. अनिल वाघमारे या रामटेकमधील गणमान्य व साहित्यप्रेमी नागरिकांचा तसेच डॉ. रामचंद्र जोशी, वित्त व लेखा अधिकारी यांचा समावेश आहे.

8. मोडी लिपी कार्यशाळा –

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे मराठी भाषा गौरव दिना निमित्ताने दि. 25.02.2017 रोजी विश्वविद्यालयाच्या नासुप्र संकुल येथील शैक्षणिक परिसरात मोडी लिपी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे महत्त्व व उद्देश्य या कार्यशाळेचे समन्वयक, डॉ. प्रसाद गोखले यांनी आपल्या प्रास्ताविकात समजविले. तसेच या कार्यशाळेचे उद्घाटक म्हणून डॉ. नंदा पुरी, संस्कृत भाषा तथा संस्कृतेतर भाषा संकायाच्या अधिष्ठाता उपस्थित होत्या. डॉ. नंदा पुरी यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात मोडी–लिपीचा इतिहास व महत्त्व यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच डॉ. कविता होले, संचालक, विस्तार सेवा मंडळ, व्यासपीठावर उपस्थित होत्या. डॉ. कविता होले यांनी मोडी लिपी कार्यशाळेचे महत्त्व व गरज काय याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

मोडी लिपी शिकविण्याकरीता प्रा. मृदुला काळे, सहायक प्राध्यापक, एल्एडी महाविद्यालय, नागपूर उपस्थित होत्या. प्रा. मृदुला काळे यांनी मोडी लिपीची वर्णमाला, बाराखडी, शब्द, वाक्य तसेच मोडीलिपीतील लेखनशैली यावर सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत सर्व विभागांचे प्राध्यापक तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

9. ग्रंथदिंडी – दि. 27 फेब्रुवारी 2017 रोजी मराठी भाषा गौरव दिनी क. का. सं. विद्यापीठाच्या पुढाकाराने रामटेक, देवलापार व पारशिवनी येथे शाळा – महाविद्यालयांच्या सहभागाने ग्रंथदिंडी काढण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी भरगच्च सहभाग नोंदवला. विविध शाळा महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या उत्साहपूर्ण प्रतिसादाने ही ग्रंथदिंडी संपन्न झाली. यामध्ये विद्यापीठाचे डॉ. अरविंद जोशी, कुलसचिव डॉ. रामचंद्र जोशी, वित्त व लेखा अधिकारी, डॉ. उमेश शिवहरे, परीक्षा नियंत्रक, डॉ. कीर्ती सदार अन्य अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले.

अशा प्रकारे विविध भरगच्च कार्यक्रमांनी आणि विविध संस्थांच्या उत्साहपूर्ण सहभागाने मराठी भाषा गौरव दिन संपन्न झाला.

प्रशासकीय अहवाल

आस्थापना विभाग

महाराष्ट्र शासनाद्वारे अधिनियम क्र. 33–1997 अन्वये प्रस्तुत विश्वविद्यालयाची स्थापना दि. 18 सप्टेंबर 1997 रोजी झाली. शासनाने प्रस्तुत विश्वविद्यालयातील पाच शैक्षणिक विभागांकरिता एकूण 35 शिक्षकीय पदे आकृतीबंधानुसार मंजूर केली आहेत. त्याचप्रमाणे 114 शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध मंजूर केला आहे. पदांचा तपशील खालीलप्रमाणे –

शासनमान्य शिक्षकेतर पदे

एकूण मंजूर पदे					एकूण भरलेली पदे					एकूण रिक्त पदे				
अ	**ब**	**क**	**ड**	**एकूण**	**अ**	**ब**	**क**	**ड**	**एकूण**	**अ**	**ब**	**क**	**ड**	**एकूण**
22	10	50	32	**114**	15	07	36	26	**84**	07	03	14	06	**30**

शासनमान्य शिक्षकीय पदे

एकूण मंजूर पदे	एकूण भरलेली पदे	एकूण रिक्त पदे
35	**20**	**15**

अहवाल वर्षात पदोन्नती देण्यात आलेल्या पदांचा तपशील

विश्वविद्यालयाच्या आस्थापनेवर मंजूर पदांपैकी पदोन्नतीच्या रिक्त पदांवर पदोन्नतीची कार्यवाही विभागीय पदोन्नती समितीद्वारे पूर्ण करण्यात आली. त्यानुसार खालील कर्मचाऱ्यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर पदोन्नती देण्यात आली.

अ. क्र.	नाव	पदनाम
1	श्री. लोभाजी भा. सावंत	अधीक्षक
2	श्री. ललितकुमार रा. धुर्वे	कनिष्ठ लिपिक

सेवाज्येष्ठता यादी

कार्यरत कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता यादी प्रतिवर्ष प्रसिध्द करावी असे शासनाचे धोरण असून त्यानुसार प्रस्तूत विश्वविद्यालयाने 2016 ची अद्ययावत सेवाज्येष्ठता सूची प्रसिध्द करण्याची कार्यवाही पूर्ण केली आहे.

कर्मचारी हिताचे निर्णय

1) विश्वविद्यालयात कार्यरत कर्मचाऱ्यांना पदव्युत्तर संस्कृत भाषा व साहित्य विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण करता यावा याकरीता व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यार्थ्यांकरिता सप्तांत वर्ग (Weekend Batch) सूरू करण्यात आले. 04 कर्मचाऱ्यांनी सदर अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असून 02 कर्मचाऱ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

2) कर्मचाऱ्यांना सेवापुस्तिकेची दुय्यम प्रत देण्यात येत आहे.

नॅक मूल्यांकन समितीची भेट

नॅक मानांकन प्राप्त करण्यासाठी विश्वविद्यालयाने सादर केलेल्या स्वयं अभ्यास अहवालानुसार दि. 21 ते 23 नोव्हेंबर 2017 रोजी विश्वविद्यालयास भेट दिली. विभागाने आपले स्वतंत्र पॉवर पॉईंट प्रझेंटेशन सादर केले. यावेळी या भेटीच्या अनुषंगाने विविध जबाबदाऱ्या विभागाने यशस्वीरित्या पार पाडल्या आहेत.

व्यवस्थापन परिषदेच्या सभा

विश्वविद्यालयाचा व्यवास्थापन परिषदेच्या एकूण 09 सभा संपन्न झाल्या आहेत. 06 नियमित सभा आणि 03 आपत्कालीन सभा संपन्न झाल्या आहेत.

''महाकवी कालिदास संस्कृत–व्रती राष्ट्रीय पुरस्कार'' 2016

अहवाल

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाद्वारे दरवर्षी पं. रामनारायण शर्मा वैद्य यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पं. रामनारायण शर्मा वैद्य आयुर्वेद प्रतिष्ठान, आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने ''महाकवी कालिदास संस्कृत–व्रती राष्ट्रीय पुरस्कार'' प्रतिवर्ष प्रदान केला जातो. पुरस्कारासोबत रोख रु. 50,000/– पारितोषिक, मानपत्र, देऊन सन्मान केला जातो. ज्या विद्वज्जनांनी संस्कृत भाषेच्या प्रचार, प्रसार, विकास तसेच संशोधनासाठी आयुष्यभर सेवा केली त्यांचा यथोचित गौरव व्हावा हा प्रस्तुत पुरस्कार प्रदान करण्यामागचा उद्देश आहे.

यासाठी सर्व संस्कृत विद्यापीठे/विद्यापीठे/प्रतिष्ठित संस्कृत संस्था यांचे कडून विश्वविद्यालयातर्फे प्रस्तुत पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविण्यात येतात. त्यासाठी वर्तमानपत्रात निवेदन देण्यात येते.प्राप्त प्रस्ताव कार्यकारी सभेपुढे सादर करण्यात येतात. कार्यकारी सभा प्राप्त प्रस्तावांचे मूल्यांकन करण्यासाठी 3–5 तज्ज्ञ परीक्षक नियुक्त करते. तज्ज्ञांकडून

अहवाल प्राप्त झाल्यानंतर ते पुन्हा कार्यकारी समितीपुढे पुरस्कर्त्याची निवड करण्यासाठी सादर करण्यात येतात. कार्यकारी समिती पुरस्कर्त्याचे नाव निश्चित करते. हा पुरस्कार महाराष्ट्र शासनाच्या कालिदास महोत्सवात प्रदान करण्यात येतो.

दि. 21.09.2016 रोजीच्या कार्यकारी समितीच्या निर्णयानुसार सन 2016 साठीचा पुरस्कार डॉ भगीरथप्रसाद त्रिपाठी, वाराणसी यांना निश्चित झाला.

'' कालिदास महोत्सव 2016'' चे आयोजन विश्वविद्यालयास नॅक समितीने भेट दिली त्या कालावधीत करण्यात आले होते त्यामुळे डॉ भगीरथप्रसाद त्रिपाठी, वाराणशी यांना सदर पुरस्कार विश्वविद्यालयाने आयोजित केलेल्या '' भारतवर्षीय संस्कृत संमेलन'' या समारोहाच्या उद्घाटन कार्यक्रमात 21 जानेवारी 2017 रोजी प्रदान करण्यात आला.

सदर पुरस्कार प्रदान कार्यक्रमाचे सुचारु नियोजनाकरिता एक कार्यक्रम समिती गठित करण्यात आली होती. कार्यक्रम समितीचे अध्यक्ष मा. डॉ. अरविंद जोशी, कुलसचिव हे होते, प्रा. पराग जोशी, डॉ. दिनकर मराठे, डॉ प्रसाद गोखले हे सदस्य होते तसेच सचिव श्री. श्रीपाद अभ्यंकर होते. कार्यक्रमाचे नियोजन, आवश्यक सुविधा व व्यवस्था आणि संभाव्य खर्च याबाबत विचार–विनिमय करण्यात आला व त्यानुसार कार्यक्रमाची रुपरेषा आखण्यात आली. या सोबतच विश्वविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने नियोजित पुरस्कार प्रदान कार्यक्रम योग्य प्रकारे संपन्न झाला.

कार्यरत शिक्षक कर्मचारी

अ.क्र.	नाव	पदनाम
1	डॉ. इंदुमती टि. भारंबे	प्राध्यापक
2	डॉ. नंदा ज. पुरी	सहयोगी प्राध्यापक
3	डॉ. मधुसूदन न. पेन्ना	सहयोगी प्राध्यापक
4	डॉ. ललिता प्र. चंद्रात्रे	सहयोगी प्राध्यापक
5	डॉ. सी. जी. विजयकुमार	सहयोगी प्राध्यापक
6	डॉ. कृष्णकुमार सु. पाण्डेय	सहयोगी प्राध्यापक
7	डॉ. कीर्ती भ. सदार	सहयोगी प्राध्यापक
8	डॉ. कविता सु. होले	सहयोगी प्राध्यापक
9	डॉ. कलापिनी ह. अगस्ती	सहायक प्राध्यापक
10	डॉ. हरेकृष्ण शा. अगस्ती	सहायक प्राध्यापक
11	डॉ. दिनकर वि. मराठे	सहायक प्राध्यापक
12	डॉ. प्रसाद श्री. गोखले	सहायक प्राध्यापक
13	डॉ. हृषिकेश स. दलाई	सहायक प्राध्यापक
14	डॉ. राजश्री पू. मेश्राम	सहायक प्राध्यापक
15	डॉ. अमोल म. मांडेकर	सहायक प्राध्यापक
16	प्रा. अनघा अ. आंबेकर	सहायक प्राध्यापक
17	डॉ. शिवराम रा. भट्ट	सहायक प्राध्यापक
18	डॉ. पराग भा. जोशी	सहायक प्राध्यापक
19	डॉ. जयवंत ज. चौधरी	सहायक प्राध्यापक
20	डॉ. राजेंद्र चि. जैन	सहायक प्राध्यापक

कार्यरत शिक्षकेतर कर्मचारी

अ. क्र.	नाव	पदनाम
1	डॉ. अरविंद द. जोशी	मा. कुलसचिव
2	डॉ. उमेश ध. शिवहरे	परीक्षा नियंत्रक
3	डॉ. रामचंद्र ज. जोशी	उप वित्त अधिकारी
4	डॉ. स्मिता म. फडणवीस	उपकुलसचिव
5	डॉ. दीपक को. मेश्राम	उपकुलसचिव
6	श्री. प्रकाश रू. जैस्वाल	उपकुलसचिव
7	डॉ. दीपक ग. कापडे	सहायक ग्रंथपाल
8	श्री. कैलाश वि. मून	सहायक कुलसचिव
9	डॉ. रोशन भा. अलोने	सहायक कुलसचिव
10	श्री. विजयेंद्र वि. पांडे	सहायक कुलसचिव
11	श्री. सुमित म. कठाळे	सहायक कुलसचिव
12	श्री. राजेंद्र धा. मेश्राम	सहायक कुलसचिव
13	सौ. कल्याणी कि. देशकर	सहायक कुलसचिव
14	श्री. संतोष कि. वाडीकर	उपअभियंता
15	श्री. श्रीपाद म. अभ्यंकर	अधीक्षक
16	श्री. संजय प्र. वाते	अधीक्षक
17	सौ. माधुरी र. येवले	अधीक्षक
18	श्री. अतुल ज. गाडे	अधीक्षक
19	श्री. रितेश रा. मेश्राम	अधीक्षक
20	श्री. लोभाजी भा. सावंत	अधीक्षक
21	डॉ. रेणुका श. बोकारे	जनसंपर्क अधिकारी
22	श्री. राजेश स. चकिनारपुवार	उच्च श्रेणी लघुलेखक
23	श्री. विजय मा. जामनकर	लेखापाल
24	श्री. राजीवरंजन दे. मिश्रा	तांत्रिक सहायक
25	सौ. रीता ग. अमीन	सहायक अधीक्षक
26	श्री. राजेश न. भांडारकर	निम्न श्रेणी लघुलेखक
27	श्री. प्रवीण ह. कळंबे	सुरक्षा अधिकारी
28	श्री. नरेंद्र न. रहाटे	वरिष्ठ लिपिक
29	श्री. अविनाश ज्ञा. फुसाटे	वरिष्ठ लिपिक
30	श्री. सौरभ र. बाजपेई	वरिष्ठ लिपिक
31	सौ. जान्हवी सु. देऊळगांवकर	वरिष्ठ लिपिक

अ. क्र.	नाव	पदनाम
32	श्री. अरविंद ता. कुचनकर	वरिष्ठ लिपिक
33	श्री. धर्मेश अ. शुक्ला	वरिष्ठ लिपिक
34	श्री. उमेश रा. पाटील	वरिष्ठ लिपिक
35	श्री. अतुल न. खोडे	वरिष्ठ लिपिक
36	श्री. योगेश बा. चौधरी	वरिष्ठ लिपिक
37	श्री. कृणाल नं. कविश्वर	वरिष्ठ लिपिक
38	श्री. धर्मेंद्र वि. भिडे	वरिष्ठ लिपिक
39	श्री. नीलेश गो. राठोड	वरिष्ठ लिपिक
40	कु. प्रगती ज. ढेपे	ग्रंथालय सहायक
41	कु. मीनाक्षी डो. मेश्राम	ग्रंथालय सहायक
42	श्री. विनोद वि. बागडे	कनिष्ठ लिपिक
43	श्री. नेमीचंद ता. मेश्राम	कनिष्ठ लिपिक
44	कु. मीना व्यं. पुजारी	कनिष्ठ लिपिक
45	श्री. अनिल र. तिवारी	कनिष्ठ लिपिक
46	श्री. महेश अ. येयेवार	कनिष्ठ लिपिक
47	श्री. अरविंद ह. राठोड	कनिष्ठ लिपिक
48	श्री. नंदकिशोर धा. मेश्राम	कनिष्ठ लिपिक
49	श्री. चेतन वा. पेलने	कनिष्ठ लिपिक
50	सौ. नंदिनी म. बंड	कनिष्ठ लिपिक
51	श्री. मंगेश कृ. आटे	कनिष्ठ लिपिक
52	श्री. प्रवीणकुमार सु. सरोदे	कनिष्ठ लिपिक
53	सौ. प्रीती चं. लाडसे (अहिरकर)	कनिष्ठ लिपिक
54	श्री. ललितकुमार रा. धुर्वे	कनिष्ठ लिपिक
55	श्री. जावेद र. तुरक	वाहन चालक
56	श्री. मुकेश ध. शहारे	ग्रंथालय परिचर
57	श्री. पुरूषोत्तम प्र. कावळे	ग्रंथालय परिचर
58	श्री. सुभाष वा. गोतमारे	दप्तरी
59	श्री. सुनिल ल. बावने	दप्तरी
60	श्री. दिपक चं. जोंधळे	दप्तरी
61	श्री. पुरूषोत्तम प्र. वझे	तारमार्गतंत्री व तारतंत्री
62	श्री. सुशील पां. वैद्य	चक्रमुद्रक
63	श्री. अजित मो. पांडे	शिपाई

अ. क्र.	नाव	पदनाम
64	श्री. रूपेश टि. मेश्राम	शिपाई
65	श्री. शैलेश शं. गेडाम	शिपाई
66	श्री. दिलीप ना. राऊत	शिपाई
67	श्री. राजेश रा. दारोडे	शिपाई
68	श्री. शामसूंदर सा. डोबळे	शिपाई
69	श्री. अविनाश नि. भैसारे	शिपाई
70	श्री. जितेंद्र दे. सुर्यवंशी	शिपाई
71	श्री. पंकज र. पेठकर	शिपाई
72	श्री. तात्याराव रा. वाघमारे	शिपाई
73	श्री. हनुमंत अं. सिडाम	शिपाई
74	कु. छाया शं. मसारकर	शिपाई
75	कु. प्रणाली अ. ठाकरे	शिपाई
76	सौ. मंजुषा प्र. कुकडे	शिपाई
77	कु. सुरेखा वा. तिजारे	शिपाई
78	श्री. रोशन पु. कुनघाटकर	शिपाई
79	सौ. नलिनी सं. इंगळे	शिपाई
80	श्री. ज्ञानेश्वर रा. साबळे	शिपाई
81	श्री. अशोक तु. हटवार	पहारेकरी
82	श्री. आकाश के. मडावी	पहारेकरी
83	श्री. अमित पां. वैद्य	माळी

विद्या विभाग

(1) अध्ययन मंडळ

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय कायदा, 1997 मधील कलम 33 (2) तरतूदीनुसार सत्र 2016–17 साठी तदर्थ दहा अध्ययन मंडळांचे गठण करण्यात आले आहे. अध्ययन मंडळाचे नाव खाली नमूद केल्यानुसार आहे.

अ.क्र.	अध्ययन मंडळाचे नाव	अध्यक्षांचे नाव
1	तदर्थ संस्कृत तथा संस्कृतेत्तर भाषा अभ्यास मंडळ	डॉ. नंदा पुरी
2	तदर्थ वेदविद्या अभ्यास मंडळ	डॉ. सी. जी. विजयकुमार
3	तदर्थ शिक्षणशास्त्र अभ्यास मंडळ	डॉ. ललिता चंद्रात्रे
4	तदर्थ वेदांग ज्योतिष व वास्तुशास्त्र अभ्यास मंडळ	डॉ. कृष्णकुमार पाण्डेय
5	तदर्थ ललितकला अभ्यास मंडळ	डॉ. भाऊ दांदडे
6	तदर्थ प्रशासकीय सेवा अभ्यास मंडळ	डॉ. सी. जी. विजयकुमार
7	तदर्थ दर्शनशास्त्र अभ्यास मंडळ	डॉ. मधुसूदन पेन्ना
8	तदर्थ कीर्तनशास्त्र अभ्यास मंडळ	डॉ. दिलीप डबीर
9	तदर्थ ग्रंथालय वार्ताशास्त्र अभ्यास मंडळ	डॉ. दीपक कापडे
10	तदर्थ हॉस्पिटॅलिटी स्टडीज व पर्यायी चिकित्सा पद्धती अभ्यास मंडळ	डॉ. सतीश नायडू

(2) संकाय

विश्वविद्यालयाने कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय कायदा, 1997 मधील कलम 31 (5) प्रमाणे पाच संकाय स्थापन करण्यात आले आहे. स्थापन करण्यात आलेल्या पाच संकायांची नावे व संकाय अधिष्ठात्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	संकायाचे नाव	अधिष्ठाताचे नाव
1	तदर्थ वेदविद्या संकाय	डॉ.सी.जी. विजयकुमार
2	तदर्थ संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा संकाय	डॉ. नंदा ज. पुरी
3	तदर्थ भारतीय धर्म, तत्त्वज्ञान तथा संस्कृती संकाय	डॉ.मधुसूदन पेन्ना
4	तदर्थ प्राचीन भारतीय विज्ञान तथा मानव्यशास्त्रे संकाय	डॉ. कृष्णकुमार पाण्डेय
5	तदर्थ शिक्षणशास्त्र तथा संकीर्ण विद्याशाखा संकाय	डॉ.ललिता चंद्रात्रे

3) विद्वत् परिषद

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय कायदा, 1997 मधील कलम 27 (2) च्या तरतूदीनुसार विद्वत् परिषदेचे गठण करण्यात आले. सत्र 2016–17 मध्ये विद्वत् परिषदेच्या एकूण चार सभा अनुक्रमे (1) दि. 19.02.2016, (2) दि. 29.08.2016 (आकस्मिक), दि. 07.09.2017 आणि दि. 24.10.2016 (आकस्मिक) रोजी संपन्न झाल्यात

4. कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयातील अभ्यासक्रमांची यादी 2016–17

अ.क्र.	अभ्यासक्रमांचे नाव		अ.क्र.	अभ्यासक्रमांचे नाव
पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम			**पदविका अभ्यासक्रम**	
1	एम. ए. (शिक्षण)		37	वास्तुशास्त्र पदविका
2	एम. ए. (संस्कृत दर्शन)		38	संस्कृत साधना पदविका
3	एम. ए. (संस्कृत साहित्या)		39	संस्कृत परिचय पदविका
4	एम. ए. (वेद)		40	संस्कृत आगम पदविका
5	एम. ए. (संस्कृत व्याकरण)		41	संस्कृत प्रवेश पदविका
6	एम. ए. (वेदांग ज्योतिष)		40	ग्रंथालय वार्ताशास्त्र पदविका
7	एम. संस्कृत (वेदांत)		42	योग, निसर्गोपचार आणि आहारशास्त्र पदविका
8	एम. ए. (योगशास्त्र)		43	योग पदविका
9	एम. ए. (कीर्तनशास्त्र)		44	जर्मन भाषा पदविका
10	एम. ए. (नृत्य)		45	वेदशास्त्र कनिष्ठ पदविका
11	एम. एड्.		46	पौरोहित्य उच्च पदविका
12	एम. एफ.ए.		47	वेदशास्त्र ज्येष्ठ पदविका
13	एम. फिल. (शिक्षण)		48	कीर्तनशास्त्र कनिष्ठ पदविका
14	एम. फिल. (संस्कृत)		49	कीर्तनशास्त्र ज्येष्ठ पदविका
15	एम. फिल. (संस्कृत दर्शन)		50	जनसंवाद आणि पत्रकारीता अभ्यासक्रम पदविका
16	एम. फिल. (संस्कृत वेदांग ज्योतिष)		51	डिप्लोमा इन थेटर ॲण्ड परफॉरमींग आर्ट
17	एम. फिल. (संस्कृत व्याकरण)		52	नृत्य उच्च पदविका
18	एम. फिल. (योगा)		53	नृत्य कनिष्ठ पदविका
19	एम. फिल. (संस्कृत वेदा)		54	नृत्य ज्येष्ठ पदविका
पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम			55	डिप्लोमा इन हॉस्पिटॅलिटी स्टडीज
20	वेदांग ज्योतिष पदव्युत्तर पदविका		56	नृत्य पूर्व पदवी (पदविका)
21	पी.जी.डी.सी.सी.ए.		57	डिप्लोमा इन मॅन्युस्क्रीप्टॉलॉजी ॲण्ड पॅलिओग्राफी
22	पी.जी.डिप्लोमा इन योगिक सायंसेस		58	डिप्लोमा इन क्रिएटीव्ह राइटींग
23	आग्ल भाषेतून संस्कृतचे अध्ययन		59	प्रि डिग्री डिप्लोमा इन डान्स
24	पी. जी. डिप्लोमा इन वास्तुशास्त्र		60	डिप्लोमा इन एन्शड इंडियन सायंसेस
पदवी अभ्यासक्रम			61	डिप्लोमा इन एन्शड इंडियन एन्व्हायरमेन्टल स्टडीज.
25	बी. ए. (शिक्षण)		62	डिप्लोमा इन वैदिक मॅथेमॅटीक्स
26	बी. ए. (वेदांग ज्योतिष)		63	डिप्लोमा इन संस्कृत लर्निंग
27	बी. एड्.		**प्रमाणपत्र अभ्यासक्रम**	
28	बी. ए. (संस्कृत विशारद)		64	नृत्य प्रमाणपत्र
29	बी. ए. (प्रशासकीय सेवा)		65	वैदिक मॅथेमॅटीक्स प्रमाणपत्र

30	बी. ए. (योगशास्त्र)		66	संस्कृत सेतू (बीएड् प्रवेशाकरिता संस्कृत नसणाऱ्या विद्यार्थ्या करिता)
31	बी. एफ. ए.		67	आयुर्वेद फार फॉरेन स्टुडन्टस्
32	बी एससी (हॉस्पिटॅलिटी स्टडीज)		68	गीता प्रमाणपत्र
33	बी. ए. (वेदविद्या)		69	वेदविद्या प्रमाणपत्र
34	बी. ए. (कीर्तनशास्त्र)		70	संस्कृत प्रवेश प्रमाणपत्र
35	बी. ए. (ट्रॅव्हल ॲण्ड टुरिजम)			
36	बी. ए. (नृत्य)			

5. विश्वविद्यालयाशी संलग्न महाविद्यालयांची यादी.
(सत्र 2016–17 करिता)

अ. क.	अभ्यासक्रम सुरु असलेल्या महाविद्यालयाचे नाव व पत्ता	सुरु असलेले अभ्यासक्रम
1.	त्रिस्कंध सोसायटी, नागपूर द्वारा संचालित **त्रिस्कंध वेदांग महाविद्यालय,** द्वारा श्री मंगेश प्रकाशन, 23, नवी रामदासपेठ, नागपूर–27.	बी.ए. (वेदांग ज्योतिष) एम्.ए. (वेदांग ज्योतिष)
2.	क.जे.सोमैय्या भारतीय संस्कृती पीठम्, मुंबई द्वारा संचालित **क.जे. सोमैय्या भारतीय संस्कृती पीठम्,** मॅनेजमेंट इन्स्टिटयूट, तिसरा मजला, सोमैय्या कॅम्पस, विद्याविहार, मुंबई–77	एम्.ए. (संस्कृत) भारतीय संस्कृती आणि नीतिमूल्ये पदविका बी.ए. (योगशास्त्र) योगशास्त्र पदविका संस्कृत परिचय पदविका जर्मन भाषा पदविका एम्.ए. (योगशास्त्र)
3.	ग्रामीण आरोग्य व शिक्षण विकास संस्था द्वारा संचालित, **डॉ. पंजाबराव देशमुख योगशास्त्र महाविद्यालय,** उदय कॉलनी, चांदूर बाजार, जि. अमरावती.	बी.ए. योगशास्त्र योग निसर्गोपचार आणि आहारशास्त्र पदविका
4.	दिशा बहुउद्देशीय शिक्षण, पर्यटन व पर्यावरण विकास संस्था, रामटेक द्वारा संचालित **रविकांत रागीट प्रशासकीय महाविद्यालय,** मौदा रोड, रामटेक, जि. नागपूर	बी.ए. (प्रशासकीय सेवा)
5.	मराठवाडा संस्कृत प्रचार सभा, श्री एकनाथ संशोधन मदिर द्वारा संचालित **श्रीनाथ वेदाभ्यास केंद्र,** खडकेश्वर, औरंगाबाद–431001	बी.ए. (संस्कृत) एम्.ए. (संस्कृत)
6.	ज्योतिषशास्त्र व परामानसशास्त्र अकादमी, औरंगाबाद द्वारा संचालित **वेदांग ज्योतिष महाविद्यालय,** गुरु तेजबहादुर हायस्कूल, उस्मानपुरा, औरंगाबाद	बी.ए. (वेदांग ज्योतिष्य) वास्तुशास्त्र पदविका
7.	वैदर्भीय हरिकीर्तन संस्था, नागपूर द्वारा संचालित **वैदर्भीय हरिकिर्तन महाविद्यालय,** रजत महोत्सव धरमपेठ मुलांची शाळा, धरमपेठ, नागपूर.	बी.ए. (कीर्तनशास्त्र) एम्.ए. (कीर्तनशास्त्र)

अ. क.	अभ्यासक्रम सुरु असलेल्या महाविद्यालयाचे नाव व पत्ता	सुरु असलेले अभ्यासक्रम
8.	समर्थ इन्स्टिटयुट ऑफ एज्युकेशन, अचलपूर द्वारा संचालित **कीर्तनकेसरी भाऊसाहेब शेवाळकर शिक्षाशास्त्री बी.एड. महाविद्यालय,** परतवाडा, जि.अमरावती.	बी.एड्. (शिक्षाशास्त्री)
9.	श्री सरस्वती एज्युकेशन सोसायटी, अकोला द्वारा संचालित **श्री कृष्णाजी जोशी महाविद्यालय,** श्री तिरुपती तत्रनिकेतन परिसर, केशवनगर, अकोला	बी.एड्. (शिक्षाशास्त्री)
10.	दृष्टी बहुउद्देशीय शिक्षण, पर्यटन व पर्यावरण विकास संस्था, रामटेक द्वारा संचालित **दमयंतीताई देशमुख बी.एड. कॉलेज,** मौदा रोड, रामटेक	बी.एड्. (शिक्षाशास्त्री)
11.	श्री समर्थ वेद विद्यालय (महर्षी वेदव्यास प्रतिष्ठान, पुणे) द्वारा संचालित **श्री समर्थ वेद विद्यालय**, गीता भवन, मु. ढालेगाव, पो. रामपुरी, ता. पाथरी, जि.परभणी	वेदविद्या पदविका (कनिष्ठ) वेदविद्या पदविका (ज्येष्ठ)
12.	शरद समग्र ग्रामीण विकास संस्था, वर्धा द्वारा संचालित **चिंतामणी वास्तुशास्त्र पदविका महाविद्यालय,** सेलु (काटे), वायगांव रोड, ता.जि.वर्धा	वास्तुशास्त्र पदविका
13.	श्री सरफोजी राजे भोसले भरत नाटयम् ट्रेनिंग अँण्ड रिसर्च सेंटर, मुंबई द्वारा संचालित **भरत कॉलेज ऑफ फाईन आर्टस् अँण्ड कल्चर,** 1 माया को–ऑप. हाऊसिंग सोसायटी लि. 5 कॉलेज पथ, प्रभादेवी, मुंबई	प्रमाणपत्र (नृत्य) कनिष्ठ पदविका (नृत्य) ज्येष्ठ पदविका (नृत्य) बी.ए. (नृत्य) एम्.ए. (नृत्य) उच्च पदविका (नृत्य)
14.	श्री ब्रम्हचैतन्य धार्मिक सद्विचार सेवा प्रतिष्ठान, अकोला द्वारा संचालित **श्री नाईकवाडे कीर्तन महाविद्यालय,** द्वारा प्रा. वामनराव नाईकवाडे, शास्त्रीनगर, अकोला	बी.ए. (कीर्तनशास्त्र)
15.	सुरभि जनकल्याण संस्था, नागपूर द्वारा संचालित **ॲडमिनिस्ट्रेटिव्ह डिग्री कॉलेज,** नाईक रोड, महाल, नागपूर	बी.ए. (प्रशासकीय सेवा)
16.	दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित **रामकृष्ण शिक्षणशास्त्र (बी.एड्.) महाविद्यालय,** दारापूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती.	बी.एड्. (शिक्षाशास्त्री)
17.	महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे **शिक्षाशास्त्री महाविद्यालय,** नरगुंदकर शैक्षणिक संकुल, खामला रोड, नागपूर	बी.एड्. शिक्षाशास्त्री
18.	ॲग्लो व्हर्न्याक्युलर एज्युकेशन सोसायटी, दारव्हा जि. यवतमाळ संचालित **कै. स्व. रामरावजी दुधे अध्यापक महाविद्यालय, दारव्हा, ता.दारव्हा. जि. यवतमाळ.**	बी.एड. (शिक्षाशास्त्री)
19.	मुंडले एज्युकेशन ट्रस्ट, नागपूर द्वारा संचालित **सेंट्रल इंडिया स्कूल ऑफ फाईन आर्टस्,** सहारा सिटी जवळ, वर्धा रोड, नागपूर	बी.एफ्.ए. एम्.एफ्.ए.

अ. क.	अभ्यासक्रम सुरु असलेल्या महाविद्यालयाचे नाव व पत्ता	सुरु असलेले अभ्यासक्रम
20.	देवाजीभाऊ बुद्धे मेमोरिअल शिक्षण संस्था, गोंदिया खुर्द द्वारा संचालित **एल्.के. पदविका योगशास्त्र महाविद्यालय,** गोंदिया	योगशास्त्र पदविका
21.	वैनगंगा बहुद्देशीय विकास संस्था, नागपूर द्वारा संचालित **स्वामी विवेकानंद शिक्षण व योग महाविद्यालय,** नागझिरा मार्ग, साकोली, जि. भंडारा–441 802	योगशास्त्र पदविका
22.	विद्याभारती संस्था, वर्धा द्वारा संचालित **एस्.पी. भोयर कॉलेज,** बॅचलर रोड, नालवाडी, वर्धा, जि. वर्धा	ग्रंथालय वार्ताशास्त्र पदविका संगणक संस्कृत उपयोजन पदव्युत्तर पदविका
23.	विद्याभारती संस्था, वर्धा द्वारा संचालित **श्रीमती कांचनताई भोयर महाविद्यालय,** बालाजी सभागृह, राष्ट्रीय महामार्ग क.7, हिंगणघाट	ग्रंथालय वार्ताशास्त्र पदविका संगणक संस्कृत उपयोजन पदव्युत्तर पदविका
24.	विद्याभारती संस्था, वर्धा द्वारा संचालित **प्रियदर्शनी कॉलेज,** छत्रपती नगर, एस्.टी. लॉ कॉलेजच्या मागे, चंद्रपूर	ग्रंथालय वार्ताशास्त्र पदविका संगणक संस्कृत उपयोजन पदव्युत्तर पदविका
25.	श्री गणेश शिक्षण मंडळ, नागपूर द्वारा संचालित **नगाजी महाराज महाविद्यालय,** ग्रेट नागरोड, रेशिमबाग चौक, नागपूर–440002	योगशास्त्र पदविका
26.	दि. हर्बल इंडिया डेव्हलपमेंट सोसायटी, नागपूर द्वारा संचालित **चक्रपाणी पंचकर्म योग व निसर्गोपचार महाविद्यालय,** ओंकार नगर, नागपूर–440 027	बी.ए. (योगशास्त्र) योग, निसर्गोपचार आणि आहारशास्त्र पदविका
27.	भोंडेकर सांस्कृतिक क्रीडा व सामाजिक शिक्षण विकास संस्था द्वारा संचालित **मंजूळाबाई भोंडेकर कॉलेज**, सहकार नगर, पांढराबोडी, भंडारा	बी.ए. (प्रशासकीय सेवा)
28.	योग आयुर्वेद संशोधन केन्द्र, कोल्हापूर द्वारा संचालित **स्वामी कुवलयानंद महाविद्यालय** , एस्.टी. कामगार हाऊसिंग सोसायटी हॉल, सायबर महाविद्यालयाजवळ, कोल्हापूर	संस्कृत परिचय पदविका
29.	राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, मोरवा द्वारा संचालित **छात्रवीर राजे संभाजी प्रशासकीय सेवा महाविद्यालय,** शनि मंदीराजवळ, मोरवा, ता.जि. चंद्रपूर	बी.ए. (प्रशासकीय सेवा)
30.	श्री सदाशिवराव पाटील शिक्षण संस्था, कामठी द्वारा संचालित **श्री सुरेश योगशास्त्र महाविद्यालय,** न्यू कामठी रेल्वे स्टेशनजवळ, कामठी, जि. नागपूर–441 002	योगशास्त्र पदविका
31.	विश्वसखा फाऊंडेशन, पुणे द्वारा संचालित **कीर्तन महाविद्यालय,** 1/8, तपोवन सोसायटी, जिजाई गार्डन जवळ, वारजे, पुणे	बी.ए. (कीर्तनशास्त्र)

अ. क.	अभ्यासक्रम सुरु असलेल्या महाविद्यालयाचे नाव व पत्ता	सुरु असलेले अभ्यासक्रम
32.	स्व. आबासाहेब खेडकर शिक्षण संस्था द्वारा संचालित **गुरुकृपा महाविद्यालय,** "चिरंजीव", पार्वती सदनजवळ, राऊतवाडी, अकोला.	ग्रंथालय वार्ताशास्त्र पदविका संगणक संस्कृत उपयोजन पदव्युत्तर पदविका
33.	श्री. अलकनंदा बहुउद्देशिय शिक्षण संस्था, द्वारा संचालित, **ज्ञानदीप कॉलेज ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन**, वडधामना, ता. हिंगणा, जि. नागपूर, 10 ठवरे कॉलनी, नवीन सुभेदार ले–आऊट, पोस्ट अयोध्यानगर, नागपूर–24,	बी.ए. (प्रशासकीय सेवा)

विद्यापीठ नियोजन विकास मंडळ

1. विद्यापीठाच्या तरतुदीनुसार आणि महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. केएसयु–1101/(78/01) विशि – 2 दि. 11.09.2003 नुसार विद्यापीठाच्या नियोजन व विकास मंडळ समितीचे गठन करण्यात आलेले आहेत

2. शैक्षणिक सत्र 2016–17 मध्ये 26 वेगवेगळया शैक्षणिक संस्थांसोबत सामंजस्य करार करण्यात आलेले आहेत

3. योगविद्या गुरूकुल योग भवन, नाशिक या महाविद्यालयास उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्रएनजीसी – 2014 / (100/14)(भाग–5)/मशि –4, दि. 29 जुलै,2016 प्रमाणे तसेच स्व. शोभाताई माणिकराव देशमुख ग्रंथालय वार्ताशास्त्र महाविद्यालय, सुलतानपूर , पो. गुडगाव, ता. आकोट जि. अकोला या महाविद्यालयास उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्र. एनजीसी–2014/(100/14)/मशि –4, दि. 05 ऑगस्ट, 2016 नुसार संदर्भांकित आदेशात नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक सत्र 2016–17 पासून ''कायम विना अनुदान '' तत्वावर मान्यता प्राप्त झालेली आहे.

4. कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय कायदा क्र. 33/1997 मधील कलम 62 (4) अन्वये प्राप्त एकूण दहा संस्थांना नवीन महाविद्यालयास मान्यता देण्यासाठी आवेदनपत्रे **मा. प्रधान सचिव,** उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई व **मा. संचालक**, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे अग्रेषित केले.

5. नियोजन व विकास मंडळ विभागाद्वारे विद्यापीठीय इच्छुक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याकरिता संशोधन प्रमोशनकरिता प्रकल्प सादर करण्यासाठी आवेदनपत्र मागविण्यात आलेले आहेत.

6. शैक्षणिक सत्र 2016–17 आणि 2017–18 करिता बृहत आराखडा अद्ययावत करून शासनाला पाठविण्यात आलेला आहे व त्यास शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे.

वित्त विभाग

विश्वविद्यालयाच्या आय आणि व्ययाचा सन 2015–16 चा प्रत्यक्ष, सन 2016–17 चा माहे डिसेंबर 2016 पर्यंतचा प्रत्यक्ष आणि सन 2017–18 चा अंदाज खालील प्रमाणे आहे .

		सन 2015–16 चा प्रत्यक्ष आय	सन 2015–16 चा प्रत्यक्ष व्यय	सन 2016–17 चा प्रत्यक्ष आय डिसेंबर 2016 पर्यंत	स्न 2016–17 चा प्रत्यक्ष व्यय डिसेंबर 2016 पर्यंत	सन 2017–18 चा अंदाजित आय	सन 2017–18 चा अंदाजित व्यय
भाग–1	अ) साधारण निधी	2,20,56,449	74,21,684	1,69,14,043	74,24,218	2,75,11,000	2,76,55,000
	ब) वेतन अनुदान	5,30,13,597	5,49,43,738	4,28,37,229	4,33,05,556	15,52,50,000	15,52,50,000
भाग–2	विकास कार्यक्रम	4,94,00,000	4,97,19,118	00	1,35,000	270,24,00,000	270,24,00,000
भाग–3	निधी	7,59,782	5,92,276	2,60,890	1,24,664	48,80,000	48,80,000
	एकूण	**12,52,29,828**	**11,26,76,816**	**6,00,12,162**	**5,09,89,438**	**289,00,41,000**	**289,01,85,000**

विश्वविद्यालयाचे सन 2016–17 पर्यंतचे अंतर्गत अंकेक्षण पूर्ण झालेले असून ''विश्वविद्यालयाचे वार्षिक लेखे'' महाराष्ट्र शासनाच्या आगामी अधिवेशनात प्रकाशित करण्यात येणार आहेत. वार्षिक लेख्यांची मसुदा प्रत शासनाकडे पूर्वमान्यतेसाठी पाठवण्यात आली आहे.

विश्वविद्यालयाच्या वेतन अनुदान मूल्यनिर्धारणाचे सन 2011–12 पर्यंतचे कार्य मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडून पूर्ण करण्यात आलेले आहे. त्याचा अहवाल अद्याप विश्वविद्यालयास अप्राप्त आहे. महालेखाकार कार्यालय, नागपूर यांनी दि. 03/10/2013 ते दि. 19/10/2013 या दरम्यान सन 2005–06 ते सन 2009–10 या कालावधीचे अंकेक्षण पूर्ण केले असून याचा अहवाल विश्वविद्यालयास प्राप्त झाला आहे. सदर अहवालानुसार घेण्यात आलेल्या बहुतेक आक्षेपांचा निपटारा विश्वविद्यालयाने केला आहे. उर्वरित परिच्छेदांचा निपटारा महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील असल्याने याबाबत विश्वविद्यालयाद्वारे पाठपुरावा करण्यात येत आहे.

अभियांत्रिकी विभाग

(1)

प्रकल्पाचे नाव : **अतिथीगृह इमारत बांधकाम**

बांधकामाचे क्षेत्रफळ : 412.00 स्के. मि.

प्राथमिक अंदाज : रू. 49.64 लक्ष

सुधारित अंदाज : रू. 73.13 लक्ष

अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. 49.64 लक्ष

अहवाल वर्षात प्राप्त अनुदान : .....

कार्यवाही : ठेव अंशदान योजने अंतर्गत सा. बां. विभागाद्वारे काम पूर्ण करण्यात आले.

सा. बां. विभागाकडे जमा रक्कम : रू. 49.64 लक्ष

सद्यःस्थिती : इमारतीची उपयोजिता सुरू करण्यात आली आहे.
अतिरिक्त खर्च रू. 23.49 लक्ष शासनाकडून प्राप्त करण्यासाठी शासनाकडे सुधारित प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. अद्याप मान्यता अप्राप्त.

(2)

प्रकल्पाचे नाव : **रिक्रीऐशन सेंटर इमारत बांधकाम**

बांधकामाचे क्षेत्रफळ : 515.47 स्के. मि.

प्राथमिक अंदाज : रू. 88.796 लक्ष

सुधारित अंदाज : रू. 122.90 लक्ष

अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. 122.90 लक्ष

अहवाल वर्षात प्राप्त अनुदान : .....

कार्यवाही : शासनाकडून तीन टप्प्यात प्राप्त निधी ठेव अंशदान योजने अंतर्गत सा. बां. विभागाकडे खालीलप्रमाणे जमा केला आहे.

शासनाकडून प्राप्त रक्कम/वर्ष	सा. बां. विभागाकडे जमा रक्कम/दिनांक
रू. 63,71,000.00 / वर्ष 2008–09	रू. 63,71,000.00 / दि. 26.03.2009
रू. 25,08,600.00 / वर्ष 2009–10	रू. 25,08,600.00 / दि. 23.03.2010
रू. 34,11,000.00 / वर्ष 2012–13	रू. 30,50,366.00 / दि.31.05.2013

सा. बां. विभागाकडे जमा रक्कम : रू. 119.30 लक्ष

सद्यःस्थिती : इमारतीचे बांधकाम सा. बां. विभागाकडून सुरू असुन अंतिम टप्प्यात आहे.

(3)

प्रकल्पाचे नाव : **ॲकडमिक रिसर्च सेंटर इमारत बांधकाम**

बांधकामाचे क्षेत्रफळ : 2943.27 स्के. मि.

प्राथमिक अंदाज : रू. 513.66 लक्ष

अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. 4,19,44,400/–

अहवाल वर्षात प्राप्त अनुदान : रू. 80,00,000/–

कार्यवाही : प्राप्त निधी ठेव अंशदान योजने अंतर्गत सा. बां. विभागाकडे जमा केली आहे.

शासनाकडून प्राप्त रक्कम/वर्ष	**सा. बां. विभागाकडे जमा रक्कम/ पावती दिनांक**
रू. 44,91,400.00 /वर्ष 2009–10	रू. 44,91,400.00 /दि. 20.03.2010
रू. 23,33,000.00 /वर्ष 2010–11	रू. 23,33,000.00 /दि. 23.12.2010
रू. 12,50,000.00 /वर्ष 2010–11	रू. 12,50,000.00 /दि. 23.12.2010
रू. 10,00,000.00 /वर्ष 2010–11	रू. 10,00,000.00/ दि. 23.09.2011
रू. 6,80,000.00 / वर्ष 2014–15	रू. 6,80,000.00 /दि. 08.04.2015
रू. 4,20,000.00/ वर्ष 2015–16	रू. 4,20,000.00 / दि.13.01.2016
रू. 2,00,00,000.00 वर्ष 2015–16	रू. 2,00,00,000.00 दि. 29.03.2016
रू. 37,70,000.00 वर्ष 2015–16	रू. 37,70,000.00 दि. 11.05.2016
रू. 80,00,000.00 वर्ष 2016–17	रू. 80,00,000.00 दि. 23.05.2017

सा. बां. विभागाकडे जमा रक्कम : रू. 4,19,44,400/–

सद्यःस्थिती : सा. बां. विभागाने सदर इमारत बांधकामास सुरुवात केलेली आहे विश्वविद्यालयाने शासनाकडे उर्वरित रक्कमेच्या मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे.

(4)

प्रकल्पाचे नाव : **युजीसी वन टाईम कॅच अप ग्रॅट योजने अंतर्गत विकास कामे**

1) ॲकडमिक स्कूल इमारत बांधकाम

2) परिसर विकास कामे

बांधकामाचे क्षेत्रफळ : 4813.60 स्के. मि.

प्राथमिक अंदाज : रू. 10.00 कोटी

शासन वाटा रू. 5.00 कोटी

युजीसी वाटा रू. 5.00 कोटी

अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. 2.50 कोटी (युजीसी कडून प्राप्त)

: रू. 5.00 कोटी (महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त)

कार्यवाही : ठेव अंशदान योजने अंतर्गत सा. बां. विभागाकडे प्राप्त रक्कम जमा करण्यात आली.

प्राप्त रक्कम/वर्ष	**सा. बां. विभागाकडे जमा रक्कम/ दिनांक**
युजीसी कडून प्राप्त रू. 2.50 कोटी /वर्ष 2011–12	रू. 2.50 कोटी / दि. 21.03.12
शासन कडून प्राप्त रू. 2.50 कोटी /वर्ष 2012–13	रू. 2.50 कोटी /दि.05.09.12
शासन कडून प्राप्त रू. 2.50 कोटी /वर्ष 2015–16	रू. 96,50,000.00/ दि. 11.05.2016 रू. 1,53,50,000.00 /दि. 11.05.2016

सा. बां. विभागाकडे जमा रक्कम : रू. 7.50 कोटी

सद्यःस्थिती : ॲकेडमिक स्कूल्स इमारतीचे बांधकाम सुरू आहे.

(5)

प्रकल्पाचे नाव : **युजीसी च्या 12 व्या प्लान अंतर्गत मल्टीपर्पज हॉल बांधकाम**

बांधकामाचे क्षेत्रफळ : 1426.64 स्के. मि.

प्राथमिक अंदाज : रू. 2.68 कोटी

अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. 98.00 लक्ष

अहवाल वर्षात प्राप्त अनुदान : रू. 98.00 लक्ष

सद्यःस्थिती : इमारतीचा आराखडा व अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेण्याची कार्यवाही सा. बां. विभागात सुरू आहे. युजीसीच्या 12 व्या प्लान अंतर्गत एकुण मान्यता प्राप्त निधी रक्कम रू. 7.00 कोटी पैकी पहिल्या टप्प्यात वर्ष 2016–17 मध्ये रू. 98 लक्ष विश्वविद्यालयास प्राप्त झाले व प्राप्त निधी ठेव अंशदान योजनेअंतर्गत सा. बां. विभाग, नागपूर यांचेकडे जमा करण्यात आला. निविदा प्रक्रिया सुरू आहे.

(6)

प्रकल्पाचे नाव : **विदर्भ वैधानिक विकास मंडळाच्या शिफारसीनुसार शासनाकडून प्राप्त निधीतून विकास कामे**

प्रशासकीय मान्यता : रू. 240.95 लक्ष

अहवाल वर्षापर्यंत प्राप्त अनुदान : रू. 240.95 लक्ष

कार्यवाही : ठेव अंशदान योजने अंतर्गत सा. बां. विभाग, जि.प. ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, नागपूर यांचेकडे प्राप्त रक्कम रू.240.95 लक्ष जमा करण्यात आली.

सद्यःस्थिती :1. संरक्षण भिंत बांधकाम– सा.बां. विभागाकडून सदर काम सुरू आहे.

अंदाजित खर्च :– 59.25 लक्ष

2. जलव्यवस्था करणे.– ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नागपूर कडून काम सुरू आहे.

अंदाजित खर्च :– 49.60 लक्ष

3. अंतर्गत रस्ते बांधकाम करणे. – सा. बां. विभागाकडून सदर काम सुरू आहे.

अंदाजित खर्च :– 79.25 लक्ष

4. विद्युत व्यवस्था करणे.– सा. बां. (विद्युत्) विभागाकडून सदर काम सुरू आहे.

अंदाजित खर्च :– 52.85 लक्ष

(अ) विश्वविद्यालयाची स्थावर मालमत्ता –

1) रामटेक, मौजा परसोडा येथे 3.92 हेक्टर जमीन विश्वविद्यालयाने दि. 02.04.1998 रोजी संपादीत केली. किंमत रू. 15,65,241/–

2) नागपूर येथे सीताबर्डी येथील नागपूर सुधार प्रन्यास संकुलमध्ये 4 था माळा 2 गाळे (क्र. 401 व 402) तसेच 5 वा व 6 वा माळा (क्र. 501 ते 510 आणि 601 ते 610) एकूण क्षेत्रफळ 834.977 स्के. मि. वर्ष 2007 –08 मध्ये संपादित केली. किंमत रू. 2,16,82,000/–

3) रामटेक परिसरातील इमारती –

1) प्रशासकीय इमारत

तळ मजला	– 564.34 स्के. मि.	खर्च रू. 45.74 लक्ष
पहिला मजला	– 561.12 स्के. मि.	खर्च रू. 56.65 लक्ष
2) अतिथीगृह इमारत बांधकाम	– 412.00 स्के. मि.	खर्च रू. 73.13 लक्ष

(ब) रामटेक येथे भूसंपादन

महाराष्ट्र शासनाने विश्वविद्यालय स्थापनेवेळी विश्वविद्यालयाकरीता मौजा परसोडा ता. रामटेक जि. नागपूर येथे एकुण 31. 77 हे. आर. जागा उपलब्ध करून देण्यास वर्ष 1997मध्ये मान्यता दिली होती. त्यापैकी पहिल्या टप्प्यात वर्ष 1998 मध्ये

विश्वविद्यालयास उपरोक्त ठिकाणी 3.92 हे. आर. जागा उपलब्ध करून दिली. उर्वरित 27.85 हे. आर. जमीन मिळण्याबाबत विश्वविद्यालयाने शासनाकडे सतत पाठपुरावा केला आहे. सदर भूसंपादनाची बाब शासनाकडे प्रलंबित आहे.

(क) वारंगा, नागपूर येथे भूसंपादन

महाराष्ट्र शासनाने मौजा वारंगा ता. नागपूर (ग्रा.) येथील स.क्र.140 मधील आराजी 50 एकर शासकीय जमीन कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाकरीता मंजूर केलेली आहे व सदर जागेचा ताबा विश्वविद्यालयाने घेतलेला आहे.

शैक्षणिक परिसर नागपूर :–

सीताबर्डी, नागपूर येथे एन. आय. टी. संकुलामध्ये शैक्षणिक सुविधा उपलब्ध झाल्यामूळे विश्वविद्यालयाचे पाचही शैक्षणिक विभाग अहवाल वर्षात याठिकाणी कार्यरत आहेत .

परीक्षा विभाग, बजाजनगर, नागपूर :–

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे परिक्षा विभागाकरिता महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, संस्थेची कस्तुरबा भवन, बजाज नगर, नागपूर प्लॉट नं. 349/2, येथील इमारतीतील जागा दि. 01/04/2016 ते दि. 31/12/2018 पर्यत एकूण 33 महिन्यासाठी प्रतिमाह प्रमाणे भाडयाने घेतलेली आहे.

परीक्षा विभाग

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचा परीक्षा विभागातर्फे उन्हाळी आणि हिवाळी 2016 उन्हाळी 2017 परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. हिवाळी मध्ये 91 परीक्षांना 3087 विद्यार्थी बसले होते, तर उन्हाळी परीक्षांमध्ये एकूण 156 परीक्षांना 4870 विद्यार्थी बसले होते. सर्व परीक्षांचे निकाल विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसाच्या आत घोषित करण्यात आले. ही विशेष उल्लेखनीय बाब आहे. परीक्षा घेण्यासंबंधीची पूर्वतयारी व निकाल घोषित करण्यापर्यंतची पूर्ण कार्यवाही ही ऑनलाईन पध्दतीने करण्यात येते.

सप्तम दीक्षांत समारंभ – अहवाल

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचा **सप्तम दीक्षांत समारंभ रविवार, दि. 5 मार्च 2017 रोजी किट्स इंजिनिअरींग कॉलेज, रामटेक** येथे संपन्न झाला. **मा. श्री. प्रकाश जावडेकर,** मानव संसाधन विकास मंत्री, भारत सरकार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. श्री. लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठाचे मा. कुलगुरू **डॉ. रमेशकुमार पाण्डेय** हे सन्मान्य अतिथी या नात्याने उपस्थित होते. विश्वविद्यालयाच्या कुलगुरू मा. डॉ. उमा वैद्य या समारंभाच्या अध्यक्षस्थानी होत्या. शिक्षण सहसंचालक डॉ. अंजली रहाटगावकर, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. कमल सिंग, परीक्षा नियंत्रक डॉ. उमेश शिवहरे, कुलसचिव डॉ. अरविंद जोशी हे व्यासपीठावर विशेषत्वाने उपस्थित होते. तसेच व्यवस्थापन परिषद, विद्वत् परिषदेचे सदस्य, सर्व संकायांचे अधिष्ठाता आणि पदकदान–दाते यांची याप्रसंगी प्रामुख्याने उपस्थिती होती.

कार्यक्रमाचा प्रारंभ विश्वविद्यालयाच्या वेदशास्त्रसंपन्न विद्यार्थ्यांच्या वेदमंत्रोच्चारणाने झाला. सरस्वतीवंदना आणि विश्वविद्यालयगीतानंतर भारतीय धर्म, तत्त्वज्ञान आणि संस्कृती संकायाचे प्रमुख डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी यांनी विश्वविद्यालयाचा विकास व प्रगतीविषयक अहवाल प्रास्ताविकाद्वारे सादर केला.

कुलगुरू डॉ. उमा वैद्य यांनी याप्रसंगी विविध संकायांतर्गत 375 पदव्युत्तर पदवी, 816 पदवी, 1350 पदविका, 357 प्रमाणपत्र अभ्यासक्रम व 100 पदव्युत्तर पदविका प्रदान केल्या. यानंतर मा. कुलगुरू महोदयांनी विद्यार्थ्यांना दीक्षान्त उपदेश प्रदान केला. विविध विद्याशाखांतर्गत 38 विद्यार्थ्यांना आचार्य (पीएच्.डी) पदवीने गौरवान्वित करण्यात आले.

याप्रसंगी महाराष्ट्राचे सन्माननीय राज्यपाल आणि विद्यापीठाचे कुलपती मा. श्री. विद्यासागर राव यांचा शुभसंदेश वाचून दाखविण्यात आला. मा. कुलपती महोदयांनी पदवीप्राप्त सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कारकीर्दीकरिता शुभेच्छा दिल्या.

सन्मान्य अतिथी कुलगुरू डॉ. रमेशकुमार पाण्डेय आपल्या भाषणात म्हणाले,'' आगम, स्वाध्याय, प्रवचन आणि व्यवहार या चार प्रकारे विद्या ही उपयुक्त ठरत असते. विद्यार्थ्यांनी आगम काळात गांभीर्याने विद्यार्जन करावे, स्व अध्ययनाद्वारे आपली प्रतिभा व प्रज्ञा विकसित करावी आणि अध्यापनाद्वारे प्राप्त केलेल्या ज्ञानाचे वितरण आणि उपयोग करावा. संस्कृत भाषेतून मिळणारे संस्कार, मानवी मूल्ये यांचा अंगिकार करून आपले व्यक्तिमत्त्व विकसित करावे. आपले नियत कर्म श्रद्धेने

आणि निष्ठापूर्वक करून स्वतःची उन्नती व विकास करावा. समाजाप्रती असणारे आपले उत्तरदायित्व जाणून भारत देशाला आणि संस्कृत शास्त्रज्ञानाला गौरव प्राप्त करून द्यावा. या सप्तम दीक्षान्त समारोहात पारितोषिक प्राप्त सर्व विद्यार्थ्यांचे मी अभिनंदन करतो व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो.''

प्रमुख अतिथी मा. श्री. प्रकाश जावडेकर आपल्या भाषणात म्हणाले,''संस्कृत हा भारताचा आत्मा आहे. कालिदास विद्यापीठातील अभ्यासक्रम एकाच वेळेला पारंपरिक आणि आधुनिक गरजांचा मेळ साधून तयार केले आहेत, हे विशेषत्वाने लक्षात आले. महाराष्ट्रातील एकमेव संस्कृत भाषा विद्यापीठ असलेल्या विद्यापीठाचे कार्य नक्कीच महत्त्वाचे आहे. शिक्षण ही मानवाच्या विकासाची गुरुकिल्ली आहे. आजच्या जागतिक पटलावर केवळ कौशल्ये आणि माहिती महत्त्वाची नाही तर सामाजिक संदर्भामध्ये माहिती, विचार आणि कृती यांचा समन्वय साधणारे समतोल मन अपेक्षित आहे म्हणूनच मी विद्यार्थ्यांना जबाबदार नागरिक व्हा असे आग्रहाने सांगेन. तुम्ही देशाच्या विकासात योगदान दिले पाहिजे. भारत हा त्याच्या उच्चतम गुणवत्तेसाठी ओळखला जातो; पण या युवकांच्या ऊर्जेचा फारसा प्रभावीपणे उपयोग केला जात नाही. आजचे पदवीधर उद्याचे नेते आहेत. तुम्ही सर्व समाजाचे मौल्यवान धन आहात हे लक्षात ठेवूनच भविष्याची वाटचाल करा. मानवसंसाधन मंत्रालयाने शिक्षण क्षेत्रात पारदर्शकता आणण्यासाठी प्रत्यक्ष रोख हस्तांतरण, सार्वजनिक आर्थिक व्यवस्थापन प्रणाली इ. अनेक नवीन गोष्टींची सुरुवात केली आहे. त्याचप्रमाणे नॅशनल ॲकॅडेमिक डिपॉझिटरी हा एक नावीन्यपूर्ण आणि वैशिष्टयपूर्ण प्रकल्प हाती घेतला आहे. उच्चतम गुणवत्ता असलेले मनुष्यबळ निर्माण करणे हे आमचे ध्येय आहे. जोपर्यंत भारतीय विद्यापीठे स्वतःची क्षमता वृद्धी करणार नाहीत तोपर्यंत उच्च क्षमतेचे मनुष्यबळ निर्माण होणार नाही. म्हणून आमचे ध्येय हे उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण करणे हे आहे. याशिवाय परदेशी विद्यापीठांशी करार, विद्यापीठांचे राष्ट्रीय मानांकन या विविध कार्यक्रमांद्वारे भारतीय विद्यापीठे आंतरराष्ट्रीय स्तरावरील विद्यापीठांच्या स्पर्धा करण्यास सक्षम ठरतील, असा माझा विश्वास आहे. श्री. जावडेकर यांनी या दीक्षांत समारोहात विविध परीक्षांमध्ये पदके व पारितोषिके प्राप्त करणा–या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. ''

या दीक्षांत समारोहात मा. कुलगुरू डॉ. उमा वैद्य, प्रमुखातिथी श्री. प्रकाश जावडेकर व सन्मान्य अतिथी प्रो. डॉ. रमेशकुमार पाण्डेय यांच्या शुभहस्ते संस्कृत, योग, योगविज्ञान, वास्तु, जर्मन, वेद, ग्रंथालयशास्त्र, ज्योतिष, कीर्तन, प्रशासकीय सेवा, शिक्षण, संगणक उपायोजन, नृत्य, चित्रकला, मूर्तिकला इ. ललित कला या 35 विविध विषयांमध्ये सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना याप्रसंगी पदके आणि पारितोषिके प्रदान करण्यात आली. एकूण **58** पदकांपैकी **50 सुवर्ण** पदके व **8 रजत** पदके तसेच **26 रोख पारितोषिके** देखील या दीक्षांत समारोहात प्रदान करण्यात आली.

विविध विद्याशाखांतर्गत 38 विद्यार्थ्यांना आचार्य(पीएच्.डी.) पदवीने गौरवान्वित करण्यात आले.

एम.ए. संस्कृत विषयात सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल **कु. मृण्मयी दिनेश कुळसंगे (2014–15), हरिश्चंद्र मालू गावस (2015–16)** या विद्यार्थ्यांना सर्वाधिक पदके(4 सुवर्ण व 3 रजत) प्रदान करण्यात आली. **हरिश्चंद्र मालू गावस या विद्यार्थ्याला एम्.ए. व्याकरणशास्त्रामध्ये सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबददल आणि सर्व विद्याशाखांमधून सर्वप्रथम आल्याबददल श्री. एस्. एल्. भीमनवार यांच्याद्वारे प्रदान करण्यात आलेले स्व. जयराम व्यंकटेश स्मृति रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.**

तसेच 2014–15 व 2015–16 मध्ये अनुक्रमे एम्.ए. योगशास्त्रामध्ये कु. शर्वरी दीपक अभ्यंकर, कु. मंजुषा प्रशांत पुरंदरे, एम्.ए. कीर्तनशास्त्रामध्ये कु. सविता जयंत मुळे, एम्.एफ्.ए. नृत्यशास्त्रामध्ये मौसम महेंद्र, अक्षय रमेश ऐरे, एम्.ए. वेदांग ज्योतिषमध्ये अन्वेष देवुलपल्लि, कु. नेहा निशिकांत लघाटे, एम्. एड्. शिक्षणशास्त्र विषयात सौ. सरिता राजेंद्र गिल्लूरकर या विद्यार्थ्यांना गुणानुक्रमे प्रथम आल्याबद्दल पदक व पारितोषिके प्रदान करण्यात आले. बी. एड्. शिक्षाशास्त्री पदवी परीक्षेत सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबददल तसेच मुलींमधून प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबददल कु. कस्तुरी उबगडे हिला दोन सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. बी.एड्. शिक्षाशास्त्री परीक्षेत मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधून प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबददल कु. स्नेहल अशोक तेलमोरे हिला सुवर्णपदक देऊन गौरविण्यात आले..

दीक्षान्त समारोहाचे संचालन व आभार प्रा. पराग जोशी यांनी केले. कार्यक्रमाला रामटेकचे आमदार श्री. मल्लिकार्जुन रेड्डी, माजी आमदार ॲड. आशीष जयस्वाल, विभागीय आयुक्त श्री. अनुप कुमार, जिल्हाधिकारी श्री. सचिन कुर्वे, महापालिका आयुक्त श्री. श्रावण हर्डीकर, किट्स महाविद्यालयाचे अध्यक्ष कॅप्टन व्ही. लक्ष्मीकांत राव, प्राचार्य डॉ. बी. राम रतन लाल तसेच विश्वविद्यालयाचे सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेतर सहकारी, नागपूर व रामटेक येथील पत्रकार तसेच नागपूर व रामटेक येथील गणमान्य नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. तसेच किटस् महाविद्यालयातर्फे करण्यात आलेल्या सर्वतोपरी सहकार्याबद्दल प्राचार्य डॉ. बी. राम रतन लाल यांचे विशेष आभार विश्वविद्यालयाने मानले.

आचार्य पदवी कक्ष

अ. क्र.	विवरण
1	सत्र 2016–17 मध्ये एकूण 04 विद्यार्थ्यांना पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली, सदर विद्यार्थ्यांना पीएच. डी. प्रदान होईपर्यंत सर्व कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण करून अधिसूचना जारी करण्यात आली.
